सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN 978-81-940842-0-4

• पुणे • वर्ष : २० • अंक १२ • मार्च २०२५ • पृष्ठे ४८ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## सतीशजी मराठे अमृतमहोत्सवी सत्कार सोहळा...

## जागतिक महिला दिन विशेष...





## पुणे जनता सहकारी बँक अमृत महोत्सवी वर्ष सांगता सोहळा...



## आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ : आंतरराष्ट्रीय पतसंस्था अधिवेशन शिर्डीत संपन्न...


स्थापना-१९९४
ती
आई
ताई
मैत्रीण
पत्नी
मुलगी
जन्म
सुरवात
आहे
जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
शुभेच्छुक
सौ. निलिमा बावणे
अध्यक्ष
सौ. सारिका पेंडसे
उपाध्यक्ष
संस्थेच्या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Join The Dharampeth Mahila Society Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
8055026129
100% Placement Guarantee*
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
30 वर्षे विश्वासाचे
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि बुलडाणा
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र.नं. 819
ISO 9001:2015 मान्यता प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा.ल. उपारव्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या सर्व महिला भगिनींना हार्दिक शुभेच्छा..!!
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
संस्थेची वैशिष्ट्ये
शाहू पे
मोबाईल बँकिंग
नेट बँकिंग
डोअरस्टेप बँकिंग
RTGS
NEFT
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
मा.संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रू.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रू.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रू.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रू.५०,०००/-
ठेवींचे आकर्षक व्याजदर
१ महिना ते ६ महिने पर्यत ९.५० %
७ महिने ते १२ महिने पर्यत १०.५०%
१३ महिने ते पुढे ११ %
सोने तारण कर्ज फक्त 10% व्याजदरामध्ये उपलब्ध
8th MARCH
INTERNATIONAL WOMEN'S DAY
Missed Call
Balance check सुविधा
7877778870
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
COMING SOON
WhatsApp Banking
New Channel for the New Generation
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
सौ.मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१ - ९५२८४९०४९०

50+ YEARS OF MOMENTUM

अर्थ सहकारेण कल्याणम्

THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.

MULTI-STATE SCHEDULED BANK

INTRODUCING

# SAKHI SAVINGS ACCOUNT

Start your account with Zero Balance

Free RuPay Debit card with a built-in accidental cover of ₹ 1 lakh*

Girls above 18 years & Women can open this account

Special concession while availing loan*



* T & C APPLY

TOLL FREE: 1800 233 1919 kalyanjanata.in KJSBank

‘लोकमान्य सोसायटी’ची

# सुदृढ ‘आर्थिक’ स्वास्थ्य

*एक परिपूर्ण संकल्पना*



प्रत्येक ग्राहकाच्या प्रत्येक गुंतवणुकीची संपुर्ण काळजी.
**सुरक्षितता**

प्रत्येक ग्राहकाचा आमच्या कामावर आणि शब्दावर विश्वास.
**विश्वासार्हता**

प्रत्येक दिवसाच्या कामकाजात कार्यतत्परता आणि परिणामकारकता.
**व्यावसायिकता**

प्रत्येक कामकाज हे पारदर्शकतेने पार पडत असल्याची हमी.
**पारदर्शकता**

## संपूर्ण कुटुंबासाठी

### विविध सेवा

**INSURANCE - Life & General**

**LIFE INSURANCE**





- Endowment Policy
- ULIPs
- Term Insurance Plan
- Money Back Policy
- Annuity / Pension Plans
- Whole Life Policy

**GENERAL INSURANCE**

- Motor Insurance
- Fire Insurance
- Factory Insurance
- Group Insurance
- Jeweller Insurance
- Marine Insurance
- Cyber Liability Insurance
- Trade Credit Insurance

डिजिटल प्लॅटफॉर्म
लॉकर्स
म्युच्युअल फंड
ठेवी
जनरल इन्शुरन्स
लाईफ इन्शुरन्स
फॉरेक्स

**MUTUAL FUND**




**Benefits of Investing in Mutual Funds**

- Flexible Investment Tenure
- Convenient & Hassle Free
- SIP assures Power of Compounding
- Manages Inflation
- Taxation Benefits
- Safe & Transparent

आता एकाच छताखाली
सुरक्षित, विश्वासार्ह आणि अखंड वृध्दिसह...
कुटुंबातील सर्वांसाठी अनेक पर्यायांसह !

लाईफ इन्शुरन्स | जनरल इन्शुरन्स | म्युच्युअल फंड | कर्ज | फॉरेक्स

स्थापना 1995
**लोकमान्य**
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र

महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002

संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.

Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

30 वर्षे | 213 शाखा | 4 राज्य | 10000+ कोटी ठेवी


netwin
Ideas to Life
एकमेव उद्देश... ग्रामीण बँकिंगला भारताच्या अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे.
₹ १६.६७ कोटी
प्रति महिना IMPS व्यवहार
₹ २५० कोटी
प्रति महिना उलाढाल
३ लाख
व्यापारी डिजिटल व्यवहाराचे भागीदार
९,०७,१६८
सरासरी मासिक UPI व्यवहार
NetPay-UPI QR Code
Certification's
अधिक माहिती साठी संपर्क करा
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in

AURO®

SINCE 1948

ISO CERTIFIED ISO 9001 : 2008

BIS Certified

IS : 550 CM/L.No.7200069405 | IS : 550 CM/L.No.3740863 | IS : 550 CM/L.No.2863066 | IS : 550 BIS Certified



## SALES & SERVICES

# ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET

JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

**Contact : Mrs. Suvarna Kshirsagar**

Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002

mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com

7559283467 I 9685061515 I 9879791521

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED
A core banking software solutions

3000+ SATISFIED CLIENTS

# व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.

A Core Banking Software Solutions

छत्रपती संभाजीनगर



संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर

* ऑडीटसाठी लागणारे सर्व रिपोर्ट उपलब्ध
* डोअर स्टेप बँकिंग मोबाईल ॲप
* क्रेडिट स्कोअर रिपोर्ट * क्यू. आर. कोड कलेक्शन
* आधार/पॅन पडताळणी * इंटरनेट बँकींग
* ऑनलाईन मोबाईल बँकींग
* मॅनेजमेंट मोबाईल ॲप
* मोबाईल ॲप फॉर बँक स्टाफ
* कस्टमर ॲप
* रिकव्हरी ॲप

**CERTIFICATIONS:**
VAPT & CERT In Certification for Web and Android App Certified by TUV-SUD ISO 9001:2015 ISO/IEC 27001:2013

आजच आपल्या बँक, पतसंस्था, मल्टीस्टेट, कर्मचारी सोसायटी, एन बी एफ सी (NBFC) मध्ये कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सुरु करा.

Contact Us

कॉर्पोरेट ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
अ-२४-५, चिखलठाणा औद्योगिक क्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००६

हेड ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
थर्ड फ्लोर, मालन प्लाझा.
दुर्गा माता मंदिरा जवळ, आकाशवाणी रोड,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५

+91 9423000202 +91 9209000096
+91 9763878000 +91 8080342437
+91 8080762775 +91 9763873000
+91 9545002127 +91 9730070680

Email : info@visualinfosystems.in website : www.visualinfosystems.com

।। बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ।।

# अनुक्रम


* देशाच्या विकासात सहकाराचे महत्त्वपूर्ण योगदान – केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा ....... ११
* रा.स्व.संघाकडून सहकारात काम करण्याची प्रेरणा – सहकार भारतीचे माजी अध्यक्ष सतीशजी मराठे ........ १२
* सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कामकाजातील पारदर्शकता जपणे आवश्यक राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा ........ १४
* अंत्योदय संकल्पना प्रत्यक्षात येईल का? ........ १७
* सरफेसी कायद्याअंतर्गत देय रकमांचा प्राधान्यक्रम : सुरक्षित धनकोंचे (Secured Creditors) स्थान? ........ १८
* गोदावरी अर्बन 'राष्ट्रीय बँकिंग एक्सलन्स' पुरस्काराने सन्मानित ........ १९
* नागरी सहकारी बँका आर्थिक समावेशनाचा मजबूत पाया उभारणे गरजेचे ........ २०
* दि खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या नांदुरा शाखेचे उद्घाटन ........ २१
* सहकाराचे शिक्षण देणारे विद्यापीठ लवकरच होणार – सहकार राज्यमंत्री मोहोळ........ २२
* सहकारी बँकांकडे पाहण्याचा रिझर्व्ह बँकेचा दृष्टीकोन सकारात्मक – सतीश मराठे........ २३
* आजच्या काळातही महिला विकासात्मक कामात अग्रेसर ........ २४
* महिलांसाठीच्या विविध योजना ........ २५
* सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग आणि वाढीचे प्रयत्न........ २६
* उद्योग व्यवसायाबरोबरच महिलांनी छंदही जोपासावे........ २७
* महिलांनी महिलांसाठी चालवलेली कोकणातील कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी ..... २८
* कर्मवीर पतसंस्थेचे बीजारोपण........ २९
* महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स असो. अध्यक्षपदी भाऊ कड ........ ३१
* पतसंस्थांनी वाढीचा ध्यास धरावा, पण वाढ सातत्यपूर्ण, प्रमाणबद्ध असावी ........ ३२


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए–१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक –** भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**मार्च २०२५ (वर्ष २०, अंक १२)**



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे



**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/– फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/– फक्त

**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# सहकार भारतीचा आधारवड...



सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि रिझर्व्ह बँकेचे संचालक असलेल्या आदरणीय सतीशजींचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. नुकताच त्यांचा भव्य सत्कार सोहळा मुंबईत भैयाजी जोशींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. आपल्या घरातल्याच एका ज्येष्ठ व्यक्तीचा अमृत महोत्सवी वाढदिवस साजरा होतोय अशीच भावना आहे. सतीशजींचा जन्म १ फेब्रुवारी १९५० रोजीचा. ''बिना संस्कार नही सहकार, बिना सहकार नही उद्धार'' हे ब्रीदवाक्य घेऊन सहकार भारती १९७९ पासून देशभर कार्यरत आहे. त्यावेळी लक्ष्मणराव इनामदार (वकिलसाहेब), अण्णासाहेब गोडबोले, वसंतराव देवधर अशा मंडळींसोबत सतीश मराठे होते. वकिलसाहेबांच्या विशेष मार्गदर्शनाने पुण्यातच सहकार भारतीची स्थापना झाली. सहकार चळवळीत सुसंस्कारीत कार्यकर्ते यावेत आणि ही चळवळ निकोप व्हावी, वर्धिष्णू व्हावी या हेतूने सहकार भारती आजही देशभर काम करीत आहे.

सतीशजींचे सहकार क्षेत्रातील व सहकार भारती संघटनेमधील योगदान खूपच मोठे आहे. सहकारामध्ये संस्कार रुजवून सहकारी संस्थांना बळकटी देण्याच्या कार्यात सतीश मराठेंनी सुरुवातीला महाराष्ट्रात आणि नंतरच्या काळात संपूर्ण देशभर प्रवास करून संघटीत नेतृत्व उभे केले. वाणिज्य व कायदा विषयात पदवी संपादन केलेले तसेच पत्रकारितेमध्ये सुवर्णपदक मिळवित पदविका प्राप्त केलेले सतीशजी एक बहुआयामी आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या सामाजिक कार्याला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून सुरुवात झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरकार्यवाह मदनदासजी देवी, विद्यार्थी परिषदेचे यशवंतराव केळकर अशा व्यक्तिमत्वांचा त्यांच्यावर आजही प्रभाव आहे. बँक ऑफ इंडिया पासून नोकरी सुरू झाली व पुढे डोंबिवली नागरी सहकारी बँक व जनकल्याण सहकारी बँकेच्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्रात प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. पुढे युनायटेड वेस्टर्न बँकेचे ते अध्यक्ष झाले व त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे बँकेने नवी उंची गाठली. सन २०२० पासून रिझर्व्ह बँकेचे संचालक म्हणून त्यांची कारकीर्द एका उंचीवर पोहोचली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वीच्या उच्चस्तरीय बैठकांना देखील सतीशजी यांची उपस्थिती उल्लेखनीय म्हणावी लागेल.

ते अनेक वर्ष नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे संचालक होते. नॅशनल कौन्सिल फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंगचे ते अनेक वर्ष कार्यलक्षी संचालक होते. नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडियाचेसुद्धा ते अनेक वर्षे संचालक होते. इंडियन बँक्स असोसिएशनचे मानद सचिव म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. पालघर जिल्ह्यातील जवाहर येथे प्रगती प्रतिष्ठानद्वारे चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळेचे देखील ते गेली अनेक वर्षे विश्वस्त म्हणून काम करीत आहेत. सहकार रत्न, सहकार भूषण, सहकार मित्र अशा विविध पुरस्कारांनी त्यांना यापूर्वी गौरविण्यात आले आहे.

सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री, राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी देशभरातील हजारो कार्यकर्ते सहकार भारतीशी जोडले. आज संपूर्ण देशभरातील २८ राज्यांमध्ये व ७०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये जे सहकार भारतीचे कार्य सक्षमपणे उभे झाले आहे, त्याचा भक्कम पाया सतीशजींनी स्वतःला झिजवत रचला. सहकार भारतीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचे मोलाचे कार्य सतीशजी आजही करत आहेत. सहकार, संघटन आणि समर्पण अशी त्रिसूत्री आपल्या जीवनामध्ये अंगिकारणाऱ्या मराठे साहेबांना दिर्घायु आरोग्य लाभावे हीच सदिच्छा !

भारत सरकारचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा व केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन हे सुद्धा वेळोवेळी अर्थसंकल्पाबाबत सतीशजींचे मार्गदर्शन घेत असतात. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी नवीन सहकार धोरण तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीमध्ये सतीशजींचा समावेश आहे. माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू या समितीचे अध्यक्ष आहेत. सहकाराच्या सर्व आयामांमध्ये सतीशजींचा गाढा अभ्यास आहे. बँकिंग सोबतच पतसंस्था, हाऊसिंग सोसायटी, मत्स्य व्यवसाय सोसायटी, बचत गट, विविध कार्यकारी संस्था, सहकारी ग्राहक भांडार अशा सहकाराच्या विविध प्रकोष्ठांना सतत त्यांचे मार्गदर्शन लाभत असते. आज त्यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे व संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे देशभरातील ५० हजारांहून अधिक संस्था सहकार भारतीशी जोडल्या गेल्या आहेत. आज आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''सहकारातून समृद्धी'' या संकल्पनेचा पाया रचला. हीच भूमिका सतीशजींनी ४७ वर्षांपूर्वी सहकार भारती संघटनेच्या माध्यमातून मांडली होती, हे लक्षात घ्यायला हवे. जय सहकार !



संपादकीय...



# देशाच्या विकासात सहकाराचे महत्त्वपूर्ण योगदान – केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा

## जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाची सांगता

**सहकारी बँकिंग क्षेत्रात स्वकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या येथील जनता सहकारी बँकेने नुकताच अमृत महोत्सवी सोहळा साजरा केला. गेल्या ७५ वर्षांच्या काळात बँकिंग क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील विविध उपक्रम यशस्वीपणाने राबविले आहेत.**

**पुणे –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०४७ पर्यंत देशाला पूर्ण विकसित राष्ट्र करणे आणि सन २०२७ पर्यंत त्याच्या अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी करणे हे दोन संकल्प राष्ट्राच्या समोर ठेवले आहेत. सहकारी क्षेत्राच्या योगदानाने दोन गोष्टी साध्य करता येऊ शकतात. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेनुसार काम देणे आणि प्रत्येक व्यक्तीला देशाच्या विकासाशी जोडणे, प्रत्येक कुटुंबाला समृद्ध करणे हे केवळ सहकारी चळवळीच्या माध्यमातून शक्य आहे, असे मत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले.

जनता सहकारी बँक पुणे बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाची सांगता करण्यात आली. अध्यक्षस्थानी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा होते. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब, उपाध्यक्ष अलका पेटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश कश्यप उपस्थित होते. जनता सहकारी बँकेच्या स्मरणिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. अंब्रेला ऑर्गनायझेशनसाठी ५ कोटींचा धनादेश यावेळी बँकेच्या वतीने देण्यात आला.

**❊ छोट्या लोकांची मोठी बँक –**

सहकारमंत्री शहा म्हणाले, छोट्या लोकांची मोठी बँक हा विश्वास जनता सहकारी बँकने सार्थ केला आहे. देशातील पहिली को ऑपरेटिव्ह डिमॅट संस्था बनण्याचा बहुमान बँकेने प्राप्त केला आहे. जनता बँकेची ठेवी ९६०० कोटींपेक्षा अधिक आहे, हे बँकेचे यश आणि लोकांचा विश्वास आहे. सामाजिक कार्यात देखील बँक अग्रेसर आहे. कोणतीही संस्था जेव्हा सातत्यपूर्ण प्रगती करते, तेव्हा त्यांचे संस्थापक, संचालक, सदस्य हे तिघे सगळ्या उद्देशांना पूर्ण करतात तेव्हाच ही प्रगती शक्य आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**❊ महाराष्ट्रात सहकारी बँकांचे मोठे जाळे –**

देशात १४६५ सहकारी बँका आहेत आणि त्यापैकी ४०० हून अधिक फक्त महाराष्ट्रात आहेत. आम्ही एक अंब्रेला संस्था सक्रिय करत आहोत, जी सर्व सहकारी बँकांना शक्य त्या सर्व प्रकारे मदत करेल. अंब्रेला संस्थेसाठी सहकारी बँकांनी ३०० कोटी रुपयांचे भागभांडवल उभे केले आहे. यामध्ये केंद्र सरकारचे देखील सहकार्य आहे. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने शहरी सहकारी व्यवसाय वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशातील पहिले सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक कार्यालय मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने पुण्यात सुरू होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

जनता सहकारी बँक लि., पुणे

**❊ बँकेचा अमृत महोत्सव हा सुवर्णक्षण –**

अध्यक्ष हेजीब म्हणाले, अनेक आव्हानांना तोंड देत समर्थपणे आपल्या विचारांचा वारसा जपत अमृतमहोत्सवी वर्षामध्ये केलेल्या कामगिरीचे सिंहावलोकन करण्याचा हा सुवर्णक्षण आहे. बँकेवर काम करणारे भागधारक, निष्ठावान खातेदार, निस्वार्थी संचालक आणि प्रामाणिक सेवक ही या बँकेची खरी शक्तिस्थाने आहेत. समाजातील सर्वसामान्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी बँकेने मागील ७५ वर्षे आपली भूमिका अत्यंत प्रभावीपणे निभावली आहे, असे सांगत बँकेच्या योजना आणि सामाजिक कार्यातील उपक्रमांची माहिती दिली.

जगदीश कश्यप यांनी स्वागत केले. रवींद्र हेजीब यांनी प्रास्ताविक केले. अलका पेटकर यांनी आभार मानले.




आरबीआय संचालक सतीश मराठे यांना मानपत्र प्रदान करताना रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी, छायाचित्रात डावीकडून महामंत्री विवेक जुगादे, राष्ट्रीय महामंत्री चौरसिया, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, मध्यभागी सतीश मराठे, उजवीकडे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके.

# रा.स्व.संघाकडून सहकारात काम करण्याची प्रेरणा – सहकार भारतीचे माजी अध्यक्ष सतीशजी मराठे

## सतीशजी मराठे यांचा अमृत महोत्सवी सोहळा उत्साहात साजरा

**मुंबई – अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमुळे काम करण्याची प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळाले तसेच सहकाराच्या व्यापक क्षेत्रात काम करण्याची संधी ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिली तर सहकार भारतीने त्याला व्यापक स्वरूप दिले, असे मत आरबीआयचे संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी सांगितले. येणाऱ्या काळात कार्यकर्त्यांनी स्वतः ला झोकून संघटनेचे काम केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.**

मराठे यांचा अमृत महोत्सवी सोहळा येथे नुकताच झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांच्या हस्ते मराठे दांपत्याचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, माजी केंद्रीय मंत्री व देशाच्या नवीन सहकार धोरण समितीचे अध्यक्ष सुरेश प्रभू, इफकोचे अध्यक्ष डॉ. उदय शंकर अवस्थी, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, सतीशजींच्या पत्नी भारती मराठे, सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे व्यासपीठावर उपस्थित होते. सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या सतीश मराठे गौरव विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.




**दीपप्रज्वलन करताना रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी, छायाचित्रात डावीकडून माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, मध्यभागी सतीशजी मराठे आणि उजवीकडे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी**

**✻ आजवरच्या वाटचालीचा आढावा –**

यावेळी मराठे यांनी सहकार भारतीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा मागोवा घेतला. यावेळी ते म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्याशी संबंध आला. तेथूनच एका अर्थाने सामाजिक कार्याचा प्रारंभ झाला. त्या माध्यमातून अनेकांचा परिचय झाला. परिषदेचे काम १० ते १२ वर्षे केल्यावर सहकार क्षेत्राशी संपर्क आला. सुरुवातीला या क्षेत्राबाबत फारशी कल्पना नव्हती. तत्कालीन जेष्ठ नेते तात्या इनामदार, मधुकरराव भागवत दत्तोपंत ठेंगडी यांच्याकडून कामाची प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबर नाते जोडले गेले होते. त्यातूनच सहकार क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा अधिकच वृद्धिंगत होत गेली. देशातील सहकार




**सतीशजी मराठे यांच्या गौरव विशेषांकाचे प्रकाशन सोहळ्याचे छायाचित्र**

क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यामध्ये तसेच राष्ट्रीय स्तरावर सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन होण्यामध्ये सहकार भारतीची महत्वपूर्ण भूमिका आहे. संघटना वाढविणे, तसेच अध्ययन करणे या कामावर अधिक लक्ष केंद्रीत केले होते, असे त्यांनी नमूद केले.

**※ कार्यकर्त्यांनी कार्यविस्तारावर भर द्यावा –**

सहकार भारतीचे संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार तसेच स्व. माधवराव गोडबोले यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान आहे. सहकार भारतीची सुरुवात महाराष्ट्रात झाली पण हळूहळू संपूर्ण देशभर त्याचा विस्तार झाला. मुख्य बाब म्हणजे सहकार भारतीच्या कामाला देशव्यापी स्वरूप प्राप्त करून देण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी सांगितले. सहकार भारतीची भूमिका, कार्यप्रणाली आणि तत्त्वे प्रत्येक कार्यकर्त्याने समजावून घेऊन कार्यक्षेत्र व्यापक करण्यावर भर दिला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**※ कार्यासाठी समर्पणाची गरज –**

जोशी यांनी मनोगतात सांगितले की, १०० वर्षाच्या अथक प्रवासानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उद्दिष्टाच्या दृष्टीने योग्य प्रकारे वाटचाल सुरू असून हे उद्दिष्ट नक्कीच पूर्णत्वास जाईल असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले सामाजिक कार्यात काम करताना स्वत:ला त्यामध्ये सामावून घ्यावे लागते. वैचारिक प्रतिबद्धता असल्याखेरीज काम करता येत नाही. त्यासाठी संपूर्ण समर्पणची आवश्यकता असते. आणि हे समर्पण अंतरमनातून असावे लागते. कोणतेही करी हे केवळ विचारावर मोठे होत नाही विचार हे श्रेष्ठ आहेत पण कार्य हे संघटना चालविणाऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून मोठे होत असते, असे ते म्हणाले.

**※ मराठे यांच्या कार्याचा गौरव –**

उपस्थित वक्त्यांनी मनोगतातून मराठे यांच्या कार्याचा गौरव केला. सहकार भारतीचे कार्य शून्यातून कसे निर्माण झाले, याची प्रचिती अनेक वक्त्यांच्या उद्बोधनातून आली. संचालन सहकार भारती राष्ट्रीय महिला प्रमुख रेवती शेंदुर्णीकर यांनी केले.

सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रसाद लोढा, कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे, सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता, महाराष्ट्र को-ऑप. बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, महाराष्ट्र को-ऑपरेटिव बँक असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड, टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, सुभाष जोशी, प्रकाश पाठक, विलास देसाई यांच्यासह अनेक बँकांचे अध्यक्ष, संचालक व संपूर्ण देशभरातून सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कामकाजातील पारदर्शकता जपणे आवश्यक
# राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा

## शिर्डीतील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचा समारोप



**शिर्डी –** सहकार क्षेत्रात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर होता मात्र आता काय झाले आणि कशामुळे याचा विचार न करता चुका दुरुस्त करा. सहकार क्षेत्रात काम करीत असताना पारदर्शकता जपल्यास सहकार क्षेत्राची भरभराट होणे शक्य आहे अशी अपेक्षा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत ते बोलत होते. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आरबीआय संचालक सतीश मराठे, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, तसेच विविध देशातील सहकार क्षेत्रात काम करणारे प्रतिनिधी, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे, तसेच फेडरेशनचे पदाधिकारी, सहकार भारतीचे पदाधिकारी सहकार विभागाचे अप्पर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, राज्य मल्टिस्टेट संस्था अध्यक्ष सुरेश वाबळे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. परिषदेसाठी सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी देशभरातून आणि विविध देशातील सुमारे आठ ते दहा हजार प्रतिनिधी उपस्थित होते. राज्याच्या विविध भागामधून आलेल्या सहकार दिंडीचे पूजन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

**✻ सहकारी पतसंस्थांनी नवनवीन उपक्रम करावेत –**

राज्यपाल बागडे यांनी सांगितले की, सहकारी चळवळीला बदनाम करण्याचे काम काही लोकांनी केले आहे. म्हणूनच पतसंस्थांनी नवनवीन उपक्रम करून ज्या संस्था बिघडल्या आहेत त्या सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करावा. संस्था अडचणीत असेल तर ती वाचवायला हवी. एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ही संकल्पना आता सहकार क्षेत्रात राहिली नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी निर्मळ मनाने पतसंस्था चळवळ अधिक सुदृढ करावी असे आवाहन त्यांनी केले. पतसंस्था चालकांनी अधिक ठेवींवर व्याज दराऐवजी ठेवी परतीची हमी द्यायला हवी, असे ते म्हणाले.

**✻ पतसंस्थेतील ठेवींचे संरक्षण झाले पाहिजे – विखे पाटील –**

जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, पतसंस्थेमध्ये विश्वासाने ठेव ठेवणार्या ठेवींचे संरक्षण झाले पाहिजे. तरच ठेवीदार सहकारी संस्थेमध्ये ठेव ठेवण्यास तयार होतील. तसेच सहकारी कायद्यात बदल झाला पाहिजे, सहकार खात्याने राज्यातील सक्षम सहकारी पतसंस्थांना शेतमाल साठवणुकीसाठी गोदामे उभी करण्यास परवानगी द्यावी असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील पतसंस्था वाढीमध्ये राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांचे मोठे योगदान आहे. मात्र काही जण सहकार क्षेत्रावर मोठे झाले ते सारे विसरून गेले आहेत, असे ते म्हणाले.

**✻ राजकारण आणि सहकारी संस्था यांना एकत्र आणणे अशक्य – सहकार मंत्री**

सहकार मंत्री पाटील म्हणाले की, राजकारण आणि सहकारी संस्था या दोन घटकांना एकत्र आणता येत नाही.सहकार क्षेत्राला उज्ज्वल भविष्य मिळवून देण्यासाठी ठोस स्वरुपाच्या नियमावली तयार करण्याची गरज आहे. सहकारी संस्थांनी कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा सहकारी संस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी पतसंस्था फेडरेशनच्या माध्यमातून चळवळ पुढे नेऊन सहकारी संस्थांना प्रशिक्षण देण्याचे







# सहकार खाते - पतसंस्थांनी एकत्र काम करावे - काका कोयटे

**संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले असून त्या निमित्ताने राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने शिर्डी येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय सहकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेच्या अनुषंगाने फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे यांच्या समवेत झालेली बातचीत....**

महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांची चळवळ जगातील सर्व सहकारी चळवळीमध्ये प्रथम क्रमांकावर येण्यासाठी सहकार विभाग आणि पतसंस्था यांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज आहे. यासाठी सहकार खात्याने पतसंस्थांच्या विविध प्रश्नाबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी आणि प्रश्नांची सोडवणूक करून दिलासा द्यावा अशी अपेक्षा राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे यांनी व्यक्त केली आहे.

सुमारे ११० वर्षापूर्वी महाराष्ट्रात सहकार चळवळीची मुहुर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर देशाच्या विविध राज्यात सहकाराच्या विचाराचा प्रसार झाला. तसेच त्यावेळच्या नेते मंडळींनी सहकार चळवळ पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलभाई शामलदास यांच्या कार्याचा उल्लेख करावा लागणार आहे.

सहकारी चळवळीत आणि राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेत पतसंस्थांचे महत्त्व अधोरेखित करून ते म्हणाले, पतसंस्थांची चळवळ ही राज्याच्या अर्थकारणाला दिशा देणारी आहे. सहकारी तत्वावरील पतसंस्था ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेला आर्थिक सहाय्य करण्यात महत्त्वाची भूमिका पार पडत असतात. पतसंस्थांच्या माध्यमातून कर्ज, बचत आणि अन्य सेवा उपलब्ध करून तसेच लहान तसेच मोठ्या व्यावसायिकांना उद्योग - व्यवसायासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. या चळवळीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सहकारी पतसंस्था आणि सहकार विभाग यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून फेडरेशन कार्यरत आहे.

भविष्यात संपूर्ण जगाला आर्थिक मंदीतून सावरण्यासाठी सहकार क्षेत्राखेरीज अन्य पर्याय नाही असे नमूद करून ते म्हणाले, संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले आहे. राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने या निर्णयाचे स्वागत केले असून विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.



**काकासाहेब कोयटे**
**९३७१३ ३३५५५**

**विशेष मुलाखत**

त्यामध्ये चिंतन, मनन आणि प्रबोधन अशा संकल्पनेच्या माध्यमावर जास्त भर देण्यात आला आहे. त्याचा एक भाग म्हणून शिर्डी येथे फेडरेशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

'देशातील सहकार चळवळीला देदीप्यमान परंपरा आहे आणि देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत देखील चळवळीचे महत्वपूर्ण योगदान आहे,' असे स्पष्ट करून ते म्हणाले, यामध्ये सहकारी पतसंस्थांचा मोठा वाटा आहे. राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, पगारदार सहकारी पतसंस्था, महिला सहकारी पतसंस्था अशा विविध संस्थांचे नेतृत्त्व फेडरेशनच्या वतीने करण्यात येते. गेली ३० वर्षांपासून संस्था कार्यरत असून राज्यातील ३३ जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन राज्य शिखर संस्थेशी संलग्न आहेत. सध्याच्या स्थितीत राज्यात सहकारी पतसंस्थांचे अडीच कोटींपेक्षा अधिक सदस्य असून १६ हजारांपेक्षा पतसंस्थांमध्ये २.२० लाखांपेक्षा अधिक पदाधिकारी आणि संचालक सुमारे साडेचार लाखांपेक्षा अधिक कर्मचारी आणि तीन लाखांपेक्षा दैनंदिन प्रतिनिधी कार्यरत आहेत. म्हणजेच राज्यातील ३० ते ३५ टक्के जनतेशी पतसंस्था चळवळीचा संबंध आहे. राज्याच्या विविध भागात सहकारी पतसंस्था दिपस्तंभाप्रमाणे कार्यरत आहेत.

*****



काम केले आहे.

**✲ सहकार क्षेत्रातील निराशेचे वातावरण दूर करण्यावर भर – कोयटे**

राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष कोयटे यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रातील निराशेचे वातावरण दूर व्हावे या भावनेतून राज्याच्या विविध जिल्ह्यांतून सुमारे साडेतीन हजार कि.मी. चा प्रवास पूर्ण करून सहकार दिंडी येथे आली. यामुळे राज्यात चांगले वातावरण तयार होण्यास मदत झाली आहे. सहकारी पतसंस्थांसमोर ज्या विविध अडचणी आहेत, त्या सहकार खात्याने समजावून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करावा. सहकार पतसंस्था ज्यावेळी अडचणीत येतात, त्यावेळी मंत्री विखे पाटील धावून येतात. राज्यात सध्याच्या स्थितीमध्ये सुमारे १६ हजार पतसंस्था कार्यरत असून २ कोटी ७ लाख सदस्य आहेत. या पतसंस्था अधिक सक्षम व्हाव्यात. यासाठी नियंत्रण महत्त्वाचे असते तसेच पतसंस्थेतील ठेवींना संरक्षण मिळावे ही प्रमुख मागणी आहे, असे ते म्हणाले.

रणजीत हेतीयाराची यांनी सांगितले कि, राज्यातील पतसंस्था चळवळ ही जगातील सर्वात मोठी चळवळ होऊ शकते या चळवळीच्या निकोप वाढीसाठी अन्य देशांप्रमाणे पतसंस्था फेडरेशनला चळवळ संचालित करण्याचे अधिकार मिळायला हवेत अशी मागणी त्यांनी केली. समता सहकारी पतसंस्थेचे संदीप कोयटे यांनी आभार मानले.

**✲ सहकाराला महत्त्व देणारे सरकार –**

पहिल्या दिवशी परिषदेचे उदघाटन माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या हस्ते सहकार ध्वज फडकावून करण्यात आले. ते म्हणाले सहकार क्षेत्राला महत्व देणारे सरकार केंद्रामध्ये कार्यरत आहे. पंतप्रधान मोदी यांनी सहकार क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन प्रथमच स्वतंत्र मंत्रालय सुरू केले आहे. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू झाला आहे. सहकार चळवळीवर व्यापक मंथन करण्यासाठी या क्षेत्रातील देशातील आणि परदेशातील मंडळी येथे एकत्र आली. या परिषदेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राबाबत व्यापक चर्चा होईल आणि भविष्यातील चळवळीच्या वाटचालीला प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे असोसिएशन ऑफ एशियन कोंन्फडरेशन ऑफ क्रेडिट युनियनचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत हेतीयाराची, सहकार विभागाचे अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, बँकिंग तज्ञ गणेश निमकर, जिल्हा सहकार निबंधक गणेश पुरी आदे यावेळी उपस्थित होते. फेडरेशन अध्यक्ष कोयटे यांनी सांगितले की, राज्यातील सहकार चळवळ ही जगातील सर्वात मोठी चळवळ होऊ शकते. त्यासाठी या चळवळीचे नियंत्रण आणि संचालनात पतसंस्था फेडरेशनचा सहभाग गरजेचे आहे. अपर आयुक्त वाडेकर आणि सल्लागार निमकर यांनी ध्वनीचित्रफितीद्वारे सादरीकरण केले. फिलिपाइन्समधील सहकारी चळवळीबाबत नमिथा मेलबेस यांनी सादरीकरण केले.

## सहकारी पतसंस्था फेडरेशन 'राज्य शिखर समिती'वर अध्यक्ष काका कोयटे

**कोपरगाव –** राज्य शिखर समितीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त जगभरात सहकाराच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या वर्षात सहकाराशी निगडित राज्य पतसंस्था फेडरेशन, मल्टिस्टेट पतसंस्था फेडरेशन, सहकारी गृहनिर्माण संस्था सहभागी होऊन राज्यातील सहकार बळकट व सक्षम बनविण्यात योगदान देणार आहे. केंद्र शासनाचे विविध उपक्रम राज्य व जिल्हास्तरीय समितीमार्फत राबविण्याच्या अनुषंगाने आवश्यक ते संनियंत्रण करणे. तसेच राज्य सहकार विकास समितीने आयोजित केलेले कार्यक्रम उपक्रमावर देखरेख ठेवणे समितीस आवश्यक मदत, सहकार्य करणे. केंद्र स्तरावरील कार्यक्रमाबाबत योग्य तो समन्वय ठेवणे. हे काम समितीच्या वतीने करण्यात येणार आहे. सहकार वर्ष साजरे करण्यासाठी संपूर्ण वर्षभरात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध माहिती सर्वत्र प्रसारित करण्यासाठी सर्वसमावेशक प्रसिद्धी आराखडा (मिडिया प्लॅन) तयार करणे. सहकार क्षेत्रातील यशस्वी आणि प्रेरणादायी उपक्रमांची माहिती घेऊन त्यांची सर्व प्रकारे प्रसिद्धी तसेच राज्यांतील सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच राज्याने सहकार क्षेत्रामध्ये केलेली प्रगती आणि दिलेल्या योगदानाची माहिती राज्यातील जनतेला होण्यासाठी राज्यामध्ये सहकार महोत्सवासारखे कार्यक्रम आयोजित करणे. राज्यस्तरीय समितीमार्फत वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबाबत समितीस माहिती देणे. कार्यक्रमांचा आढावा समितीकडून घेणे. अहवाल राष्ट्रीय समिती, मुख्य सचिव तथा निमंत्रक यांना सादर करणे. अशा विविध कामांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात राज्य शिखर समिती भूमिका अध्यक्ष कोयटे पार पाडणार आहेत.



# अंत्योदय संकल्पना प्रत्यक्षात येईल का?



नितीन खर्चे
मो. नं. - ९४२२८ ९२७६८

मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, मानवाच्या जगण्याच्या संदर्भात संघर्ष करण्यासाठी अतिप्राचीन काळापासून माणसाने या ना त्या स्वरूपात सहकाराचा आधार घेतलेला दिसून येतो. सहकार ही समाजाने समाजासाठी निर्माण केलेली एक व्यवस्था आहे. सहकार हा मानवी समाजाचा स्थायी भाव आहे. इतकेच नव्हे तर सहकार ही एक चळवळ आहे. आपला महाराष्ट्र तर सहकाराचे बीज आहे. सहकार हा साम्यवाद आणि भांडवलवाद अशा विचारांना दिलेला बंधुतेचा पाया आहे. सहकार ही चळवळ नसून तो एक अर्थ विचार आणि जीवन विचार आहे. इतकेच नाही तर सहकार चळवळ ही तात्त्विकदृष्ट्या एकात्म मानववादाचे प्रात्यक्षिक आहे.

* **एकात्म मानववाद** – अनेकांच्या बलिदानाने आणि समर्पणाने आपल्याला स्वराज्य मिळाले. मिळालेल्या या स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर कसे करता येईल या दृष्टीने चिंतन सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर देश कसा चालवायचा हा प्रश्न स्वाभाविकपणे सर्वांसमोर उभा होता. यासाठी पाश्चात्त्य तत्वज्ञान, साम्यवाद आणि समाजवादात काही उत्तर आहे काय हे शोधण्याचाही प्रयत्न झाला. परंतु भारतासारख्या थोर परंपरा असलेल्या राष्ट्रात हा मार्ग चुकीचा आहे, हे स्वातंत्र्यानंतर दहा पंधरा वर्षांत लक्षात येऊ लागले. या पार्श्वभूमीवर पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी 'एकात्म मानव दर्शन' या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. पुढे त्याला ''एकात्म मानववाद'' असेही संबोधले जाऊ लागले. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेल्या या तत्त्वज्ञानाचे सार थोडक्यात सांगायचे झाल्यास असेही म्हणता येईल की, ''शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचे उपभोगाबरोबर संयमाचे आणि समर्पणाचे अधिकारासोबत कर्तव्याचे, व्यक्ती बरोबर समष्टी- सृष्टी- परमेष्टी याचे अखंड अवधान ठेवून चालणारे एकात्म सुख म्हणजेच ''एकात्म मानववाद''! 'एकात्म मानव दर्शन' हे केवळ तत्त्वचिंतन नाही, तर या तत्त्वज्ञानाच्या आधाराने युगानुकुल परिवर्तन घडवून आणून 'अंत्योदय' साध्य करण्याचे काम आहे.

* **अंत्योदय विचार** – पं. दीनदयाल उपाध्याय यांनी आपल्या प्रदीर्घ चिंतनातून एकात्म मानववाद मांडत असतांना त्याचा अंतिमत: उपयोग कोणाला? असा विचार केला तेव्हा त्यांनी एक शब्द दिला तो म्हणजे 'अंत्योदय''. अंत्योदय म्हणजे समाजाच्या शेवटच्या व्यक्तीच्या समग्र विकासात प्रत्येक वंचित, दुर्बल, उपेक्षित घटकाचा प्राधान्याने केलेला विचार. मानवाचे व मानवी मूल्यांचे अवमूल्यन न होता विकासाचा केंद्रबिंदू अखेरचा म्हणजेच तळागाळातला माणूस हवा. अंत्योदय हा विचार गरीब दरिद्री नारायणाचा विचार करणारा आहे. गरीबीरेषेखालील निम्नस्तरीय समाजाचे जीवन जगणारा, अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गरजाही ज्याला प्राप्त होत नाही अशा घटकाला आर्थिक मदत प्राप्त करून देणे यामध्ये अभिप्रेत आहे. दीनदयालजींनी एकात्म मानववादाच्या अनुषंगाने अंत्योदयाची उद्दीष्ट्ये सांगितली आहेत. त्यात प्रामुख्याने प्रत्येक व्यक्तीला किमान जीवनमानाची निश्चिती, प्रत्येक व्यक्तीला रोजगार, हर हाथ को काम और हर खेत को पानी, श्रमप्रधान उत्पादन प्रक्रिया यांचा समावेश आहे.

* **सहकारातून अंत्योदय** – सहकार चळवळीचा उपयोग समाजातील दुर्बल घटक, कामगार, गरीब, शेतमजूर, छोटे शेतकरी, छोटे व्यवसायीक, कलाकार इत्यादींना सहज करून घेता येतो. खरे म्हणजे या प्रकारच्या सर्व दुर्बल आणि उपेक्षित घटकांच्या गरजा फारच मर्यादित असतात. त्या सहकारातून पूर्ण करणे सहज शक्य आहे. सहकारी अर्थकारणाचा लाभ हा दुर्बलांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांना मदत करण्यासाठी असतोच. त्याशिवाय अर्थकारणातील मक्तेदारीला आळा घालण्यासाठी पर्यायी शक्ती निर्माण करण्यासाठीही असतो. सहकारातून दुर्बल घटकांमध्ये अधिक समावेशी लोकशाही राबविण्यासाठी तसेच अधिक समन्यायी वाटप करण्यासाठीही मदत होऊ शकते. यामुळे अशा गरजू घटकांना सहकारातून आर्थिक मदत मिळाली तर एक आर्थिक क्रांती निर्माण होऊ शकते, शिवाय सत्तेचे विकेंद्रीकरणही होण्यास मदत मिळू शकते.

सहकारातून अंत्योदय ! हे कसे शक्य आहे यासाठी एक छोटे उदाहरण पाहू. समजा एका गावात सहकारी तत्वावर एक दूध संकलन केंद्र आणि डेअरी गावकऱ्यांनी एकत्र येऊन सुरू केली. स्वाभाविकपणे गावातील दूध जे तो शेतकरी शहरातील हॉटेलला किंवा मोठ्या डेअरीला स्वत:च्या वाहनाने घेऊन जायचा तो ते घेऊन जाणार नाही. ते दूध आता आपल्याच गावातील सहकारी दूध संकलन केंद्रावर घेऊन जाईल त्यामुळे त्याचा बाहेरगावी जाण्याचा त्रास, वेळ आणि पैसाही वाचला. गावात दूध डेअरी आल्यामुळे तिथे मनुष्यबळ लागणार, एक ऑफिस लागणार, त्यासाठी वाहने लागणार, म्हणजे किमान दहा-बारा लोकांना रोजगार मिळणार. डेअरी सहकार तत्वावर असल्याने होणारा नफा हा सभासद शेतकऱ्याला मिळणार. थोडा व्यवसाय चांगला वाढला. तर दूध संकल्पनासोबतच डेअरी प्रॉडक्ट विक्रीस ठेवले जाणार अशा पद्धतीने 'अंत्योदय' या संकल्पनेची पूर्तता होणार.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेले एकात्म मानवदर्शन आणि त्यातून पुढे आलेला अंत्योदयाचा विचार हा सहकाराच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन आणि विकासाची दिशा ठरविणारा आहे. वनवासी क्षेत्रातील स्थलांतर, कुपोषण, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांतील समस्यांचा विचार सहकारातून अंत्योदय ही संकल्पना सार्थ होण्यासाठी महत्वाचा आहे. आदिवासी योजनांच्या माध्यमातून, वनौषधींचे जतन यासारख्या गोष्टी स्थानिक स्तरावर सहकारी संस्था स्थापन करून सहज शक्य आहे.

पंडित दीनदयालजी यांचे अंत्योदयाचे तत्त्वज्ञान आपण सहकाराच्या माध्यमातून व्यवहारात आणले तर खूप गतीने आपल्या समाजाचे उत्थान होईल. पंडितजींनी अंत्योदयाची जी व्याख्या केली, त्या आधारे असे म्हणता येईल की, या देशातील सर्वात गरीब असणाऱ्या व्यक्तीचा उदय म्हणजे अंत्योदय. त्याला विकास आणि मूलभूत गरजांची परिपूर्ती केली जाईल, तेव्हा देशाचा भाग्योदय होईल. शेतकऱ्याला खासगी सावकारांच्या पाशातून सोडविण्यासाठी आपल्या देशात सहकार चळवळीचा जन्म झाला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या एका उदात्त भावनेतून गरजेपोटी जन्मलेल्या या सहकार चळवळीचे आज संपूर्ण देशात विशाल वटवृक्षात रूपांतर झाले. जीवनाच्या विविध क्षेत्रात सहकार चळवळीचा यशस्वी शिरकाव झाला. मोठ्या उद्योगांसोबत देशातील ग्रामीण भागातील छोट्या उद्योगांना मदत करण्यासाठी सहकार आणि सहकारी वित्तीय संस्था पुढे सरसावल्या आहेत, ज्यामुळे अंत्योदय हा विचार साध्य होण्यास मदत मिळेल. आदिवासी, लहान शेतकरी, भूमिहीन मजूर, ग्रामीण शेतमजूर, बेरोजगार, शिल्पकार, मध्यमवर्गीय, दारिद्र्य रेषेखालील लोक, बारा बलुतेदार इत्यादींसाठी सहकार क्षेत्र रक्षकाच्या भूमिकेत असायला पाहिजे. त्या दृष्टीनेही विचार होणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ मध्ये सहकारातून अंत्योदय ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात येईल अशी अपेक्षा ठेवू या !

**– डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष, दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि., यवतमाळ मो. नं. – ९४२२८ ९२७६८** *****

# सरफेसी कायद्याअंतर्गत देय रकमांचा प्राधान्यक्रम : सुरक्षित धनकोंचे (Secured Creditors) स्थान?

वसुली प्रक्रियेमध्ये बँकांना तारण दिलेल्या मालमत्तेवर इतर शासकीय संस्थांनी त्यांच्या थकित देण्यापोटी टांच आणली असल्याचा अनुभव बऱ्याच बँका घेत असतात. त्यामुळे बँकांकडे तारण असूनही वसुली प्रक्रिया रखडते असा अनुभव आहे. विशेषत: व्यावसायिक कर्जदारांचे बाबतीत सेल्स टॅक्स, एक्साईज व इतर शासकीय यंत्रणा त्यांच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे बँकांकडे तारण असलेल्या मिळकतीवर जप्तीबोजे चढवीत असतात असे वारंवार निर्दर्शनास येत असते. त्यामुळे बँकांकडे कायदेशीर तारण असूनही शासकीय यंत्रणांच्या कार्यवाहीमुळे बँकांची वसुली रखडत होती. पण आता सरफेसी कायदा २००२ मध्ये सन २०१६ मध्ये झालेल्या दुरुस्तीमुळे सुरक्षित धनकोंचा (Secured Creditors) वसुलीमधील अग्रहक्क आता अधोरेखित झाले आहे. मुंबई ऊच्च न्यायालयाने रोनक इंडस्ट्रीज विरुद्ध असि. कमिशनर, सेंट्रल एक्साईज अँड कस्टम्स या दाव्यात पूर्वी याच न्यायालयाने जळगाव जनता सहकारी बँक लिमिटेड विरुद्ध जॉइंट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स व इतर या दाव्यात पूर्वी दिलेल्या निकालावर शिक्कामोर्तब करताना सुरक्षीत धनकोचा वसुलीमधील अग्रहक्क मान्य केला आहे. सर्वोच्च न्यायालयानेही आयसीआय बँक विरुद्ध सिडको लेदर्स लिमिटेड या दाव्यात हे तत्त्व मान्य केले आहे. या अनुषंगाने सरफेसी कायद्यात झालेल्या वेळोवेळी झालेल्या दुरुस्त्यांची माहीती घेणे सहकारी बँकांसाठी आवश्यक ठरते.



विद्याधर दंडवते
मो.नं. : ९९२३२ ९०६०६

सरफेसी कायदा सन २००२ मध्ये पारीत करण्यात आला. सदर कायदा बिगर बहुराज्य सहकारी बँकांना सन २००३ मध्ये एका नोटीफिकेशनने लागू करण्यात आला. सदर कायद्याची वैधता सर्वोच्च न्यायालयात सिद्ध झाली आहे. सदर कायदा लागू झाल्यामुळे सहकारी बँकांना त्यांच्या कर्जाची वसुली न्यायालयात न जातासुद्धा करणे शक्य झाले आहे.

सरफेसी कायदा २००२ मध्ये सन २०१६ मध्ये दुरुस्ती करण्यात येऊन मूळ कायद्यात नवीन प्रकरण IV - A वाढविण्यात आले आहे. या नवीन प्रकरणात २६ बी ते २६ ई अशी नवीन कलमे जोडण्यात आली आहेत.

- २६ बी या कलमानुसार कर अथवा इतर शासकीय देण्यांपोटी असलेला बोजा, तसेच न्यायालयीन डिक्री वा कर्जदाराकडील वसुली योग्य रक्कम व सुरक्षित धनकोच्या (Secured Creditors) कर्जाच्या बोजाची नोंद CERSAI मध्ये करणे आवश्यक आहे.
- २६ सी या कलमानुसार, वर नमूद केल्याप्रमाणे बोजाची नोंद CERSAI मध्ये केलेली असल्यास, ती जाहीर नोटीस (Public Notice) समजण्यात येईल. असा बोजा CERSAI मध्ये नोंदलेल्या असल्यास त्याला वसुली प्रक्रियेमध्ये इतर सर्व बोजांवर प्राधान्य असेल.
- कलम २६ डी नुसार, कोणत्याही सुरक्षित धनकोला (Secured Creditor), CERSAI मध्ये तारण मालमत्तेवरील बोजाची नोंद असल्याखेरीज वसुलीचा हक्क बजावता येणार नाही.
- कलम २६ ई नुसार, अन्य कोणत्याही कायद्यात काहीही तरतूद असली तरी, सुरक्षित धनकोला (Secured Creditor) त्याच्या तारण मालमत्तेवरील बोजाची नोंद CERSAI मध्ये केलेली असल्यास, वसुली प्रक्रियेमध्ये इतर सर्व देणेकऱ्यांवर (कर्जे/देणी, कर/उपकरासह अन्य शासकीय देणी) प्राधान्य असेल.

बँकांच्या दृष्टीने ही एक महत्वपूर्ण तरतूद आहे. मुंबई ऊच्च न्यायालयाने रोनक इंडस्ट्रीज विरुद्ध असि. कमिशनर, सेंट्रल एक्साईज व कस्टम्स व इतर या व जळगाव जनता सहकारी बँक लिमिटेड विरुद्ध जॉइंट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स, नोडल ९ व इतर तसेच सर्वोच्च न्यायालयाने आयसीआसीआय बँक विरुद्ध सिडको लेदर्स लिमिटेड या दाव्यात दिलेल्या निकालाचा ऊहापोह केला असून, सरफेसी कायद्यातील नवीन समाविष्ट कलमाअन्वये सुरक्षित धनकोंचे (Secured Creditors) वसुलीतील अग्रहक्क मान्य केलेले आहेत. मुंबई ऊच्च न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे पुढीलप्रमाणे :

- सुरक्षित धनकोंसह सर्व कर्जदात्यांवर/घेणेकऱ्यांवर त्यांच्या बोजाची नोंद CERSAI मध्ये करणे अनिवार्य आहे.
- सुरक्षित धनकोचे (Secured Creditors) देणे हे शासकीय महसूल, कर/ऊपकर वा अन्य केंद्र/राज्य शासनाच्या देयकांसह इतर देण्यांवर प्राधान्याने अदा केले जाईल. त्यामुळे शासकीय यंत्रणांना देखील सुरक्षित धनकोचे देणे चुकते होईपर्यंत वाट पहावी लागेल.
- सरफेसी कायद्यातील प्रकरण IV-A व त्यातील कलमे २६ बी ते २६ ई मधील तरतुदी, सदर दुरुस्ती लागू झालेल्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २४ जानेवारी २०२० पासुन लागू होतील.
- जे सुरक्षीत धनको (Secured Creditor) CERSAI मध्ये तारण बोजाची नोंद करण्याची चालढकल करतील, ते Recovery of Debts and Bankruptcy Act 1934 (4), च्या कलम ३१ बी नुसार वसुलीमधील अग्रहक्क गमावतील.
- सरफेसी कायद्याखाली झालेल्या लिलाव प्रक्रियेतील खरेदीदाराने जर लिलाव 'As is where is' पद्धतीने घेतलेला असल्यास व अशा मिळकतीवर जर कर/उपकर वा अन्य बोजे असल्सास व सदर बोजांची नोंद CERSAI मध्ये असल्यास सदर बोजांची माहिती खरेदीदाराला होती असे ग्राह्य धरले जाईल व सदर देणे त्याला चुकते करावे लागेल.

बँकांच्या दृष्टीने विचार करता सुरक्षित धनको (Secured Creditors) म्हणून बँकांना सतर्क रहावे लागणार आहे. वसुली प्रक्रियेमध्ये जरी सुरक्षित धनकोला प्राधान्य मिळणार असले तरी या पुढे सर्वच शासकीय यंत्रणाही सतर्क होतील व त्यांचे बोजे CERSAI मध्ये नोंदविण्याची तत्परता दाखवतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे सर्वच धनको/घेणेकरी जागरूक राहून CERSAI नोंदणीकृत असतील असे मानायला हरकत नसावी. अश्या परिस्थितीत CERSAI बोजांच्या नोंदींमधील क्रमवारी वरुन वसुलीमधील प्राधान्यक्रमाचा निर्णय घेण्याची वेळ येऊ शकेल. सबब, सहकारी बँकांनी सरफेसी कायद्यातील सर्व तरतुदींचा पूर्ण फायदा घेण्याच्या दृष्टीने खालील काळजी घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

- तारण देऊ केलेल्या मालमत्तेचा मालकी हक्काबाबतचा कायदेशीर अभिप्राय (Title search report) बँकेच्या अधिकृत कायदा सल्लागार यांचेकडून करून घ्यावे.

पुढील पानावर...

# गोदावरी अर्बन 'राष्ट्रीय बँकिंग एक्सलन्स' पुरस्काराने सन्मानित




**नांदेड** – सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करीत शहरी व ग्रामीण भागातील ग्राहकांना अत्यंत सुलभ सेवा प्रदान करण्याचे उल्लेखनीय कार्य करीत असल्याची दखल केंद्रीय स्तरावर घेत गोदावरी अर्बनला राष्ट्रीय बँकिंग एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिपक वर्मा यांच्या हस्ते गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांना प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाचे (एनएसआयसी) अध्यक्ष डॉ. शुभांशु आचार्य, चेंबर ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल आणि मध्यम उद्योगचे अध्यक्ष मुकेश मोहन, एजियास फेडरल लाइफ इन्शुअरन्सचे एमडी ज्युड गोम्स हे उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा दिल्ली येथे झाला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील व अध्यक्ष राजश्री पाटील यांनी मंत्रालयाचे आभार मानले आणि संस्थेचे संचालक, कर्मचारी व सभासदांचे अभिनंदन केले.

# श्री समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता

**पालघर** – बँक आणि पतसंस्थानी सध्याच्या स्पर्धात्मक काळात संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर अधिक लक्ष द्यावे असे ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल यांनी येथे सांगितले. येथील श्री समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता झाली त्यावेळी ते बोलत होते. पतसंस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात, पतसंस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील तसेच संस्थेचे संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

गांगल यांनी सांगितले की, संस्था ही ग्राहकांच्या विश्वासावर चालते. एखाद्या संस्थेचे ५०० कोटींपेक्षा अधिक व्यवहार झाले तर आरबीआय नियमांनुसार संस्थेचे बँकेत रूपांतर केले जात असते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा आणि गुणवंत पाल्याचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी तसेच खातेदार आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकारी पतसंस्थांच्या निवडणुका पूर्वीप्रमाणेच घ्याव्यात - मागणी

**सोलापूर** – जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या संभाव्य निवडणुका यापूर्वीप्रमाणे घेण्यात याव्यात अशी मागणी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने करण्यात आली आहे. मागणीत पुढे म्हटले आहे की, प्राधिकरणाच्या माध्यमातून होणारी निवडणूक न परवडणारी आहे. जिल्ह्यात सध्याच्या स्थितीमध्ये ५० हजारांपेक्षा अधिक संस्था कार्यरत आहेत. त्यात साखर कारखाने, दूध संस्था, बँका, पतसंस्था, सहकारी रुग्णालये, मल्टिस्टेट संस्था आदींचा यामध्ये समावेश आहे. सन २०१४ पासून सहकारी संस्थांच्या निवडणुका प्राधिकरणाच्या माध्यमातून घेण्यात येत आहेत.

मात्र मध्यम आणि लहान संस्थांना निवडणुकीचा खर्च परवडणारा नसतो. म्हणून निवडणुका पूर्वीप्रमाणे घेण्यात याव्यात असे मागणीत म्हटले आहे.

मुदत संपणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुका सहकार निवडणूक प्राधिकरणामार्फतच घेण्यात येत आहेत. यासाठी निवडणूक कार्यक्रम तयार करण्यात येतो. मात्र निवडणुकीचा खर्च संबंधित संस्थांकडे पाठविला जातो, असेही मागणीत म्हटले आहे.

## सरफेसी कायद्या अंतर्गत देय रकमांचा प्राधान्यक्रम : सुरक्षित धनकोंचे ...


- तारण देऊ केलेल्या मालमत्तेचे बँकेच्या अधिकृत मूल्यांकनकारांकडून मूल्यांकन करून घ्यावे.
- गहाणखत (Mortgage Deed) करताना मिळकतीचे अचूक वर्णन (जसे, पत्ता, चतु:सीमा, क्षेत्र, सध्याचे बांधकाम वर्णन इ.) सर्व कागदपत्रात करावे.
- गहाणखतामध्ये कर्ज रकमेचा तपशील, व्याज दर, कर्जाची मुदत, ठळक शर्ती व अटी इ. चा स्पष्ट ऊल्लेख असावा.
- करारनामे करताना सर्व कायदेशीर प्रक्रिया (जसे, स्टँपिंग, रजिस्ट्रेशन इ.) पूर्ण कराव्यात.
- गहाणखत कोणत्याही प्रकारचे (उदा. Simple Registered Mortgage, Equitable Mortgage etc.) असले तरी आवश्यक त्या सर्व कायदेशीर प्रक्रिया करून, एक महिन्याचे आत CERSAI मध्ये नोंद करणे अत्यंत आवश्यक आहे. वर नमूद केलेल्या सर्व बाबी बँकेचा तारण मालमत्तेवरील कायदेशीर बोजा सिद्ध करायला पुरेशा असल्या तरी, जोपर्यंत CERSAI मध्ये नोंद केली जात नाही, (जी एक जाहीर नोटिस समजली जाते.) तोपर्यंत बँकांना वसुली प्रक्रियेमध्ये प्राधान्य मिळू शकणार नाही.
- CERSAI मध्ये तारण मालमत्तेवरील बोजाची नोंद केलेली असल्यास, सरफेसी कायदा २००२ अथवा महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० यापैकी कोणत्याही कायद्याखाली वसुली कार्यवाही करताना सुरक्षित धनकोंना (Secured Creditors) प्राधान्य मिळू शकेल.

सबब, सर्व बँकांनी तारण मालमत्तेचे CERSAI रजिस्ट्रेशन वेळच्या वेळी करणे वसुलीचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

– विद्याधर दंडवते *****

# नागरी सहकारी बँका
# आर्थिक समावेशनाचा मजबूत पाया उभारणे गरजेचे

सबळ शहरी सहकारी बँका (UCBs) देशाच्या समावेशक आर्थिक भविष्याचा एक महत्त्वाचा दुवा आहे. देशभरातील शाखांच्या विस्तृत जाळ्याद्वारे लाखो सदस्यांना सेवा पुरवणाऱ्या शहरी सहकारी बँका या रिझर्व्ह बँक अधिकृत असतात याचे बरेचदा आपल्या तरुण सामाजिक आणि लघु, मध्यम औद्योगिक वर्तुळात अज्ञान दिसून येते. तुटपुंज्या तांत्रिकीकरणामुळे नागरी सहकारी बँका आर्थिक समावेशनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात, याबाबत नवयुगीन तरुण पिढीत त्यांच्या उपयुक्ततेबद्दल संभ्रम वाढवत असल्याचे दिसून येते.



अजित भाले

मो. ९१८००७७५५४५५

**लेखांक २**

नागरी सहकारी बँकांची मूळ भूमिका ज्या समुदायांना मोठ्या बँकांद्वारे पुरेशी सेवा मिळत नाही, अशा परिघाबाहेरील समुदायापर्यंत पोहोचवणे या सामाजिक जाणिवेतून उगम पावलेली आहे याचा तरुण पिढीपुढे आदर्श ठेवून नवीन पिढीला सहकाराला जोडण्याची तीव्र गरज आहे. नागरी सहकारी बँका अनेक प्रकारच्या आर्थिक सेवा प्रदान करतात. त्यात फारशी बोलली न जाणारी बाब म्हणजे अशा बँका सभासद बनू इच्छिणाऱ्यांची पारख आणि शहानिशा व्यक्तिगत करून योग्य ग्राहकांना आर्थिक मदतीद्वारे सबळ, सक्षम करण्यावरचा त्यांचा भर स्थानिक अर्थव्यवस्थेत योगदान अधोरेखित करणे आवश्यक बनले आहे.

या नागरी सहकारी बँकांचा सव्वाशे वर्षांचा प्रायोगिक इतिहास आणि आर्थिक समावेशनामधे केंद्रीय भूमिका असली तरी, हे मान्य करणे महत्वाचे आहे की या क्षेत्राला आज अनेक आव्हाने आहेत. काही प्रशासन, देखरेख, नियमावलीचे काटेकोर पालन आणि जबाबदारीच्या संदर्भातील समस्या आहेत, ज्याची मूळ कारणे आणि प्रभावी उपायांची अंमलबजावणी यांचा सखोल अभ्यास करून त्यातील तंत्रज्ञानाच्या मार्गाने सोडवू शकणारे तोडगे काढणे आवश्यक आहे. या आव्हानांना सार्वजनिकरीत्या संबोधित करून त्याबाबत घेतले जाणारे निर्णय पारदर्शकतेसहित प्रसारित करणे हे या क्षेत्राचे दीर्घकालीन आरोग्य आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे सभासदांचा विश्वास टिकवण्यासाठी प्रयत्न घेणे अत्यावश्यक आहे.

आजमितीला, नागरी सहकारी बँकाचे क्षेत्र सक्रियपणे डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार करत आहे हे निर्विवाद आहे. त्याचा परिणाम सभासद ग्राहकांचा नवीन युगातील बँकासारखा अनुभव आणि तसेच बँक कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करत आहे. मोबाईल बँकिंग असो, आरटीजीएस, एनइएफटी असो ऑनलाइन कर्ज अर्ज दाखल करणे असो वा इतर डिजिटल प्लॅटफॉर्मचा वाढता वापर असो, हे सकारात्मक बदल या बँकाना मोठ्या प्रमाणात सद्य आणि नवीन सभासदांपर्यंत पोहोचण्यास आणि सोयीस्कर, सुलभ सेवा पुरवण्यात सक्षम करत आहे. आधुनिकीकरणावर लक्ष केंद्रित केल्याने या बँकांबरोबर स्पर्धात्मक रुपात उभे आहेत. तसेच सभासदांच्या सतत संपर्कात राहू शकतात.

भारतातील एकूण आर्थिक उलाढालीत नागरी सहकारी बंकांच्या व्यापक आर्थिक व्यवहार, ठेवी आणि कर्जे महत्त्वपूर्ण योगदान देतात हे आता डिजिटल व्यवहाराच्या मार्फत प्रकर्षाने दिसून येत आहे. सद्यपरिस्थितीत रोजगार निर्मितीचे पडद्यामागील इंजिन बनून अथक बोजा खेचत असतात आणि नवीन सहकार मंत्रालय स्थापनेमुळे त्याची योग्य ती दखल घेण्यास सुरुवात झाली आहे. नागरी बँकांसाठीच अंब्रेला ऑर्गनायझेशनचे गठण ही ती घेतलेल्या दाखलेही पुढील पायरीच होय. याद्वारे देशांतील प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यात स्थानिक आणि प्रादेशिक आर्थिक उलाढाल उत्तेजित करून देशाच्या जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान तयार करण्यासाठीची ही मोठी पायरीच म्हणावी लागेल.

स्थानिक आणि प्रादेशिक स्तरावर क्रेडिटी प्रभावीपणे दुर्लक्षित क्षेत्रांमध्ये वळवण्याची, त्यातूनच उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याची आणि लहान व्यवसायांचे समर्थन करण्याची आजच्या भारताची आत्यंतिक गरज भागवण्याची ताकद बँकांना यातून मोठी शक्यता मंत्रालय स्थापनेनंतर उभी ठाकली आहे. नवीन सहकारी तसेच सरकारी धोरणे समावेशिक आर्थिक विकासात या बँकांचे वाढते महत्त्व अधोरेखित करून या धोरणात्मक चौकटी बँकेला देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये अधिक योगदान देण्यासाठी एक सक्षम वातावरण प्रदान करण्याची शक्यता यातून निर्माण होऊ पाहत आहे.

नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन कोऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज नफकब क्षेत्राच्या वाढीस आणि स्थिरतेस समर्थन देणारी धोरणाची मजबूत करते. त्यांचा नियामक बांधणाविषयीचे महत्त्व, धोरणकर्ते आणि भागधारक बँका यांचा समन्वय करून तंत्रज्ञानाच्या क्षेत्राशीही तेवढ्याच हिरीरीने संवाद साधते.

याबरोबरच, व्हॅमनिकोम, सहकारी व्यवस्थापनासाठी एक प्रमुख संस्था, नागरी सहकारी बँका क्षेत्राच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत गेली ५८ वर्षे अथक प्रयत्न घेत आली आहे. व्हॅमनिकोम आज धोरणात्मक बदल यंत्रणा, नियामक आवश्यकता आणि त्यांची व्यावहारिक अंमलबजावणी करणाऱ्या व्यवस्था यांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करते. ही संस्था आज बँकांना आधुनिकीकडील प्रवासासाठी आवश्यक अशा कायदेशीर तंत्रज्ञान विषयांच्या बदलांचा स्वीकार करण्यास शिकवते. असे रिझर्व्ह बँक प्रचलित कायदेशीर तंत्रज्ञान बँकांचे एकूण प्रशासन, व्यवस्थापन आणि व्यवसाय वाढीस गती देण्यास कारणीभूत ठरणार आहेत. शिवाय, आताशा VAMNICOM संस्था ही NAFCUB आणि इतर छत्र संस्थांना समर्थन देण्यासाठी प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी उपक्रम हाती घेते आहे. ही VAMNICOM ची एक अत्याधुनिक जबाबदारी बनत चालली आहे.

अशातच, VAMNICOM चा सहकारासाठीच्या innovation इन्क्युबेटर प्रोग्राम, नवीन credit प्रवेशावर लक्ष केंद्रित करतो आहे. यातील नवकल्पना आणि आर्थिक समावेशनाप्रती त्याची बांधिलकी यामुळे आणखी स्पष्ट होत आहे. दुसऱ्या बाजूस, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने UCBs ला अधिक मजबूत करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत, ज्यामुळे या क्षेत्राची लवचिकता वाढते आणि ठेवीदारांचा विश्वास सुनिश्चित होत आहे.

नवीन कल्पना, तंत्रज्ञान आणि सामुदायिक सहभागावर नव्याने लक्ष केंद्रित करून आणि प्रशासन आणि देखरेख आव्हानांना संबोधित करण्यासाठी विविध स्तरावर चालू असलेल्या प्रयत्नांमुळे, नागरी सहकारी बँकांना क्षेत्र सतत वाढीसाठी सज्ज बनत चालल्या आहेत आणि ही जमेची बाजू त्यांची भारताच्या आर्थिक भविष्यात अधिकाधिक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल यात काही शंका नाही.

**– साभार, अजित अभयकुमार भाले**

संस्थापक, मेट्टारेव सिस्टीमस, पुणे

Mettarev Systems ajit.bhalemettarev.com

**मो. नं. – ९१८००७७५५४५५** ✻✻✻✻

# दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नांदुरा शाखेचे उदघाटन

**खामगाव** – दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ३५ व्या नांदुरा शाखेचे उदघाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे यांच्या हस्ते करण्यात आले. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, सहकार भारती महामंत्री विवेक जुगादे, मलकापूरचे आमदार चैनसुखजी संचेती, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी, नांदूर अर्बन बँकेचे अध्यक्ष चंपालाल झंवर, खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष विजय पुंडे उपस्थित होते.

बँकेच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख वक्त्यांनी केला. बँकेची प्रतिमा जनमानसात पारदर्शी व विश्वासू असून यामुळे बँकेच्या व्यवसायात वाढ होत आहे. बँकेचा नेट एनपीए केवळ शून्य टक्के असून बँक आता दोन हजार कोटींच्या व्यवसायाकडे वाटचाल करीत आहे. बँकेला मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त असून भारतीय रिझर्व बँकेचे संपूर्ण निकष पूर्ण करत बँकेने FSWM चा दर्जा प्राप्त केला आहे. बँकेने एकाच महिन्यात ३



नवीन शाखांचा शुभारंभ केला आहे. बँकेचे अध्यक्ष विजय पुंडे, उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) ज्ञानेश्वर जाधव यांच्या नेतृत्वात बँक प्रगतीपथावर आहे.

## चिंतामणी सहकारी पतसंस्था बँको ब्ल्यू रिबन २०२४ या प्रथम पुरस्काराने सन्मानित

**वर्धा** – येथील चिंतामणी सहकारी पतसंस्थेला बँको ब्ल्यू रिबन २०२४ या प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बँको कोल्हापूर आणि गॅलक्सी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बँको सहकार परिषद आयोजित करण्यात आली होती. परिषदेत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या पतसंस्थांचा उत्कृष्ट कार्यासाठी सन्मान करण्यात आला. माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या संस्थांनी घेतलेल्या चाचणी परीक्षेत आपला सहभाग नोंदवून संस्थेचे व्यवस्थापक सुनील भांदककर यांनी चाचणी परीक्षा पूर्ण केली. यात संस्थेचे पारदर्शी व्यवहार, ग्राहकाभिमुख योजना आणि कार्यालयीन लेखाजोखा देऊन भूमिका मांडली.




## अदिती अर्बन पतसंस्था वाशिम येथील ६२ व्या नूतन शाखेचे उद्घाटन

बुलढाणा – येथील अदिती अर्बन पतसंस्था वाशिम येथील ६२ व्या नूतन शाखेचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी राज्य शिक्षण परिषद समन्वयक नीलेश घुगे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश देवकर, प्राचार्य सतीश ताजने तसेच संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संस्था अध्यक्ष देवकर यांनी प्रस्ताविकात संस्थेच्या आजवरच्या वाटचालीची माहिती सांगितली. मुख्य पाहुणे जाधव यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## हिंगणघाट तालुका सहकार भारती अध्यक्षपदी रामदास खेकारे, महामंत्री नंदकुमार शिंगरू

**वर्धा, हिंगणघाट** – हिंगणघाट तालुका सहकार भारतीच्या अध्यक्षपदी रामदास खेकारे, उपाध्यक्ष अनिल चौधरी, प्रा. लिना शेंडे, महामंत्री नंदकुमार शिंगरु, संघटन मंत्री रणजित डबले, सहसंघटन मंत्री पंकज गांधी, सचिव शंकर चंदनखेडे यांची निवड नुकतीच करण्यात आली आहे. सहकार भारतीचे नागपूर विभाग सहप्रमुख विजय गोटे उपस्थित होते. सहकार भारतीचे वर्धा जिल्हा महामंत्री श्यामकुमार खत्री यांनी हिंगणघाट तालुक्याची सहकार भारतीची नवनियुक्त कार्यकारिणी जाहीर केली. जिल्हा सहकार भारती अध्यक्ष प्रभाकर कोळसे, महामंत्री श्यामकुमार खत्री, संघटन मंत्री मनोज पाचखेडे, सहसंघटन मंत्री प्रशांत मुळे, सचिव भास्कर थोटे, कोषाध्यक्ष गजानन खाडे, बँक प्रकोष्ठ प्रमुख रितेश पीपलवा, आयटी प्रकोष्ठ प्रमुख प्रतीक ढोकपांडे यांची उपस्थिती होती.



**रामदास खेकारे**
**अध्यक्ष**



**नंदकुमार शिंगरू**
**महामंत्री**

महिला प्रमुख विभा कडू, सह महिला प्रमुख पौर्णिमा शिंगरु, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख संजय तराळे महिला पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख सपना जाना, प्रकोष्ठ प्रमुख सोनाली जिवतोडे, अंकेक्षण प्रकोष्ठ प्रमुख यशवंत डोळस, मच्छिमार प्रकोष्ठ प्रमुख शेखर दाते तर कार्यकारी सदस्यपदी रितेश वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली.

## सहकार भारती जिल्हा उपाध्यक्षपदी अरुण भिसे

**यवतमाळ** – जयंत भिसे नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अरुण भिसे यांची सहकार भारती यवतमाळ जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भिसे हे मागील १४ वर्षांपासून पतसंस्थेचे अध्यक्ष आहे. पतसंस्थेला साहाय्यक निबंधक अर्चना माळवे यांनी सदिच्छा भेट दिली.

संस्थेचे व्यवस्थापक श्रीकांत अगस्ती व पंकज उदार यांनी सत्कार केला. सहकार भारतीचे नवनियुक्त उपाध्यक्ष भिसे यांचा साहय्यक निबंधक अर्चना माळवे यांनी सत्कार केला. संस्थेचे व्यवस्थापक, संचालक मंडळ व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## सहकार भारतीच्या वतीने बँकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**अकोला** – दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्ष विजय पुंडे निवडून आले आहेत. यावेळी सहकार भारतीच्या वतीने दोन्ही पदाधिकाऱ्यांचा बँकेच्या मुख्यालयात सत्कार करण्यात आला. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश सचिव विनोद भिमनवार, अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे यांच्यासह केदार खपली, मनिष लखानी, अकोला जिल्हा पदाधिकारी सुनील कुऱ्हेकर, जैनेंद्र लुंकड, खामगाव जिल्हा पदाधिकारी प्रशांत वाणी उपस्थित होते.

# सहकाराचे शिक्षण देणारे विद्यापीठ लवकरच होणार - सहकार राज्यमंत्री मोहोळ

## वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था आयोजित सहकार परिषदेचा समारोप




**पुणे –** सहकार विषयक शिक्षण देणारे आणि अभ्यास करणारे विद्यापीठ सरकारच्या वतीने नजीकच्या काळात उभारण्यात येणार असून याबाबतचे विधेयक संसदेच्या अधिवेशनात मांडण्यात आले आहे. विधेयक संमत झाल्यावर पुढील कार्यवाही होईल, असे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

ग्रामीण भागात सहकार क्षेत्रामुळे शाश्वत विकास झाला आहे. सहकारी बँका यांना देखील बळकटीकरण करण्यासाठी भाजप सरकारने विशेष प्रयत्न केले आहेत असे नमूद करून ते म्हणाले, सहकारातून समृद्धीकडे जाण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे. सेवा सोसायट्या आणि पतसंस्था याची उपयुक्तता वाढत असून सेवा सोसायट्यांना विविध उपक्रमाशी जोडून सक्षम बनविण्यात येत आहे. सन २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर झाले असून आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय सिकटॅब ही आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी झाली असे त्यांनी नमूद केले.

सिकटॅब आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता भारत सरकारचे सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. ग्रामीण विकास, कृषी आणि वनीकरण मंत्रालय, लाओ पीडीआरचे उपमहासंचालक अनोसॅक फेंगथिमावोंग, गांबिया सहकाराचे रजिस्ट्रार जनरल बा जिब्रिल संकरेह, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट संस्थेचे संचालक प्रा. पार्थ रे, इंस्टिट्यूट ऑफ रुरल मॅनेजमेंट गुजरातचे उमाकांत दास वामनिकॉम व सिकटॅबच्या संचालक डॉ. हेमा यादव आदी उपस्थित होते. या परिषदेमध्ये मॉरिशस, बँकोक, नेपाल, श्रीलंका, केनिया, भूतान, नामबिया, झांबिया अशा विविध १३ देशातील तसे भारतातील विविध राज्यातील सहकार क्षेत्रातील नेते, धोरणकर्ते सहकारी तज्ञ एकत्र आले होते. परिषदेमध्ये बारा देशातून प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता.

डॉ. यादव म्हणाल्या की, तीन दिवसीय चाललेल्या या परिषदेमध्ये सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सहकार क्षेत्रातील विचारांची देवाण घेवाण तसेच सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. परिषदेच्या माध्यमातून भविष्यकाळात भारताबरोबर आशिया खंडातील देशांना याचा फायदा होणार आहे. सिकटॅब परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून वॅमनिकॉम संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांना देशाच्या कानाकोपऱ्यात तसेच जगभरात त्यांना सहकार क्षेत्रात रोजगार मिळणार आहे. सूत्रसंचालन सोनल कदम यांनी आणि आभार डॉ. शंतनू घोष यांनी मानले.

आंतरराष्ट्रीय सहकार परिषद

# डिजिटल तंत्रज्ञान व संशोधनामुळे सहकाराला मोठी ताकद



**पुणे –** डिजिटल क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि संशोधन यामुळे सहकार क्षेत्राला मोठी ताकद मिळाली आहे. यामुळे सहकार क्षेत्र जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे असे महासचिव डॉ. प्रसून कुमार दास यांनी सांगितले. सिकटॅब आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था येथे करण्यात आले. यामध्ये भारतासह जगभरातील १३ देशांतील सहकार क्षेत्रातील नेते, धोरणकर्ते आणि सहकारी तज्ञ एकत्र आले होते. परिषेदेचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून अप्राका (ए.पी.आर.ए.सी.ए), बँकॉकचे महासचिव डॉ. प्रसून कुमार दास, एन.आय.आर.डी आणि पी.आर हैदराबादचे महासंचालक आय.ए.एस डॉ. जी. नरेंद्र कुमार, आय.आय.एम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, एन.सी.यु.आयच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी सावित्री सिंग, सानासा श्रीलंकेच्या व्यवस्थापकीय संचालक समदानी किरीवांडेनिया आणि सिकटॅब व वामनिकॉमच्या संचालक डॉ. हेमा यादव आदी उपस्थित होते.

दास म्हणाले की, सहकार क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे भारताच्या खेडे गावापासून ते शहरांपर्यंत मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. भारतात आलेली क्रांतीने देशाला वेगळ्या स्तरावर ती घेऊन गेली. आता सर्वात महत्त्वाचे म्हणजे डिजिटल क्रांतीमुळे शहर आणि गाव यांना जोडण्यासाठी डिजिटल हे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. डिजिटल क्षेत्रात नवनवीन होणारी संशोधन यामुळे सहकार क्षेत्राला डिजिटलमुळे मोठी ताकद मिळाली आहे. डिजिटलमुळे सहकार क्षेत्र जगभरात पोहोचले असून याचा फायदा सहकार क्षेत्राला झाला आहे.

डॉ. यादव म्हणाल्या, सहकार चळवळ केवळ आर्थिक उपक्रमांपुरती नाही, ही चळवळ म्हणजे समाजातील लहानमोठ्या समुदायांना सशक्त करणे, सामाजिक समानता सुनिश्चित करणे आणि टिकाऊपणा वाढवणे आहे. ही परिषद भविष्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. जिथे डिजिटल परिवर्तन आणि सहकारी तत्त्वे लवचिक अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी काम करेल. मेत्री म्हणाले की, भारत देश हा जगाचा मध्यबिंदू बनला आहे. जेव्हा डिजिटायझेशनचा विचार केला जातो तेव्हा ते यु.पी.आय. असो किंवा डी.सी. असो, यामध्ये भारताचा जगभरात दबदबा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे मोठ्या प्रमाणात ते कृषी अर्थव्यवस्था आहे. तिला तिचे बळकटीकरण करण्यासाठी म्हणून तिला कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामध्ये गावांपैकी सर्वात लहान गावांना मोठ्या गावाशी जोडण्याचा निर्णय घेतला गेला, तेव्हा सहकार क्षेत्रात त्याचा फायदा झाला.

समदानी म्हणाल्या, सहकार क्षेत्रात भारताचा मोठा वाटा आहे. सहकार क्षेत्रातील अनेक बारकावे भारत देशाकडून शिकत आहेत. श्रीलंका देश भारताला सदैव सहकार क्षेत्रात मोठे होताना पाहताना त्याचा आनंद होईल. सिंग म्हणाल्या राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (सिकटॅब)ची स्थापना १९५८ मध्ये झाली. ही संस्था दरवर्षी २००हून अधिक कार्यक्रम आयोजित करते. शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे देशभरातील क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि अल्पकालीन कार्यक्रम तसेच दरवर्षी सात ते आठ हजार व्यक्तींना प्रशिक्षण देते.

# सहकारी बँकांकडे पाहण्याचा रिझर्व्ह बँकेचा दृष्टीकोन सकारात्मक - सतीश मराठे

**महाबळेश्वर –** सहकारी बँकांच्या माध्यमांतून समाजाच्या तळागाळातील लोक बँकिंग क्षेत्राशी जोडले जातात. कोरोनानंतरच्या काळात सहकारी बँकांच्या कर्जवसुलीवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे सहकारी बँकांची आर्थिक स्थिती कमकुवत होते काय असा प्रश्न होता. मात्र सहकारी बँकाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या बँकांबाबतचा रिझर्व्ह बँकेचा दृष्टीकोन सकारात्मक आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.



सहकार भारती कोल्हापूर विभागाच्या वतीने सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी बँकांचा महाबळेश्वर येथे प्रशिक्षण वर्ग पार पडला. यावेळी नागरी सहकारी बँकांचे पदाधिकारी, अधिकारी यांना मार्गदर्शन करताना मराठे बोलत होते. सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे, संघटक संजय परमने, सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, महाराष्ट्र सहकारी बँक्स असोसिएशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक राजेंद्र राजपुरे, सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक संजय सुद्रीक, महाबळेश्वरचे सहाय्यक निबंधक क्षीरसागर उपस्थित होते.

देशातील १४०० बँकांमध्ये एकही बँक पीसीएमध्ये (प्रॉम्प्ट करेक्टिव्ह अॅक्शन) नाही. ही समाधानकारक बाब आहे. असे नमूद करून ते म्हणाले, देशातील ५५ कोटी सर्वसामान्यांची जनधन खाती नागरी सहकारी बँकांमध्ये आहेत, त्यामुळे सामान्यांना सहज बँकिंग सेवा उपलब्ध करून देणारी प्रणाली नागरी बँकांकडे आहे. देशातील १०० कोटींहून अधिक लोक मोबाईलचा वापर करतात तर ७५ कोटी जनता इंटरनेट वापरत आहे. सायबर सिक्युरिटी ही बाब सर्वांना पाळावी लागणार आहे. सायबर घटना ही समस्या सरकारपुढे आव्हान निर्माण करीत आहे. नागरी सहकारी बँकांनी आपली टेक्नॉलॉजी वरचेवर अपग्रेड करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे व्यवसाय वाढवून कर्मचारी खर्च व भांडवली खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

सहकारी बँकांमध्ये समन्वय ठेवून एकमेकांची टेक्नॉलॉजी वापरता येतेय का, ते पाहावे. मोठ्या बँकांनी छोट्या बँकांना माफक दराने टेक्नॉलॉजी उपलब्ध करून द्यावी. भारतीय रिझर्व्ह बँक जगभरातील मध्यवर्ती बँकांच्या तुलनेत चांगली कामगिरी करीत आहे. अनेक देशाच्या मध्यवर्ती बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तंत्राचा अभ्यास करण्यासाठी भारतात येत आहेत, ही देशाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. देशातील बँकांमध्ये ग्रॉस एनपीएचे प्रमाण २ टक्क्यांपेक्षा कमी तर नेट एनपीए एक टक्क्यांपेक्षा कमी आहे. भारतात साडेसात लाख गावे आहेत. जगाच्या मानाने भारताने पेमेंट सिस्टिममध्ये खूप मोठी प्रगती केली आहे. त्यात दिवसेंदिवस वाढ होत असून टेक्नॉलॉजीमध्येही झपाट्याने बदल होत आहे. ज्या गतीने यामध्ये बदल होत आहे. ते पाहता येत्या चार-पाच वर्षांत बँकिंग क्षेत्राला प्रगती करण्यासाठी चांगला वाव आहे. संधी आहेत, त्या दृष्टीने सहकारी बँकांनी आपली दिशा ठरवली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनी सहकारी बँकांच्या बदलेल्या लेखापरीक्षणाची माहिती सांगितली. रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांच्या अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षणासाठीचे बदलेले परिपत्रक विस्तृतपणे उपस्थितांसमोर मांडले.

वस्तू व सेवा करविभागाचे निवृत्त सहआयुक्त विद्याधर गोखले यांनी प्रतिनिधींना केवायसीबाबत दक्षता घेण्यास सांगितले. शासनाच्या प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग अॅक्टविषयी माहिती सांगितली. सहकार भारतीचे कोल्हापूर विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप, सहप्रमुख नरेंद्र गांधी, सातारा जिल्हा अध्यक्ष डॉ. रवींद्र भोसले, प्रदिप दिक्षित, श्रीकांत पटवर्धन, धोंडीराम पागडे, दीपक बावळेकर, मल्हारी पेटकर, प्रशांत कात्रट, दत्तप्रसाद जाधव, दत्तात्रय पवार, विनायक भिसे, शशिकांत पवार आदींनी स्वागत केले. आनंद शेलार यांनी सूत्रसंचालन केले.

# सहकारी संस्थांचे क्षेत्रीय कार्यालय पुण्यात होणार

**पुणे –** केंद्रीय सहकारी संस्थांच्या निबंधक कार्यालयाची क्षेत्रीय कार्यालये नव्याने निर्माण करण्याची गरज असून यामुळे बँकांना सोयी सुविधा उपलब्ध देण्यात कोणतीही अडचण येणार नाही हे लक्षात घेता सहकारी संस्थांचे पहिले क्षेत्रीय कार्यालय नजीकच्या काळात पुण्यात सुरू करण्यात येणारा असल्याची माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितली.

ते म्हणाले, सीआरसीएस कार्यालये सुरू करण्याचे श्रेय हे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आहे असे नमूद करून ते म्हणाले, देशातील क्षेत्रीय कार्यालये देखील त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात येणार आहेत. या माध्यमातून शेड्युल्ड को-ऑपरेटिव्ह बँकांना ताकद देण्यात येणार आहे. राष्ट्रीयीकृत बँकांशी स्पर्धा करण्यासाठी आणि सहकारी बँकांमध्ये नवीन कल्पना राबविण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली आहे.

देशभरात १४६५ अर्बन को-ओपरेटिव्ह बँका असून त्यातील ४६० बँका या महाराष्ट्रात आहेत. अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकासाठी शिखर संस्थांचा विषय प्रलंबित होता. त्या शिखर संस्थेसाठी ३०० कोटींचा निधी संकलित करण्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. ही शिखर संस्था आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणाऱ्या सहकारी बँकांना मदत करणार आहे. तसेच नागरी सहकारी, राज्य सहकारी, जिल्हा मध्यवर्ती बँकासाठी स्वतंत्र क्लिअरिंग हाऊस राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

या नवीन कार्यालयामुळे बँकांच्या विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी हातभार लागणार आहे. अशी अपेक्षा सहकार क्षेत्रांतून वर्तवण्यात येत आहे.

# नाशिक सहकार भारतीचे सहसचिव साहेबराव पवार सन्मानित



**सातारा –** सहकार भारती नाशिक शहर सहसचिवपदी साहेबराव पवार यांची निवड झाल्याबद्दल राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. महाबळेश्वर येथे नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फेडरेशन अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, अपर सहकार आयुक्त शैलेश कोथमिरे, उपाध्यक्ष भरत कोठावदे तसेच अन्य संचालक पदाधिकारी उपस्थित होते. नाशिकमधील सहकार भारतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पवार यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# आजच्या काळातही महिला विकासात्मक कामात अग्रेसर



श्रीमती अनुराधा कोल्हापुरे

महिला आजच्या युगामध्ये कोठेही कमी नाहीत. जुन्या नव्या युगातील सर्व क्षेत्रे महिलांनी पादाक्रांत केलेली आहे. अनेकविध संस्थांवर महिला काम करीत आहे. या सर्व गोष्टींमध्ये त्यातल्या त्यात अवघड काम म्हणजे आर्थिक क्षेत्रात काम करणे, एखादी बँक किंवा पतसंस्था चालवणे होय.



उत्कर्ष पतसंस्था संस्था फार नावाजलेले आणि विश्वासाला पात्र असलेली ही संस्था दिमाखाने काम करत आहे. पण आर्थिक संस्था चालवणे फार अवघड आहे हे लक्षात आले. सुरुवातीला वाटले सर्वांची साथ आहे तर होईल सोपे पण तेवढे सोपे नाही. काम करताना बारीक सारी गोष्टी किती अडचणीच्या आहेत हे लक्षात आले. आजकाल आर्थिक क्षेत्रामध्ये प्रचंड उलाढाली होत आहेत. अनेक नावाजलेल्या बँका पतसंस्था डबघाईला आल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी संचालकांची चूक असेल असेही नाही पण काही कारणाने अडचणीत आलेल्या बँका पतसंस्था पाहत आहे. अशा वेळी लोक संभ्रमात आहेत की नक्की आता विश्वास ठेवणार तरी कोणावर?

एखाद्या बँकेमध्ये आपण पैसे ठेवले आणि बँक अडचणीत आली, बँक डुबली तर व्याज राहीलंच, पण मुद्दलही हाती पडेल की नाही याची शाश्वती नसते. अशा वेळी संस्थेला सभासदांना दिलासा देणे आणि चांगले काम करत राहणे हे आपल्या हातात आहे. सध्या डिजिटल युग आहे अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे. त्यामुळे बँकेचे व्यवहार सहज सोपे होतात पण त्यातही धोके आहेत. पूर्वी कॅशने पैसे देणे घेणे असायचे, मोजून पैसे घेणे व्हायचे. सह्या व्हायच्या समोरासमोर, पण आता तसं नाही. आता एखादी सूक्ष्म चूकसुद्धा कोटीच्या कोटी रकमेचा घात करू शकतो. त्यामुळे काळजी घ्यावी लागते. लोक आता संस्थेत ठेवीचे व्याजदर किती आहे हे पाहत नाही. संस्थेवर काम करणारी माणसं कशी आहेत. किती प्रामाणिक आहेत हेसुद्धा पाहतात. बरेच सुज्ञ लोक फक्त संचालक मंडळ यांच्याकडे पाहूनच ठेवी ठेवत असतात.

महिलांमध्ये आर्थिक साक्षरता येणे फार गरजेचे आहे. पैशाचे बँकेचे व्यवहार महिलांनी स्वतः करावे, स्वतः बँकेत जावं, माहिती घ्यावी. घरात कोण कर्ज काढतंय का यावर लक्ष द्यावे. कारण पैशाचे नियोजन महिला उत्तम प्रकारे करू शकतात. बऱ्याचदा घरातील पुरुष मंडळींनी कर्ज काढलेले असते आणि घरच्या महिलांना माहीत नसते. मग वसुलीला गेल्यानंतर महिलांना ते कळते आता जास्तीत जास्त महिला या सशक्त स्वावलंबी झालेल्या आहेत. मोकळेपणाने हिंडत फिरत आहेत. काम करत आहेत.

आपण कितीही स्त्री-पुरुष समानतेचा डंका वाजवला तरी निसर्गानेच स्त्री आणि पुरुष यामध्ये काही फरक ठेवलेला आहे, तो योग्यच आहे. तरच हा समाज व्यवस्थित चालू शकेल. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. करिअर करण्यास हरकत नाही. पुढे जाण्यास हरकत नाही पण कितीही पुढे आपण गेलो तरी आपली भारतीय संस्कृती. स्त्रियांची शालिनता हाच स्त्रीचा दागिना आहे ते नक्कीच जपलं पाहिजे. एखादी स्त्री कमवत नसेल सोशल वर्क करत नसेल. फक्त ती घरात असेल आणि उत्तम संसार करत असेल. मुलाबाळांचे पाहत असेल. घरच्या पुरुषांची देखभाल. हवं नको ते बघत असेल तर यात कमीपणा मानू नये. कर्तव्य करण्यात काही कमीपणा असू नये.

महिलांनी इतरांबरोबर काही तुलना न करता आपल्याकडे आहे. त्यातच समाधान मानून उत्तम संसार करावा व जीवनाचा आनंद घ्यावा.

**– श्रीमती अनुराधा आनंद कोल्हापुरे**
**अध्यक्ष, उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित वाई**

*****

# महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे

‘भारतातील महिला ही केवळ सबल नव्हे तर आर्थिकदृष्ट्या सक्षम बनली पाहिजे’, या एकाच ध्येयाने प्रेरीत होऊन ३० वर्षांपूर्वी विद्यार्थी परिषदेच्या मुशीत तयार झालेल्या सक्षम मैत्रिणींनी उद्यमी महिला पतसंस्थेची स्थापना केली.

केवळ आर्थिकच नव्हे तर स्त्रीचा सर्वांगीण उन्नतीचा विचार करून गेल्या ३० वर्षांपासून महिलांसाठी विविध उपक्रम, प्रशिक्षणे, कार्यशाळा, आरोग्यविषयक जागरूकता या विषयांमध्ये उद्यमी पतसंस्था काम करीत आहे. दर महिन्याला प्रशिक्षण घेत असते. यात इन्स्टंट पीठ बनविणे, आकाशकंदील बनविणे, गणपती बनविणे प्रशिक्षण, तोरणे बनवणे हे तर असतेच. परंतु महिलांनी बनविलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, यासाठी आपण ३ दिवसीय प्रदर्शन व विक्रीही ठेवतो. स्त्रीचे आरोग्यासाठी हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी शिबीर. त्यासंबंधी गोळ्या वाटप असे वेगवेगळे उपक्रम आपण राबवीत असतो.

महिलांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी उद्यमीने वेगवेगळ्या कर्ज योजना केलेल्या आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी, वाहनासाठी, उत्सवकर्ज, गृह त्यांत अशा योजना आहेत. कर्जासोबत ठेवींवरही आकर्षक व्याजदरामध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी ठेव योजना आहेत. दिवाळीत १% जास्त व्याजदरावी धनलक्ष ठेव योजना.

स्वयंसहाय्यता कर्ज योजना व आत्मनिर्धार कर्ज योजना यातून तर हजारो महिला स्वावलंबी झालेल्या आहेत.

सहकार भारतीच्या प्रशिक्षणाअंतर्गत आमच्या संचालिका व कर्मचारी नेहमीच भाग घेऊन परसंस्थेच्या विकासात कार्यरत असतात. सहकार भारतीच्या अधिवेशनांमध्ये देखील संचालिका सहभागी होत राष्ट्रीय सहकारीता धोरणांनुसार वाटचाल करीत असतो. वेगवेगळ्या बचत योजना असून यात जेष्ठ नागरिकांसाठी अर्धा टक्का जास्त व्याजदर दिला जातो.

उद्यमी महिला पतसंस्था गेल्या ३० वर्षांपासून ठामपणे उभी असून त्याचा आता वटवृक्ष झालेला आहे. उद्यमीचा आर्थिक समतोल साधण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचारीवर्ग सतत प्रयत्नशील असतो त्यामुळे आत्तापावेतो उद्यमीने ऑडीट वर्ग ‘अ’ कायम राखला आहे आणि आम्हाला याचा सार्थ अभिमान आहे. सध्या उद्यमीची वाटचाल उद्यमीच्या अध्यक्ष सौ. पद्मजा अत्रे, उपाध्यक्षा सौ. मनिषा खडके व व्यवस्थापकीय संचालीका सौ. प्रिती गुजराथी यांच्या सोबतीने सुरू आहे.

महिलांच्या आत्मनिर्भरते सोबतच आता विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना बळ देण्यासाठी उद्यमी पतसंस्थेने एक पाऊल पुढे टाकत, ‘उद्यमी सेवा प्रतिष्ठान’ नावाचा सेवा प्रकल्प सुरू केलेला आहे. हुशार होतकरू पण आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणासाठी या प्रतिष्ठान मार्फत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**– सौ. पद्मजा अत्रे, अध्यक्षा,**
**उद्यमी महिला नागरी पतसंस्था, जळगाव.**

# महिलांसाठीच्या विविध योजना



सर्व स्त्रीवर्गाला माझा नमस्कार आणि महिला दिनाच्या खूप शुभेच्छा!! मार्च महिना येतो तोच आनंदाची लहर घेऊनी येतो. आपला विशेष अधिकाराचा दिवस महिला दिन मोठ्या दिमाखात साजरा करायचा असतो. महिला अगदी बोलघेवड्या असतात असं म्हणतात आणि ते अगदी खरं आहे. कितीही वय वाढलेले असले तरीदेखील एकत्र आल्यावर ज्या काय गप्पा मारतात, त्याला तोड नसते. कुठले काय त्यांना सापडते आणि एकमेकींना सांगत सुटतात. त्यातली गंमत, मज्जा, मोकळेपणे हसणे चिडवणे आणि गमाडीगंमत!



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

सरकार यंत्रणेत आणखीन एका महिलेने प्रवेश केला आहे. महिला वर्गाची काळजी घेणारे त्यांना प्रोत्साहन देणारे सध्याचे सरकार आहे हे परत एकदा सिद्ध झाले आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून श्रीमती रेखा गुप्ता यांची निवड केली आहे. त्यांचे आपल्या सर्वांकडून अगदी मनापासून अभिनंदन आहे. मुख्यमंत्री रेखा ताई तुमचा अभिमान आहे. आपले अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा!

राज्य व केंद्र सरकारद्वारे अनेकविध प्रकारच्या योजना खास करून स्त्री वर्गासाठी राबविल्या जातात. एक स्त्री शिकली, नीट स्थिरस्थावर झाली तर संपूर्ण घर, पुढची पिढी स्थिरतेने जगू लागते. महिलांसाठी व्यवसाय निर्मिती करून स्वत:च्या पायावर उभे राहून सक्षमतेने त्यांचे जीवन आनंदी करण्यासाठीची धडपड सरकारी योजनांद्वारे होताना दिसते. त्यांची कमाई त्यांच्या गरजा पुरविणारी असली पाहिजे. महाराष्ट्र सरकारच्या आत्ता चालू असलेल्या काही योजनांची नामावली फक्त इथे देते. सरकारी केंद्रावर जाऊन त्याचा विशेष अर्ज भरावा.

**१. लेक लाडकी योजना (२०२३)** – मुलींच्या शिक्षणाला बळकटी व चालना देणे. त्यांना सशक्त, आत्मनिर्भर, खंबीर, प्रबळ बनविताना आखलेली योजना होय.

**२. महिला उद्योगिनी योजना** – स्त्रिया उत्तम व्यवसाय करू शकतात, हे सिद्ध झालेले आहे. त्यांची संख्या वाढवण्याचे लक्ष समोर ठेवून आखलेली योजना होय. यातून लघु उद्योग व्यवसाय, किरकोळ विक्रेते, उत्पादक, आणि स्वयंरोजगार करण्यासाठी सरकारकडून अर्थ साहाय्य देण्याची सोय केलेली आहे.

**३. स्वर्णिमा योजना** – स्वयंरोजगार योजनेचा एक भाग आहे. मागासवर्गीय उद्योजक महिलेस उद्योगासाठी कर्ज उपलब्ध केलेले आहे. नॅशनल बॅकवर्ड क्लासेस फायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनद्वारे कमी व्याजदरात कर्ज उपलब्धता सोय केलेली आहे.

**४. उद्योजक धोरण योजना** – महिला उद्योजकांचा व्यापक वैविध्यपूर्ण विस्तार झालेला आहे. सर्व क्षेत्रांत त्यांनी मुसंडी मारलेली दिसते. स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी २० लाखापासून ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्धता या योजनेद्वारे देण्यात येते. इथे भांडवल सुरूवातीलाच अधिक दिल्याने व्यवसायवृद्धी करणे सहज शक्य होऊ शकते.

**५. महिला सन्मान योजना** – महाराष्ट्रभर स्टेट ट्रान्स्पोर्ट म्हणजे एसटी प्रवासामध्ये महिलांसाठी ५० टक्के सूट देण्याची ही योजना आहे. त्याने महिला आपल्या मैत्रिणींबरोबर अधिकच्या संख्येने फिरायला बाहेर पडायला लागलेल्या दिसतात.

**६. महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना** – पतीनिधनानंतर विधवेचे जिणे अडचणीचे होते खरे. राज्यशासन महिला कल्याण विभागाकडून विधवांना पेन्शन देण्यात येते. दरमहा सुरूवातीला रु. १०००/– पेन्शन देऊ केलेली आहे.

**७. प्रधानमंत्री मातृवंदना योजना** – यामध्ये गरोदर आणि बाळाला अंगावर पाजणाऱ्या स्त्रियांना रु.५०००/–आर्थिक मदत केली जाते. पुढील पिढीचे पोषण योग्य प्रकारे व्हावे, सर्व बालके सुदृढ सशक्त वाढावीत हा हेतू स्पष्ट आहे. ही योजना केंद्र सरकारची आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयामार्फत सहाय्य करण्यात येते.

**८. माझी कन्या भाग्यश्री योजना** – प्रमाण सुधार यासाठीची त्यांना आर्थिक दिलासा देणारी योजना आहे. पहिली मुलगी झाल्यावर रु. ५००००/– ची ठेव पावती दिली जाते. दुसरी मुलगी झाल्यावर दोघींच्या नावाने रु. २५,०००/– अशा दोन पावत्या केल्या जातात. पावतीस सहा वर्ष झाल्यावर पालक त्याचे व्याज काढू शकतात. आणि पावतीची रक्कम मुली १८ वर्षांच्या झाल्यावर काढता येतात.

**९. सुकन्या समृद्धी योजना** – 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' – वय वर्षे १० वर्षांच्या आतील मुलींची खाते आईवडील काढू शकतात. दरवर्षी ठराविक पण अधिकतम दीड लाख रुपये खात्यात भरता येते. नंतर मुलीचे शिक्षण व लग्न यासाठी पैसे काढता येतात. २१ वर्षे तिला पूर्ण झाल्यावर सर्व रक्कम केवळ तिच्यासाठी म्हणून काढता येते, यास उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

**१०. जननी सुरक्षा योजना** – योजनेद्वारे गरीब कुटुंबातील गरोदर महिलेस आर्थिक मदत देऊन तिची काळजी तिने घ्यावी व बाळाला पोसावे. शासनाकडून रु.१४०० मदत होते. शिवाय प्रसुतीचे वेळी अधिक रक्कम दिली जाते. नंतर तिचे स्वत:चे व बाळाचे संगोपन उत्तमरीत्या होणे गरजेचे असते.

**११. महिला समृद्धी कर्ज योजना** – सामाजिक न्याय व सहाय्य विभागाकडून काही महिलांना व्यावसायिक कर्ज देणारी योजना आहे. स्वत: उद्योग सुरू करणे महत्त्वाचे समजून त्यांना प्रोत्साहित केलेले आहे.

**१२. लाडकी बहीण योजना** – २०२४ च्या अंतरिम अर्थसंकल्पात योजनेची घोषणा झाली. प्रतिमहा रु.१५००/– देऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना देऊन खुश केले आहे. आता त्यांच्या अर्जांची छाननी होऊन मगच पुढील हप्ता दिला जाईल. या अशा एक डझन योजना इथे नमूद केल्या आहेत. वर्तमानपत्रातून यांचा बोलबाला असतो. नवीन योजना आली तर कशी हे अभ्यासा आणि हवा असेल तर फायदा देखील घेऊ शकता. आता... दुसरी महत्वाची यादी इथे देते. स्त्री वर्गाची सुरक्षा हा मुद्दा बिकट होताना दिसतो. तेव्हा एकटीने जाताना भीती वाटेल अशी परिस्थिती काही भागात प्रत्येक गावात असते. तेव्हा त्यांना जर काही त्रास झाला, जीवावर बेतेल असे काही होणार असेल तर तिला त्वरित मदत ही मिळालीच पाहिजे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने काही फोन नंबर्स जाहीर केलेले आहेत. त्यांची यादी पुढे देत आहेत.

**१. पोलीस – १००, ११२ – ११२ नंबर लगेच लागतो.** त्यांना हा फोन कुठून आला आहे, त्यांची जागा बरोबर समजू शकते. त्यातून ती स्त्री वा मुलगी काहीच बोलू शकत नाही, अशीही परिस्थिती असू शकते. तेव्हा पोलिसांना मिळालेल्या जागेवर त्वरित अगदी १०/१५ मिनिटात पोलिसांची टीम तिथे पोहोचते आणि मुलीला मदत केली जाते. सर्व प्रकारची चौकशी होते.

**२. तत्काळ सेवा पोलिसांची – १९०६ ३. संकट काळी त्वरित मदत – १०९१, १०९०, ११२. ३. घरगुती हिंसा – १८१. ४. महिला रेल्वे सुरक्षा – १८२. ५. लहान मुलांसाठी मदत घेणे – १०९८. ६. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग – १४४३३. ७. राष्ट्रीय महिला आयोगात तक्रारीसाठी – +९१ ११२६९४४८८० // ११२६९४४८८३. ८. चुकीचे कॉल येत असतील तर कळवायचे – १९३०. ९. पीएमसी केअर – पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन – १४४५२. १०. स्वयंपाक गॅस समस्या निराकरण – १९०६ // महाराष्ट्रासाठी**

आत्ता आणखीन एकच महत्त्वाची गोष्ट इथेच सांगते. महिला दिनानिमित्त

**पुढील पानावर...**

# सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग आणि वाढीचे प्रयत्न



सौ. अश्विनी आठवले

'विना संस्कार नहीं सहकार, विना सहकार नहीं उद्धार', सहकारभारतीचे हे ब्रीद वाक्य. सहकार क्षेत्रातील विविध प्रकोष्ठमध्ये ब्रीदवाक्याप्रमाणे सहकार रुजला पाहिजे ही यामागची भावना!

पूर्वीच्या काळी उत्पन्नाची इतर साधने नसताना पुरुष मंडळी जंगलातून आहाराकरिता कंदमुळे, फळे, अन्न-साहित्य गोळा करून आणित असत, यावर प्रक्रिया करून महिला खाण्याकरिता अन्न शिजवित असत. तसेच इतरही कामे एकमेकांच्या मदतीने केली जात होती. एकमेकांच्या सहकार्याने सहकाराची उत्पत्ती झाली असे म्हणायला हरकत नसावी. स्त्रीयांशिवाय सहकार संकल्पना रुजूच शकत नाही. वेद, पुरातन काळातदेखील महिलांना दैनंदिन कार्यामध्ये महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. कालमानानुसार यामध्ये खूप बदल होत गेले. परंतु सहकार्य करणे यात बदल झालेला दिसून येत नाही.



कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणे, आर्थिक नियोजन अशी कामे महिला उपजतच पार पाडीत आहेत. आर्थिक व्यवस्थापन हा तर महिलांचा हातखंडाच विषय. बचत करण्याच्या साधनांमध्ये, प्रकारामध्ये वेळोवेळी बदल होत गेले. यातीलच एक प्रकार पोस्ट खात्यातील बचत, पोस्ट खात्यामधील बचत प्रतिनिधी घरोघरी जाऊन महिलांकडून पैसे घेऊन त्यांच्या बचत खात्यात पोस्टात भरली जाते. तसाच पिग्मी, बचत गट हा प्रकार. या प्रकारामध्ये प्रचंड प्रमाणात महिलांचा सहभाग असतो. आर्थिक उलाढालींमधून एकमेकींना सहकार्य केले जाते. पोस्ट खात्यातील बचत प्रतिनिधी म्हणून नवीन पिढी काम करू इच्छित नाही. पिग्मी प्रकार बऱ्याच प्रमाणात कमी झालेला आहे. साहजिकच महिलांना बचतीस प्रवृत्त करणे बंद झाले. बचत गटांमधून मिळालेली रक्कम योग्य कारणाकरिता, योग्य व्यक्तींनी न वापर केल्यामुळे बचत गट संकल्पना धोक्यात आहे. बचत गटांमधील थकबाकी वाढत आहे. कुटुंबच्या कुटुंबे यामुळे उध्वस्त झालेली दिसून येतात. कायद्यानुसार बँक / पतसंस्था यांच्यामार्फत महिलांना कर्ज वाटप केले तर कर्ज वसूल करण्यास बंधने आहेत. साहजिकच बँक / पतसंस्था महिलांना कर्ज देणेस टाळाटाळ करतात. कर्ज वाटप होत नाही, महिला आर्थिक व्यवहारात सहभागी होऊ शकत नाहीत.

वरील दुष्परिणाम टाळणेकरिता महिलांच्यात बँकिंग, आर्थिक साक्षरता वाढविणे गरजेचे आहे. व्यवहारातील अशिक्षितपणा कमी होऊन महिलांना आर्थिक व्यवहार येणे अपेक्षित आहे. हल्ली खूप महिला सुशिक्षित आहेत. परंतु त्या पडद्यामागची भूमिका पार पडताना दिसत आहेत. यांना प्रोत्साहन, सुरक्षिततेची खात्री दिली गेली तर नक्कीच त्या सहकार क्षेत्रात सक्रियतेने काम करू शकतील. सहकार कायद्यानुसार महिलांना फक्त २% आरक्षण आहे. यात वाढ होणे आवश्यक आहे, तर महिलांचा सहभाग नक्कीच होईल. घरी महिला आर्थिक व्यवस्थापन करू शकतात तर सहकार क्षेत्रात का करू शकत नाहीत? काही ठिकाणी महिला आरक्षण असले तरी इतर व्यक्ती कारभार पाहत असतात. महिलांनी सहकार क्षेत्रातील आपापली जबाबदारी सक्षमपणे सांभाळली तर हे प्रमाण नक्कीच कमी होईल. यारिता प्रशिक्षण घेणे, निरनिराळ्या संस्थाना भेटी देणे, यशस्वी महिलांचे अनुभव ऐकणे, महिलांना एकत्रित करून विविध मेळावे, महोत्सव, अधिवेशनाद्वारे मार्गदर्शन प्रशिक्षण करणे अपेक्षित आहे. गावागावांमधील महिलांचा सहभाग सहकार क्षेत्रात वाढविणे करिता नवीन संस्था स्थापन करणे, त्या चालविणेकरिता मार्गदर्शन, घरबसल्या उद्योग उभारणी, मार्केटिंग, व्यवसाय उत्पादन, आर्थिक मदत पुरवठा करणाऱ्या योजना अशा अनेक विषयांचे प्रशिक्षण द्यावे लागेल. ज्या आर्थिक संस्थांमध्ये महिलांचा सहभाग आहे, अशा महिला संस्थांना शासनामार्फत अनुदान, सहकार विभागाकडून प्रोत्साहन, महिला महामंडळ अंतर्गत आर्थिक मदत मिळाली तर थकबाकी प्रमाण नक्कीच कमी होईल आणि महिलांचा सहकारातील सक्रीय सहभाग वाढू शकेल. बँक / पतसंस्था यांमध्ये महिला संस्थांचा वेगळा असा उपविधी नाही. यातही महिलांच्या दृष्टीने काही बदल केले तर निश्चितच सकारात्मक बदल होऊ शकतील.

सहकारभारती महिला प्रकोष्ठ तालुका, जिल्हा, राज्य स्तरावर महकार क्षेत्रातील महिलांचे करिता सातत्याने कार्य करीत आहे. बँक / पतसंस्थांमध्ये विविध पदावर काम करणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देण्यात येते. परंतु खूपच कमी प्रमाणात महिला सहभागी होतात. काही महिलांनाच प्रशिक्षणास यायला नको असते. काही मंडळीचा महिलांच्या कार्यक्षमतेवर विश्वास नसेल किंवा त्यांना प्रशिक्षित करायचे नसेल असाही उद्देश असू शकतो. यात व्यक्ती व्यक्ती असा मतभेद नाही तर महिलांना सक्षमतेने त्यांची जबाबदारी पेलता आली पाहिजे असा विचार आहे. सहकार भारती महिला अधिवेशन, मेळावे, शिबिरे याद्वारे महिलांना प्रोत्साहन, मार्गदर्शन करीत असते.

दि. ८ मार्च रोजी दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या एकच दिवशी काही ठिकाणी ढीगभर कार्यक्रमातून महिलांना मानसन्मान दिला जातो. महिला आर्थिक, बँकिंग साक्षरतेद्वारे सहकार क्षेत्राच्या प्रवाहात आल्या तर हर दिन महिला दिन होईल, हाच खरा मान आणि सन्मान स्त्रीचा असेल. जय सहकार!

**– सौ. अश्विनी जयंत आठवले, इस्लामपूर**
सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य,
संचालिका, सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. सांगली

*****

मागील पानावरून...

## महिलांसाठीच्या विविध योजना...

महत्त्वाचे काय तेच सांगते... सर्व सहकारी बँकांनी यावर्षी हा दिवस आपल्या बँकेत साजरा करावा, असे सुचवावेसे वाटते. त्यातही महिला डायरेक्टर्स असलेल्यांनी यामध्ये लक्ष घालावे. तो दिवस म्हणजे महिला शेतकरी दिवस – प्रतिवर्षी १५ ऑक्टोबर रोजी. २०१७ मध्ये १५ ऑक्टोबर तारखेला शेतकरी महिला दिन म्हणून सरकारने घोषित केले आहे. आपण तर ८ मार्चला साजरा करतो. पण, त्या शेतकरी महिलांना आपल्यासाठीही एक स्वतंत्र दिवस मागील ७ वर्षांपूर्वीच ठरवला गेला हे देखील माहिती नसते. दरवर्षी यावर लेख लिहून लोकांपर्यंत हे सर्व पोचवले आहे. म्हणून या २०२५ साली १५ ऑक्टोबर रोजी प्रत्येक बँकेने आपल्या शाखांमधून अथवा गावात एकत्रितरित्या ज्या शेतकरी वर्गाची बँकेत खाती आहेत, त्यांच्या कुटुंबातील आया बहिणींना बँकेत बोलावून त्यांचा सन्मान करावा. चहा कॉफी थोडासा खाऊ देऊन त्यांच्याशी गप्पा माराव्यात. असे सुचविते. ज्या बँकेत असे करायचे ठरेल, प्रत्यक्षात केले जाईल ते सांगावे. याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात गावोगावी हा दिवस साजरा केला गेला तर खऱ्या अर्थाने अन्नपूर्णेची खणा नारळाने ओटी भरल्याचे पुण्य आपणा सर्वांना मिळेल. अन्नदात्री तीच आहे आपली. तिची आठवण ठेवून १५ ऑक्टोबरला तिचा सन्मान करा.

**– वंदना धर्माधिकारी** Vandana10dyahoo.co.in
**मो.नं. :** 9890623915 *****

# उद्योग व्यवसायाबरोबरच महिलांनी छंदही जोपासावे

लोकोत्तर पुरुषांचा वारसा त्याच तडफेने पुढे चालविणे ही अवघड गोष्ट असते. पण समर्पित वृत्तीने त्याचा वारसा चालविण्याची जबाबदारी शिरावर घेतली तर हा वारसा अवघड न वाटता, लिलया पेलण्याचे सामर्थ्य आपोआप येते. माझे सासरे स्व. दादासाहेब सावंत, पती स्व. अण्णासाहेब सावंत यांचा सहकार, शिक्षण, समाजकारण या क्षेत्रातील वारसा या दोन लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांच्या पश्चात समर्थपणे सांभाळून या ही क्षेत्रांमध्ये आपले वेगळे असे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

जन्म मुंबईतला. सर्व शिक्षण मुंबईतच झाले. विल्सन महाविद्यालयातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांची पदवी प्राप्त केली. माहेरच्या घरातून व्यवस्थापनाचे बाळकडू मिळाले. वडिलांनी युरोपीयन कंपनीमधील नोकरी सोडून स्वत:चा व्यवसाय सुरू केला. त्यामुळे व्यवसायाचे बाळकडू मिळाले.

सासरे स्व. दादासाहेब सावंत आणि पती स्व. सुधाकर सावंत हे दोघेही निष्णात वकिल होते. वकिली व्यवसायाबरोबरच राजकारण, समाजकारण, सहकार, शिक्षण अशा विविध क्षेत्रात सावंत पितापुत्र सक्रीय होते. त्यामुळे आमच्या घरात सतत लोकांचा राबता होता. या वातावरणाशी अल्पावधीतच समरसता साधत सहजीवन सुरू झाले. स्व. अण्णासाहेब सावंत यांनी रायगड शिक्षण प्रसारक मंडळ, दि महाड को-ऑप. अर्बन बँक या दोन संस्थांच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत असतानाच रायगडच्या राजकारणातही स्वत:चा ठसा उमटविला. महाड नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणूनही अनेक वर्षे कार्यरत होते.



स्व. अण्णासाहेबांबरोबर शिक्षण आणि सहकार क्षेत्रात काम करण्यास सुरूवात केली. १९९४ ते १९९९ तसेच २००५ पासून आजतागायत महाड अर्बन बँकेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली. स्व. अण्णासाहेबांच्या मार्गदर्शनामुळे बँक प्रगतीपथावर नेण्याचे काम प्रभावीपणे करू शकले. सन १९९९ मध्ये महाराष्ट्र अर्बन को.-ऑप.बँक्स फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली.

महाड अर्बन को.ऑप.बँक, रायगड शिक्षण प्रसारक मंडळ, शशिकला सावंत स्मारक वाचन मंदिर या संस्थांच्या अध्यक्षपदाची धुरा खांद्यावर आली. तेव्हापासून या तिन्ही संस्थांचा कारभार व्रतस्थ भावनेने पाहात आहे. जिल्ह्यात जेव्हा सहकार क्षेत्राबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते अगदी त्यावेळीही महाड अर्बन को-ऑप. बँकेबद्दल ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेऊ शकलो ते आजवर केलेल्या प्रामाणिक कामकाजामुळे. रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून महाड आणि पोलादपूरच्या ग्रामीण भागात शिक्षणाचा ज्ञानयज्ञ अखंडपणे सुरू ठेवला आहे.

रायगड भारत स्काऊट आणि गाईड, जिल्हा संस्था रायगडचे उपाध्यक्षपद, योगविद्या गुरुकुल नाशिक या संस्थेचे कार्यकारिणी सदस्यपद, महाड महिला सहकारी कलामंदिर (रजि.) या संस्थेचे अध्यक्षपदी, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या महाड शाखेचे सल्लागार पद, महाड लायनेस क्लबच्या कार्यकारिणी सदस्या अशा विविध पदांवर कामे केली आहेत. सहकार शिक्षण समाजकारण, प्रबोधन अशा विविध क्षेत्रात कार्यरत राहात असतानाही राजकारणापासून स्वत:ला निग्रहाने आणि कटाक्षाने अलिप्त ठेवले आहे.

विविध क्षेत्रातील कामकाजाची/योगदानाची दखल राज्यातील विविध संस्थांनी घेतली आहे. २००१ साली सोलापूर येथील श्री साई महिला प्रतिष्ठापना स्व. सौ. अलकनंदा जोशी राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार प्राप्त झाला. त्याचवर्षी बिझनेस एक्सप्रेस फाऊंडेशन, सांगली यांनी महिला उद्योजक राज्य परिषदेने पुरस्कृत केलेला राज्यस्तरीय संजीवनी पुरस्काराने तर २०१० मध्ये अथर्व सामाजिक संस्थेने रायगड सन्मान पुरस्कार देऊन गौरविले. प्रियदर्शनी फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या इंदिरा गांधी समाज गौरव पुरस्काराची मानकरी ठरले. महाड शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षानेही २०११ चा महाड भूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे. २०१२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन यांनी श्रीमती सुशीलादेवी देशमुख स्मृती महिला पुरस्कार तर अलिबाग प्रेस असोसिएशनने तेजस्विनी



शोभा सावंत

पुरस्कार, सरदार वल्लभभाई पटेल नगर चॅरिटेबल ट्रस्टने बाळासाहेब देवरस पुरस्कार, लोकमतचा स्त्री शक्ती गौरव पुरस्कार, सावली संस्थेचा सावली गौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांचा राज्यस्तरीय पुरस्कार- २०१४ सहकार रत्न पुरस्कार, समर्थ फाऊंडेशन अलिबाग यांचा तेजस्विनी पुरस्कार, योग विद्या गुरुकुल नाशिक व भारतीय योग विद्याधाम यांचेकडून सातत्याने २५ वर्षे योग प्रचार व प्रसार केल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला. अखिल मराठा फाऊंडेशन व मराठा एज्युकेशन ट्रस्ट यांचा यशस्वी महिला पुरस्कार. या पुरस्कारांमुळे कामकाजासाठी उत्साह येत गेला त्याचबरोबर जबाबदारीतही तेवढीच वाढ झाली आहे.

बँकेच्या संचालक मंडळात प्रवेश केला त्यावेळी शाखांची संख्या १७ होती तर ठेवी रू.३४ कोटी रूपयांच्या होत्या. आता बँकेच्या २५ शाखा असून ठेवी रू. ५५० कोटी आहे. सध्या बँकेत २०० कर्मचारी आहेत. ही वाढ करत असताना अनेक कडू गोड निर्णय घ्यावे लागले.

संचालक मंडळ निवडणुकीमध्ये अनेक वेळा राजकीय हस्तक्षेप होतात. परंतु त्या दबावाला बळी न पडता आत्तापर्यंतच्या निवडणुका बिनविरोध केल्या आहेत. आत्ताच्या निवडणुकीत अनेक नविन चेहऱ्यांना संधी दिली असून त्यामध्ये तज्ञ व उच्चशिक्षित सभासदांचा समावेश केला आहे. संचालक सभासद व सर्व कर्मचारी पाठीशी नेहमीच ठामपणे उभे राहिले आहेत.

बँकेचे संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्या पाठिंब्यामुळे त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बँकेस- २०१४, २०१६, २०१७ ते २०१९ या सर्व वर्षी बँकोतर्फे उत्कृष्ट बँक पुरस्कार, २०१५ व २०१६ मध्ये नचिहेत गौरव पुरस्कार, २०१६ व २०२२ मध्ये दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन यांचे वतीने वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार, २०१६ व २०२२ मध्ये दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन उत्कृष्ट बँक पुरस्कार २०२०, आयएसओ ९००१-२०१५ नामांकन इत्यादी पुरस्कार प्राप्त झाले आहे. या पुरस्कारांनी कर्मचारी व अधिकारी यांना त्यांनी केलेल्या कामाची पावतीच मिळते जणू आणि ती त्यांचा कामकाजातील उत्साह द्विगुणीत करते.

बँका उत्तम रितीने चालण्यासाठी उत्तम कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते त्याचबरोबर त्यांना उत्तम मार्गदर्शनाचीही साथ हवी असते. त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असते आणि ती भूमिका आपण संचालकांनीही उत्तमपणे निभवायला हवी. सर्वांच्या सहकार्यानेच हा जगन्नाथाचा रथ पुढे ओढायचा असतो. बँकिंग करतानाच आपले इतर छंदही जोपासा, स्वत:साठी वेळ द्या. आरोग्य उत्तम ठेवा आणि त्यासाठी योगासनांची कास धरा.

**– शोभा सुधाकर सावंत, अध्यक्षा,**
**दि अण्णासाहेब सावंत को-ऑप बँक महाड लि.**

*****

# महिलांनी महिलांसाठी चालवलेली कोकणातील कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी



**शशिकांत बांदोडकर**

चार महिला एकत्र आल्या की एकमेकींची उणीदुणी काढतात. कोणत्याही गोष्टीत एकमत होण्यापेक्षा जेवढ्या महिला, त्यापेक्षा जास्त त्यांची मते असा सर्वसाधारण व सर्वमान्य समज असतो.चार महिलांना एकत्र करून एखादे भरीव कार्य होऊन शकत नाही असे सामाजिक-राजकीय क्षेत्रातील धुरिण मत व्यक्त करताना दिसतात या सर्व समज-अपसमजांना छेद देण्याचे काम पनवेल येथील 'कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्थेने' केले आहे व करत आहे.

सन १९९५ साली स्थापन झालेल्या महिला पतसंस्थेने यशस्वितेची २६ वर्षे पूर्ण केली आहेत. अकरा महिलाचे एक संचालक मंडळ व त्यांना मार्गदर्शन म्हणा किंवा त्यांच्या बरोबरीने संस्था स्थापनेपासून आजतागायत सल्लागार म्हणून वावरणारे शशिकांत बांदोडकर अशी ही एक टीम होय. विविध वयोगटातील महिलांना संचालकपदी कार्यरत करून संस्थेला उत्तम उर्जितावस्थेत आणणाऱ्या कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक तथा तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत. सन १९९५ मध्ये रू. १५०००/- भागभांडवल व २०० महिला सभासद अशी 'महिलांसाठी एक पतसंस्था' हा ध्यास घेऊन शशिकांत बांदोडकर या क्षेत्रात उतरले. त्यांची इच्छा कितीही प्रामाणिक असली तरी प्रत्यक्ष काम करताना महिलांचा क्रियाशील सहभाग असणे आवश्यक होते. परंतु अपर्णा पेंडसे, विजया दाबके, श्रीमती विभावरी कुळकर्णी तसेच श्रीमती दिपाली धावत्रे यांचा आवर्जून उल्लेख करून बांदोडकरांनी संस्थेने केलेल्या कार्याचा लेखाजोगा सादर केला होता.

कमळ महिला पतसंस्थेची सुरूवात करण्यापूर्वी या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाबद्दल विचारता त्यांनी सांगितले की सन १९८६ ते १९८८ या काळात ते स्वत. पनवेल को-ऑप. अर्बन बँकेचे अध्यक्ष होते. सहकार क्षेत्रात राजकारणाचा वाजवीपेक्षा जास्त वावर झालेला आहे.बँका-पतसंस्था या अपवाद नव्हत्या व आताही नाहीत. परंतु महिला या तुलनेने राजकारणापासून दूर असतात. घरातील अर्थव्यवस्था प्रामुख्याने घरातील स्त्री वर्गच सांभाळत असते. पैशांचे व्यवस्थित नियोजन त्यांच्याद्वारेच होत असते आणि घरगुती अर्थव्यवस्था सांभाळणारी भगिनी सामाजिक क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रात नियोजनाची चुणूक दाखविल्याशिवाय राहणार नाही. स्त्रियांनी, स्त्रियांकरीता सुरू केलेली संस्था नुसती चालू आहे असे नाही तर घोडदौड करते आहे

शशिकांत बांदोडकर हे संस्थेचे संस्थापक आणि मार्गदर्शक आहेत, दैनंदिन व्यवहारात ते मार्गदर्शन करीत असतात. परंतु त्याची अंमलबजावणी सर्व महिला संचालक तसेच कर्मचारी करीत असतात. संस्थेच्या अध्यक्षा मालती आग्रे, उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर तसेच सर्व संचालक मंडळ हे संस्थेच्या कामकाजावर बारीक लक्ष ठेवून असतात. रोज जवळपास तीन ते साडेतीन तास त्या संस्थेसाठी देत असतात. विविध वयोगटातील संचालिकांना बरोबर घेऊन वाटचाल करताना त्यांची उपरोल्लिखित वये त्या विसरून जातात व समोरच्याला विसरायला लावतात.



कोरोनाच्या महामारीमध्ये अनेक महिला सभासदांना कर्जाच्या व्याजात सूट देऊन कर्ज मुक्त केले. संस्थेच्या रू. ५० कोटी पर्यंतच्या ठेवी, रू. २१.१६ कोटी रूपयांची कर्जे, निव्वळ एन.पी.ए. २.८६ टक्के तर रू. ३२.२५ कोटींची गुंतवणूक असा भक्कम पाया आहे. संस्थेच्या एकूण ५ शाखा आहेत. संस्थेचे मुख्य कार्यालय, लॉकर्सची जागा व पायोनिअर शाखा इमारत सर्व स्वमालकीच्या आहेत. संस्थेच्या कर्मचायांना वेळोवेळी प्रशिक्षण घेता यावे, याकरीता पनवेल शहराच्या मध्यवर्ती भागात १५०० चौरस फुटांचे सभागृह संस्थेच्या स्वमालकीचे आहे. संस्था सभासदांना ११ टक्के लाभांश देते. हे सर्व करताना सामाजिक बांधिलकीचे तत्त्व सांभाळून खोपोली येथील एक महिला पतसंस्था 'कमुळ' मध्ये विलीनीकरण, विविध शैक्षणिक व सांस्कृतीक संस्थांना आर्थिक मदत करणे, पनवेल नगरपरिषदेतील शाळा नं. २ मधील २० विद्यार्थ्यांना दत्तक घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, इनर व्हील क्लब ऑफ पनवेल, संमित्र मंडळ, हुतात्मा हिरवे गुरूजी शाळा, कन्या आरोग्य मंदिर, लायन्स क्लब ऑफ पनवेल, कुष्टरोग निवारण समिती-नेरे, सत्कर्म श्रध्दाश्रय संस्था - या संस्थांना आर्थिक मदत इ. सारखी अनेक सामाजिक कामे पतसंस्था करत असते.

कमळ महिला पतसंस्थेला नचिकेत प्रकाशन नागपूर तर्फे प्रगत तंत्रज्ञानाचा संस्थेत उत्कृष्ट वापर, वार्षिक अहवालाची मांडणी व उत्कृष्ट सेवा याबद्दल पुरस्कार प्राप्त झाले आहेत. राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांनी संस्थेला कठीण परिस्थितीमध्ये धीरोदत्तपणे कामकाज केल्याबद्दल 'दिपस्तंभ' पुरस्कार देऊन संस्थेचा सन्मान केला. तसेच 'अविजू पब्लिकेशन कोल्हापूर व गॅलेक्सी इन्मा यांच्या संयुक्त विद्यमाने 'बँको पतसंस्था ब्लू रिबीन' हा पुरस्कार देऊन संस्थेचा गौरव करण्यात आला. केवळ रू. ३००० ते रू. ५००० रूपयांपर्यंत कर्जे देणारी ही संस्था महिलांना व्यवसायवृद्धी, गृहकर्ज देऊ खंबीरपणे उभी करताना दिसते आहे. तसेच महिला बचत गटांना प्राधान्य दिलेले आहे. महिलांनी आपल्या विचारांची देवाणघेवाण करून स्वयंविकास करावा या हेतूने हळदीकुंकू, महिला दिन हे उत्साहाने साजरे केले जातात.

संस्थेचा कारभार पारदर्शक आणि विश्वासू रहावा म्हणून प्रयत्नशील संस्थेत एकूण २६ जणांचा कर्मचारी वर्ग आहे. संस्थेच्या विकासामध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले आहे. त्यांच्यामुळे देखील संस्थेची यशस्वी वाटचाल चालू आहे. शशिकांत बांदोडकर हे तज्ञ संचालक म्हणून आणि संस्थापक म्हणून कार्यरत आहेत. संस्थेने केलेली सातत्यपूर्ण प्रगती आणि गुणवत्ता सिद्धतेमुळे कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्थेला रू. २५ कोटी ते पुढे या व्यवसाय गटातून, २०२४-२५ सालाकरीता प्रथम क्रमांकाचा कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. तसेच संस्थेस बँको पतसंस्था ब्ल्यू रिबन-२०२४ हा पुरस्कार ही प्राप्त झालेला आहे.

**- शशिकांत बांदोडकर, संस्थापक तथा तज्ञ संचालक,**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी**

*****

# कर्मवीर पतसंस्थेचे बीजारोपण

सर्वसामान्य माणसाची आर्थिक गरज पूर्ण करणे व त्यासाठी सहकार हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. ही उदात्त भावना मनामध्ये घेवून त्यावेळच्या संचालक मंडळाने कर्मवीर पतसंस्थेचा पाया रोवला. सहकार ही एक स्वयंपूर्ण संघटन पद्धती आहे. त्यामुळे सहकाराच्या मूळ तत्त्वांना त्यांनी संस्था स्थापनेच्या केंद्रस्थानी ठेवले. स्वेच्छेने एकत्रित येऊन लोकशाही पद्धतीने सभासदांचा विकास साध्य करता येतो. गरजू लोकांना आर्थिक बळ देता येते. त्यांचा आर्थिक सामाजिक विकास करता येऊ शकतो आणि त्यासाठी कार्य केले पाहिजे या प्रबळ इच्छेने १२ मार्च १९८७ साली अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर कर्मवीर पतसंस्थेची स्थापना झाली. कर्मवीर आण्णांचे कार्य पाहून त्यांचेच नांव संस्थेला देणे. संयुक्तिक आहे असे वाटल्याने कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था (सांगली) असे नामकरण करण्यात आले.

कर्मवीर आण्णांनी जसे कार्य करुन समाजाचा उद्धार केला, तसेच कार्य पुढे घेवून जावे हाच विचार सर्व संस्थापकांच्या मनामध्ये होता. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तरुण या स्थापनेमध्ये सहभागी होते.



**संजय सासणे**

**✻ प्रारंभीची वाटचाल :–** एका खोलीमध्ये तीन सेवकांना घेवून संस्थेचे कार्य सुरु झाले. कालांतराने सन १९९२ मध्ये संस्थेच्या समडोळी, भिलवडी, नांद्रे येथे शाखा सुरु झाल्या. संस्थेचे भागभांडवल त्यावेळी केवळ १ लाख होते. ठेवी रु.१ कोटी होत्या. प्रयत्नांती ठेवीमध्ये उत्साहवर्धक वाढ दिसू लागली. त्यामुळे संचालकांचा उत्साह दुणावत गेला. त्यातून पुढील कामाची प्रेरणा तयार झाली. संचालक हे सुशिक्षित प्रगल्भ, लोकसंग्रह एकविचाराचे होते. संस्थेच्या वाढीकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यायला सुरुवात केली. त्यामुळे संस्थेची वाटचाल दमदार गतीने होत होती. संचालकांची चिकाटी आणि वेळेत मिळणारी सेवा पाहून संस्थेस ठेवीदारांच्या विश्वासाचे बळ मिळाले. पुढे १९९५ नंतर संस्थेच्या प्रगतीचा आलेख अधिक जोमाने उंचावत गेला. प्रगतीचे एक एक शिखर गाठायला सुरुवात झाली. संस्थेचे कार्य पाहून अनेक गावातून शाखा सुरु करण्याबाबत मागणी होऊ लागली. महत्त्वपूर्ण घटना म्हणजे सन २००० साली संस्थेने स्वमालकीचे मुख्यालय बांधले.

संस्थेने प्रगतीचे एकापेक्षा एक असे अनेक टप्पे गाठले. पण केवळ मागील दहा वर्षे विचारात घेता संस्थेची प्रगती देदिप्यमान आहे, हे आकडेवारीवरुन दिसते. सभासदांनी संस्थेवर व्यक्त केलेला विश्वास, संचालक मंडळाचे सक्षम व्यवस्थापन, सेवेतील नाविन्यता व सेवकांची आत्मियता आहे याचे बळ संस्थेच्या प्रगतीमध्ये आहे. संस्थेला मोठे करण्याचे स्वप्न आणि इच्छा होती त्यातून त्यांनी संस्थेला स्वयंशिस्त व दिशा दिली. त्याच शिस्तीचे पालन संस्थेच्या कार्यामध्ये सदैव दिसते आहे.

**✻ सहकाराच्या तत्वांचा अंगीकार :–** सहकार हे लोकांचे लोकशाही संघटन आहे. इथे सभासदांच्या सन्मानाला यथोचित स्थान आहे. ज्या सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्थेची स्थापना झाली. तो हेतू कर्मवीर पतसंस्थेने यशस्वीपणे पूर्ण केला आहे व पुढेही अविरत करणार आहे. संस्थेची सभासद संख्या पहाता संस्थेच्या लोकशाही कामकाजाची प्रचिती सर्वांना येते. खुल्या सभासदत्वाचे तत्त्व संस्थेने कृतीने सिद्ध केले आहे. रास्त व्याजदराने कर्ज, ठेवीस उत्तम व्याज आणि सभासदांना भरघोस लाभांश यातून लोकशाही आणि सहकारी तत्वाचे आचरण होवून त्याचा लाभ सभासदांना होत आहे. संस्थेच्या नफ्याचा आलेख सतत वाढत गेला पण संस्थेत नफ्यापेक्षा सेवेला प्रथम स्थान आहे. काटकसरीचे धोरण अनावश्यक खर्चाला सदैव फाटा देवून जास्तीत जास्त व्याज व लाभांश यातून सभासदांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संचालक मंडळ विचारमंथन करीत असते. सहकाराचे तत्त्व बचतीला महत्व आर्थिक सक्षमतेची जाणीव जागृती, परस्पर सहकार्याचे मूल्य या मूळ तत्त्वावर कर्मवीर पतसंस्था कार्य करीत आहे.

अर्थसहाय्यातून स्वावलंबी बनवून त्यांची क्रमशक्ती वाढविली, त्यांची आर्थिक उन्नती साध्य केली आहे. त्यांच्या जीवनामध्ये स्थैर्य आणले. म्हणूनच कर्मवीर पतसंस्थेचे राज्यातील पतसंस्था विश्वामध्ये मोलाचे स्थान आहे, हे मान्यच करावे लागेल.

सहकाराचा आदर्श घेवून कर्मवीर पतसंस्थेचे व्यवस्थापन सक्षम सुरु आहे, हे संस्थेने गाठलेल्या प्रगतीने अगोदरच सिद्ध केले आहे. ६४ शाखांची शृंखला, ६८००० सभासद व ग्राहकांना आधुनिक सेवा प्रदान करण्याची क्षमता संस्थेने गेल्या ३७ वर्षांत कोणत्याही अडथळयाविना सिद्ध केली आहे. स्पर्धेच्या युगात एक आदर्श बनून कर्मवीर पतसंस्था नावाचा ब्रॅण्ड पुढे येत आहे. याची नोंद राज्य पातळीपर्यंत सहकार व आर्थिक क्षेत्रातील जेष्ठ मान्यवरांनी घेतली आहे.

संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा रावसाहेब जिनगोंडा पाटील यांनी अतिशय समर्थ सांभाळली असून संस्थेच्या प्रगतीत संचालक मंडळाची त्यास साथ लाभली आहे. संचालक मंडळ वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, सिस्टीम ऑडीट जबाबदार अधिकारी, तज्ञ मार्गदर्शक यांचे सक्षम निरिक्षण व नियंत्रणाखाली संस्थेची भविष्यकालीन धोरणे तयार होत असून त्याला उत्तम यशाची किनार लाभत आहे.

संचालक मंडळ जिद्दीने राबवित असलेली धोरणे, सतत नाविन्यपूर्ण सेवा सुरु करण्याचा त्यांचा संकल्प यातून आपल्या भागात सहकारामध्ये एखादा नवा प्रयोग यशस्वी झालेला पहायला मिळाला तर नवल वाटायला नको. एकंदरीत सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारे व आदर्शवत व सहकारीची उंची वाढावे असे कार्य कर्मवीर संस्था उभारेल आणि ते रोल मॉडेल ठरावे याचा विश्वास संचालक मंडळ व्यक्त करते आहे.

**✻ सहकारी मूल्यांची पाईक कर्मवीर पतसंस्था :–** पश्चिम महाराष्ट्रात सहकार चळवळ रुजली व या भागाच्या प्रगतीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण योगदानाने महत्त्वाचे स्थान निर्माण केले. कर्मवीर पतसंस्था या प्रगतीतील एक शिलेदार आहे. सभासदांना अल्पव्याजदराने कर्ज पुरवठा करुन शेतकरी व सामान्य नागरिक यांना आर्थिकदृष्ट्या मुक्त करावे, हे संस्थेच्या व्यवस्थापनाचे स्वप्न आहे. कर्जदाराची संपूर्ण माहिती घेणे, सभासदांना उत्पादक कार्यासाठीच कर्ज देणे, त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल याची काळजी संस्था घेते आहे. साधन सामुग्री व आधुनिक तंत्रज्ञान घेण्यासाठी सहाय्य तरुणांना उद्योग व व्यापार उभारणीसाठी कर्ज, गरीब व होतकरु सभासदांना व्यवसायातून उत्पन्न वाढीसाठी हातभार लावून दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मितीचे कार्य करुन संस्था राष्ट्र विकासाला मदत करीत आहे. सभासदांची काटकसर आणि बचतीतून संस्थेकडे रु. १२०० कोटींहून अधिकच्या ठेवी जमा आहेत. बचतीची सवय निर्माण करण्यासाठी सभासदांना घरपोच सेवा देणेची काळजी घेणारी संस्था आहे. उत्तम शेती उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान याद्वारे सभासदांच्या उन्नतीची सफलता मोजणारी शोषितांची जीवनदायीनी बनून कर्मवीर पतसंस्था काळासोबत पुढे जात आहे. किमान १००० लोकांना प्रत्यक्ष तर हजारो हातांना अप्रत्यक्ष रोजगार देवून सहकाराचा उद्देश कर्मवीर पतसंस्था वृद्धिंगत करीत आहे.

**✻ सामाजिक मूल्यांचा शिलेदार :–** अण्णांची सामाजिक प्रेरणा संस्था आणि इथल्या प्रत्येक व्यक्तीच्या कामातून दिसून येते. सामाजिक सलोखा व जागृती, सर्वधर्म समानता महापुरुषांच्या विचारांचा प्रसार, वैचारिक मंथन

पुढील पानावर...

# कर्मवीर पतसंस्थेचे बीजारोपण

गुणीजण सन्मान. नैसर्गिक आपत्ती, धार्मिक आधिष्ठान, शैक्षणिक, संगीत, सांस्कृतिक, वैद्यकीय, वैचारिक कार्य यासाठी संस्थेने भरीव सहाय्य करुन त्यातून समाजाला झालेल्या लाभाचे खरे समाधान प्राप्त केले आहे.

✲ **सभासदांचे सक्षमीकरण :–** सहकारी तत्त्व अमूल्य आहे. सामान्य व्यक्ती विकासाचा केंद्र बिंदू आहे. उत्पादक कारणासाठी कर्ज पुरवठा. परतफेड क्षमता पहाणे, अनावश्यक कर्जापासून परावृत्त करणे याची काळजी संस्था घेत आहे. त्यामुळे संस्थेची वसूली चांगली होते आहे. या प्रकारे सामान्य माणूस, कारागीर, लहान उद्योजक, मध्यमवर्गीय यांची सामाजिक, आर्थिक स्थिती उंचावणे व त्याचे धनसंवर्धन होईल असे कवच संस्थेने उभे केले आहे असे म्हणता येईल. संस्थेने दुर्बल घटकांची अगणित आर्थिक प्रगती केली.

✲ **नियोजनातून प्रगती :–** पुढील विकास कार्याची धोरणे आखणे, त्याची पूर्तता व योग्य दिशानिर्देशन यामध्ये संचालक मंडळाचे कार्य अप्रतिम आहे. सक्षम व्यवस्थापन, अधिकारी पातळीवर अंतर्गत नियंत्रणाची चोख व्यवस्था. सेवकांना आधुनिक व्यवस्थापनाचे धडे देणे व त्यांच्या चांगल्या कामाची नोंद संस्थेने घेतली आहे. हिशेब तपासणी, वसुलीची विशेष यंत्रणा याद्वारे संस्थेने एनपीएचे प्रमाण अत्यल्प ठेवण्यामध्ये यश संपादन केलेले आहे.

संस्थेचा स्वनिधी रु. १२० कोटींचा टप्पा पूर्ण करतो आहे. संस्था विस्तृत आणि भक्कम पायावर उभी आहे. अन्य बँकांत केलेल्या गुंतवणुकीबाबत सुरक्षितता, तरलता, उत्पन्न हाच निकष लावला आहे.

✲ **संचालक मंडळ :–** संचालकामध्ये असलेली निष्ठा व तटस्थता यामुळे संस्था चौफेर प्रगती करीत आहे. संस्थेस लाभलेली लिडरशिप ही स्ट्रॅटेजी, सिस्टम डेव्हलपमेंट, परफॉर्मन्स ओरीयेन्टेड आणि पारदर्शक असून त्यांची जबाबदारी सक्षमपूर्ण करीत आहे. त्याचबरोबर अनिल श्रीपाल मगदुम यांच्यासारखा तरुण, धाडसी मुख्याधिकारी या संस्थेस लाभला आहे.

✲ **सेवकांची सर्वांगिण उन्नत्ती :–** सेवक हा कर्मवीर पतसंस्थेच्या प्रगतीमधील महत्वाचा भाग आहे. संस्थेने त्यांना शक्य त्या सर्व सोयीसुविधा संचालक मंडळाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या हेतूने त्यांना कर्ज, वाहन तारण कर्ज, घर बांधणीसाठी ३ टक्के इतक्या अल्प व्याजदराने कर्ज देवून सेवकांचे स्ववास्तुचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प संस्थेने केला आहे.

✲ **सेवक माता पिता सन्मान योजना :–** या संकल्पाअंतर्गत सेवकांच्या मासिक पगारातून १० टक्के रक्कम आई वडिलांच्या सेव्हिंग खात्यावर वर्ग केली जाते. या संकल्पनेचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेचा सेवक अतिशय वेतन घेत असून त्यांचे योगदान वाखाणण्यासारखे आहे. सेवकांना प्रशिक्षणातून सहकाराचे तत्व आणि कार्यप्रणाली समजून देण्याची जबाबदारी संस्था पुर्ण क्षमतेने पूर्ण करीत आहे. त्यातून सक्षम मणूष्यबळ संस्थेकडे उपलब्ध आहे.

✲ **अत्याधुनिक तंत्रज्ञानाने संस्था सज्ज –** संचालक मंडळाने संस्थेला संगणकीकृत करण्याचे पाऊल उचित आणि योग्य वेळी घेतले यातून संचालक मंडळाची दक्षता ध्यानी येते. त्यांना संस्थेत योग्य वेळी तंत्रज्ञानाचा पाया घातल्यामुळे आता कोणतीही तंत्रज्ञानावर आधारीत सेवा संस्थेत घेणे संस्थेला सहज शक्य होत आहे. पर्यायाने त्याचा लाभ सभासदांना होतो आहे. संपूर्ण संगणकीकृत होणारी कर्मवीर पतसंस्था ही सांगली जिल्ह्यामधील पहिली संस्था आहे. संस्थेच्या सर्व शाखा ऑनलाईन संगणक प्रणालीने जोडलेल्या आहेत. संस्थेने संगणकीय सेवांना प्राधान्य देवून नव्या युगाशी नाते जोडले जोडल्यामुळे तरुणवर्ग संस्थेकडे आकर्षित होतो आहे.

**– संजय सासणे, प्रशासकीय अधिकारी,**
**कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगली**


रजि. नं. जे.जी.ए./जे.जी.ए./आर.एस.आर./सी.आर. ३८८ दि. १४/०७/१९९४

## उद्यमी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., जळगाव

विश्वकर्मा संकुल, चौथा मजला, ब्लॉक नंबर ४०६/ ४०७, गोविंद रिक्षा स्टॉप, पिंप्राळा रोड, जळगाव.
पिन : ४२५००१ मोबाईल नंबर – ९३५६३७५५४७ फोन : २२२४२९३

### आकर्षक कर्ज योजना

| कर्ज योजना | व्याजदर |
|---|---|
| जामिनकी कर्ज | १३.००% |
| जामिनकी तारणी कर्ज | १३.००% |
| स्वयंसहायता कर्ज | १५.००% |
| आत्मनिर्भर कर्ज | १४.००% |
| गृहकर्ज योजना | ९.००% |

### ✲ आकर्षक ठेव योजना ✲

| ठेव योजना | | |
|---|---|---|
| ३० ते ४५ दिवस | ४.००% | ४.२५% |
| ४६ ते ९० दिवस | ४.५०% | ५.००% |
| ९१ ते १८० दिवस | ६.२५% | ६.७५% |
| १८१ ते ३६५ दिवस | ७.००% | ७.५०% |
| १३ महिने व पुढे | ७.५०% | ८.००% |
| | साधारण | ज्येष्ठ नागरिक |
| १२ महिने | ६.५०% | ७.००% |
| १३ ते ६० महिने | ७.५०% | ८.००% |

**संस्थेची २८/०२/२०२५ अखेर आर्थिक स्थिती (आकडे लाखांत)**

| | |
|---|---|
| ठेवी | ३२१.४६ |
| कर्ज | २६५.०१ |
| गुंतवणूक | २५३.९६ |

**बचत ठेव खाते**

दर सहामाही ३% प्रमाणे व्याज दिले जाते.
प्रति दिन – ६ महिने – ४%
१ वर्ष – ७%

# महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असो. अध्यक्षपदी भाऊ कड



मुंबई – महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन अध्यक्षपदी भारती सहकारी बँकेचे अध्यक्ष भाऊ कड यांची अविरोध निवड झाली. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. भारती सहकारी बँकेच्या मुख्यालयात सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, राष्ट्रीय पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख शिरीष देशपांडे, महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनच्या संचालिका योगिनी पोकळे, प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन, प्रदेश सहकोषाध्यक्ष औदुंबर नाईक, पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी कड यांचा सत्कार केला.

# पूर्णवादी सहकारी बँकेचा ४० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**बीड** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ व बँकेचा ४०वा वर्धापन दिन याचे औचित्य साधून पूर्णवादी सहकारी बँकेने ४० वा वर्धापन दिन अभिनव पद्धतीने साजरा केला. बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांच्या संकल्पनेतून सर्व कर्मचाऱ्यांसाठी प्राणायाम, योगासनाचे आयोजन करण्यात आले होते. योगगुरू डॉ. सुदाम मोगले व मधुरा कुलकर्णी यांनी प्रशिक्षक म्हणून भूमिका बजावली.

जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष सीए अभय माटे याचे अर्थसंकल्प समजून घेताना या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बँकेचे ज्येष्ठ संचालक तथा मार्गदर्शक डॉ. अरूण निरंतर, बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, मराठवाडा बँक असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया, जेष्ठ संचालक चंद्रकात सानप, विश्वनाथ माणुसमारे, डॉ. सुरेखा देशमुख, डॉ. विवेक पालवनकर, डॉ. आनंद वैद्य, महादेव हुलजुते, विश्वभर धिगळे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष सीए सुरेश लड्डा, सदस्य सीए राहुल जाजू, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद राजूरीकर, सरव्यवस्थापक महेश पारगांवकर, बँकेचे अधिकारी, कर्मचारी, सभासद, ग्राहक उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष डॉ. जोशी यांनी बँकेच्या सध्याच्या भक्कम आर्थिक परिस्थितीबाबत उपस्थितांना माहिती देऊन बँकेच्या पुढील वाटचालीबाबत मनोदय व्यक्त केला. बँकेला सध्या असलेल्या १३०० कोटी व्यवसायापासून २४०० कोटी व्यवसायापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प असल्याचे सांगितले. बँकेच्या विविध नवीन कर्ज योजनाची तसेच महाकुंभ ठेव योजनेची माहिती त्यांनी दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी आभार तर कीर्तनकार प्रज्ञाताई रामदासी यांच्या पसायदानाने सांगता झाली.

## जळगाव जनता बँकेतर्फे महिला बचत गटासाठी बाजारपेठेची सुविधा

**जळगाव** – महिला बचत गटांच्या विविध वस्तू विक्री करीता जळगाव जनता बँकेतर्फे येथील ओंकारेश्वर मंदिर परिसरात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. नाबार्डचे डी. डी. एम. अमित तायडे यांच्या हस्ते बाजारपेठेचे उद्घाटन झाले. बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, संचालिका डॉ. आरती हुजूरबाजार, संचालक हिरालाल सोनवणे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती, उपमहाव्यवस्थापक नितीन चौधरी, अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच भाविक व नागरिक उपस्थित होते.

## कर्मचारी पतपेढीच्या तज्ञ संचालकपदी केतन पोळ

**जळगाव** – जळगाव जिल्हा मराठा विद्या महाविद्यालयाच्या कर्मचारी पतपेढीच्या तज्ञ संचालकपदी केतन पोळ यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे सचिव वीरेंद्र भोईटे, प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, अध्यक्ष हेमंत येवले उपाध्यक्ष प्रदीप घुगे तसेच संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## श्री निनाईदेवी सहकारी पतसंस्थेला 'बँको ब्ल्यू रिबन' राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

मुंबई – सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यस्तरीय 'बँको ब्ल्यू रिबन' प्रथम क्रमांकाचा पुरस्कार येथील श्री निनाईदेवी सहकारी पतसंस्थेस सलग आठव्या वर्षी प्राप्त झाला आहे. माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. जेष्ठ सभासद संतोष माणिक साळुंखे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष सहकाररत्न आबासाहेब शंकर शेडगे यांनी आनंद व्यक्त करत सांगितले की, संस्थेने सातत्याने सहकारातील नव्या संधींना आत्मसात करत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

## जळगाव जनता सहकारी बँक बचत गटाचा महिला मेळावा

**जळगाव** – जळगाव जनता सहकारी बँकेच्या बचत गटाच्या वतीने महिला मेळाव्याचे आयोजन येथे करण्यात आले.

अध्यक्षस्थानी बँकेचे उपाध्यक्ष डॉ. अतुल सरोदे, संचालक संजय प्रभूदेसाई, संचालिका डॉ. आरती हुजूरबाजार, संध्या देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती, वरिष्ठ महाव्यवस्थापक सुनील अग्रवाल, बँकेचे उप- महाव्यवस्थापक नितीन चौधरी, कपिल चौबे, कर्मचारी प्रतिनिधी ओंकार पाटील, हेमंत चंदनकर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. झाशीची राणी महिला बचत गट, अनुपमा महिला बचत गट, गोकर्ण महिला बचत गट, सावित्रीबाई फुले महिला बचत गट अनिता आंबेकर, शैला वाघुळदे यांनी मनोगत व्यक्त केले.

या मेळाव्यामध्ये बचत गटाच्या माध्यमातून कार्यरत असणाऱ्या महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

# पतसंस्थांनी वाढीचा ध्यास धरावा, पण वाढ सातत्यपूर्ण, प्रमाणबद्ध असावी

पतसंस्थाचा आकार, अर्थकारण, सभासद संख्या द्रुतगतीने वाढते आहे. महाराष्ट्रातील काही संस्था ही १० हजार कोटींचा ठेव टप्पा पार करण्यात यशस्वी झाल्या तर काही संस्था हा टप्पा पार करण्याकडे वाटचाल करताना दिसतात. एका बाजूला ८ हजारांपेक्षा अधिक संस्था १ कोटी पेक्षा कमी ठेवी असलेल्या आहेत. त्याचवेळी हजारो कोटींच्या ठेवी जमा करणाऱ्या संस्था आपण पाहतो आहोत. गेल्या ५ वर्षांत १०० वर संस्था या १०० कोटींपेक्षा जास्त ठेवी संकलित करणाऱ्या संस्था ठरल्या. पतसंस्थांच्या मार्गक्रमणात द्रुतगतीने संस्थांचे अर्थकारण वाढण्याची ही पहिलीच वेळ असावी.



अॅड. दीपक पटवर्धन

**※ पतसंस्थाचे वाढते अर्थकारण –**

संस्था वाढते याच कारण संस्थेचे सादरीकरण आकर्षक असते. संस्था चालकांचा प्रभाव असतो. विश्वासार्हता ही अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. संस्थेची उपयुक्तता प्रामुख्याने ग्राहकांबरोबरचे संबंध, ग्राहक सेवेचा दर्जा आणि अत्यंत आकर्षक ठेव व्याजदर यामुळे संस्था वेगाने वाढत जातात. पतसंस्था जगतामध्ये वाढणार हे अर्थकारण खूप उत्साहवर्धक आहे. पतसंस्था क्षेत्राचे स्थान अधोरेखित करणारी ही वाढ आहे. राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जावी अशी स्थिती आहे असा आभास निर्माण करणारी ही स्थिती आहे.

**※ सावधगिरीने काम करून अर्थचक्र गतिमान करणे –**

पतसंस्थांनी खूप सावध भूमिका घेणे आवश्यक ठरते. केवळ आर्थिक आकार वाढीचा ध्यास दूरगामी प्रवासासाठी योग्य ठरत नाही. पतसंस्था चालकांनी वाढीचा सांख्यांकीय वेग आणि आर्थिक शिस्त, प्रमाणबद्धता याचे समीकरण नेमके जमवणे आवश्यक आहे. अर्थकारणामध्ये अर्थगतीला खूप महत्त्व आहे. अर्थगती त्यातले सातत्य प्रामुख्याने संपूर्ण अर्थचक्र गतिमान ठेवणे आवश्यक ठरते. एकतर्फी फक्त येणारा पैसा किंवा एकतर्फी बाहेर जाणारा पैसा हे अर्थचक्र नाही. पैसा येतो तो कर्जरूपाने गुंतवणूक रूपाने प्रमाणबद्ध वितरित होतो. ठराविक हप्त्यात कर्जाची वसुली होते. गुंतवणुकीवर व्याज मिळते. या जमा रकमेतून विहित व्यवस्थापन खर्च होतात. उर्वरित रकमेतून कर्ज वितरण होते. परत वसुली असे चक्र सातत्याने सुरू राहण आवश्यक ठरते.

पतसंस्थांना मध्यवर्ती बँकांपेक्षा अधिक ठेव व्याजदर ठेवण्याची मुभा असते. स्वाभाविकपणे पतसंस्थांचे व्याजदर आकर्षक असतात. संस्थांची कार्यालय रचना आकर्षक असते. पदाधिकारीही त्या भागातले विश्वासू व्यक्तिमत्त्व असते. या पार्श्वभूमीवर संस्थेकडे ठेवींचा ओघ सुरू होतो. अधिकचा व्याजदर देत असल्याने ठेव उभारणी ज्यादा दराचे आमिषाने होते. स्वाभाविकच फंड रेझिंग कॉस्ट वाढलेली असते. ठेव येण्याचे वेळापत्रक हे निश्चित नसते. ठेवींचा फ्लो अनईव्हन असतो. काही वेळा ही ठेव रक्कम नुसती आयडल पडून राहते आणि कॉस्ट अधिक वाढते.

**※ पिग्मी ठेवींचे योग्य नियोजन –**

मोठ्या संस्थाकडे पिग्मी एजंट मार्फत मोठ्या प्रमाणावर पिग्मी ठेव जमा होते. मात्र पिग्मी विड्रॉवल प्रमाण हे खूप जास्त असते. रोज जमा होणाऱ्या लाखो रुपयांच्या पिग्मी रकमेतून कर्ज वितरणासाठी वापरण्यायोग्य रक्कम हाती राहत नाही. जमा होणाऱ्या पिग्मीमधून पिग्मी ठेव परतावा होतो. फंड कॉस्ट वाढते. मात्र संयत स्वरूपात पिग्मी जमा करणे हे संस्थेला बाजारपेठेत जागती ठेवण्यासाठी उपयुक्त ठरते. एजंटच्या माध्यमातून संस्था रोज व्यापारापर्यंत पोचते. या गोष्टीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक संस्थेने पिग्मी एजंट किती नेमावे? त्यांनी किती रक्कम जमा करावी ? याचे स्वतःचे गणित ठरवले पाहिजे. नाहीतर मनमानी स्वरूपात अतिरिक्त जमा होणारी पिग्मी रक्कम आपली फंड कॉस्ट अधिक वाढवते याचे भान ठेवणे आवश्यक ठरते. अन्य संस्थांशी स्पर्धा करण्यासाठी पिग्मी खाती वाढवणे याला कोणताही अर्थ नाही. नेमकी गरज, पिग्मीसाठी पडणारी कॉस्ट आणि सर्वात महत्त्वाच म्हणजे पिग्मी ठेवी माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या रक्कमेची कर्ज वितरणासाठी गरज याचे गणित नीट मांडणे आवश्यक आहे.

**※ ठेवी व कर्ज यांची योग्य सांगड –**

मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा होतात. ठेवींचा वाढीव आकडा अभिमानाने मान ताठ करतो हे खरे असले तरी जमा झालेली ठेव रक्कम कशा पद्धतीने विनियोगात येते? किती कालावधीत ही रक्कम कर्जासाठी वितरित होते याचं भान ठेवणे आवश्यक आहे. जमा झालेली रक्कम आयडल पडून राहणार नाही. कर्ज मागणी निर्माण करून योग्य कर्ज मागणी पूर्ण करण्यासाठी ही रक्कम विनियोगात येईल अशी व्यवस्था विकसित करणे आवश्यक असते. मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा होऊ लागल्या की कर्ज वितरणाची निकड निर्माण होते आणि मग साधक बाधक विचार न करता, फिजिबिलिटी न तपासता कर्ज मंजूर केली जातात. पुढे योग्य फिजिबिलिटी नसलेली वितरित झालेली ही प्रकरणे थकबाकी वाढवतात आणि पैसा ब्लॉक होण्याचे दुष्टचक्र सुरू होते. एकदा थकबाकी, NPA वाढला की नफ्यावर अतिरिक्त बोजा पडतो. तरतुदीची सूज आर्थिक पत्रकाला येते. कर्ज प्रकरण योग्य अभ्यास करून, योग्य कागदपत्रे, तारण मालमत्ता प्रामुख्याने परतफेड क्षमता पाहून देणे आवश्यक ठरते. कर्ज प्रकरणांची छाननी, कर्जदार, जामीनदार यांच्या जागृतपणे घेतलेल्या मुलाखती, कर्जदार, जामिनदारांची संकलित केलेली माहिती, कर्ज रकमेचा विनियोग नेमका काय तारण मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी या सर्वांवर आधारून अत्यंत डोळसपणे कर्ज मंजुरी आणि वितरणाची कार्यवाही झाली तर भविष्यातल्या अनेक कटकटी वाचतात. ठेव रक्कम मोठ्या प्रमाणात वाढत जाते. दुसऱ्या बाजूला थकबाकीही वाढती असते. मग खेळ सुरू होतो.



सी.डी.रेशो मेन्टेन करण्यासाठी ठेव उभारणी अधिक वाढवावी लागते. वाढती ठेव उभारणी फंड कॉस्ट वाढवत नेते. वाढती थकबाकी प्रत्यक्ष उत्पन्न घटवते आणि नफ्यावर दबाव वाढतो. हे सर्व टाळता येणे आवश्यक आहे. संस्थेने प्रत्येक वर्षी आपली उद्दिष्टे नक्की केली पाहिजेत. उद्दिष्टे ठरवतांना ती वास्तवाचा विचार करून ठरवली पाहिजेत. आर्थिक वर्षात किती ठेवी उभारायच्या? कोणत्या तिमाहीत कर्ज वितरणासाठी अधिक रक्कम लागेल? कोणत्या तिमाहीत पूर्वीच्या ठेवींची मुदत संपते आहे? सणासुदीचे दिवस कोणते आहेत? तसेच कोणत्या कालावधीत परिसरात जास्त पैसा असण्याची शक्यता आहे? याचा नीटपणे अभ्यास करून ठेव उद्दिष्ट ठरवले पाहिजे. वार्षिक ठेवींचे उद्दिष्टांची दर तिमाही उद्दिष्टात वर्गवारी केली पाहिजे. त्यानुसार ठेव संकलनाचे उत्तम कर्जदार पाहून कर्ज वितरणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अनिर्बंध पद्धतीने केवळ स्पर्धा म्हणून, मोठेपणा म्हणून एकाच वेळी भरपूर ठेव संकलित करणे हे आर्थिक हिताला छेद देणारे ठरू शकते. त्यापेक्षा

पुढील पानावर...

# महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला गतवैभव प्राप्त करून देणार – सहकार राज्यमंत्री भोयर

**वर्धा** – सहकारातून जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला आर्थिक बळकट करणारी वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अडचणीतून बाहेर काढण्याची सर्वांची जबाबदारी आहे. राज्य सहकारी बँकेच्या सहकार्याने जिल्हा बँकेचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही सहकार राज्यमंत्री व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

सहकारातून समृद्धी निर्माण करणे व सहकाराला बळकट करण्यासाठी सहकार विभाग, राज्य सहकारी बँक व वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त वतीने सहकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर होते. आमदार सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी. अपर निबंधक तथा सहसचिव सहकार विभाग संतोष पाटील, व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, एस. बी. पाटील, ॲड. सुधीर कोठारी, अशोक माने, प्रशांत इंगळे उपस्थित होते.

आर्थिक संकटात असलेल्या जिल्हा बँकेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी राज्य शासनाने १६३ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असून रिझर्व बँकेनेसुद्धा परवाना दिला आहे. त्यामुळे बँकेने सक्षमीकरण करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे भोयर म्हणाले. वर्धा जिल्हा बँकेत ५ लाखापर्यंतच्या ठेवीला विमा संरक्षण आहे. मात्र त्यावरील सर्व ठेवींना राज्य सहकारी बँकेचे विमा संरक्षण असेल, अशी हमी अनास्कर यांनी दिली. सहकार क्षेत्राला समृद्धीकडे नेणे गरजेचे असून यासाठी बँकेने शेती कर्जासोबतच बिगरशेती कर्ज देण्याकडे भर द्यावा, असे ते म्हणाले.

महिला सक्षमीकरण आणि दुध व्यवसायाला चालना देण्यासाठी बँकेने पशुपालनासाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे वानखेडे यांनी सांगितले. प्रास्ताविक वर्धा जिल्हा उपनिबंधक सीमा पांडे, सूत्रसंचालन पल्लवी पुरोहित यांनी तर आभार वर्धा जिल्हा बँकेचे प्रशासक राजेंद्र कौसडीकर यांनी मानले. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश सचिव विनोद भिमनवार, वर्धा जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुधाकर घवघवे यासह विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीची महिलांसाठी ठेव योजना

पुणे – येथील लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने महिलांसाठी लोकमान्य महिला उडान निवेश योजना सादर केली आहे. योजना एकूण ५५५ दिवसांची असून त्यासाठी १०.२५ टक्के व्याज दर आहे. ज्येष्ठ महिला नागरिकांसाठी योजनेत ०.५० टक्के अधिक व्याज देण्यात येणार आहे. किमान ठेव रक्कम रुपये १०,००० रुपये असून आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सोसायटीने योजना सादर केली.

योजनेच्या माध्यमातून महिलांना भविष्यातील सुरक्षिततेच्या गुंतवणुकीसाठी नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. गोवा, महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक राज्यात सोसायटीच्या एकूण २१३ शाखा कार्यरत आहेत.

# पतसंस्थांनी वाढीचा ध्यास धरावा पण वाढ सातत्यपूर्ण व प्रमाणबद्ध असावी

सातत्याने प्रमाणबद्ध ठेव संकलन खूप उपयुक्त ठरते.

**❋ ठेव व कर्जावरील व्याजदर नियंत्रित ठेवणे महत्त्वाचे –**

संस्थेच्या ठेवींचा डोंगर वाढलेला दिसतो. मात्र पूर्ण बॅलन्सशीट पाहिली कि अनेक कच्चे दुवे दिसतात. प्रामुख्याने थकव्याज तरतूद वाढती दिसते. प्रॉफिट अँड लॉस अकाउंट स्टेटमेंटला ठेवींवर द्यावे लागणारे व्याज आणि कर्जावर मिळणारे व्याज या रकमेत बरोबरी होण्यासाठी स्पर्धा दिसते. वसुलीवर होणारा खर्च वाढता दिसतो. गुंतवणुकांमध्ये होणारी वाढ खूप मंदावलेली जाणवते. उत्पन्न आणि खर्च यामधील अंतर कमी होत गेलेले दिसते. नफा घटतो म्हणजे केवळ ठेवी वाढवून अग्रनामांकन हे आर्थिक स्वास्थ्याचे लक्षण नाही. ठेव वाढीच्या प्रमाणात कर्ज आणि गुंतवणुकांची प्रमाणबद्ध वाढ, नियमित वसुली, ठेवीवर देय होणारे व्याज आणि कर्जावरील व्याज या रकमेत कर्जावरील व्याज अधिक दिसणे महत्त्वाचे ठरते. हे साध्य करण्यासाठी ठेवींवरील व्याज दर नियंत्रित हवेत. चढ्या दराने ठेवी स्वीकारल्यास आर्थिक पत्रकात ठेवींवरील व्याज खूप अधिक होते. त्यामुळे नफ्यावर दबाव वाढतो म्हणून पतसंस्थांनी ठेव संकलन हे सातत्यपूर्ण मात्र नियंत्रणात ठेवणे आवश्यक ठरते. नेमकी नैसर्गिक गरज किती ते पाहून कॉस्टचा विचार करून ठेव व्याजदर ठरवत योजना जाहीर केल्या पाहिजेत. एखादी तात्कालिक संधी साध्य करण्यासाठी विशेष बाब म्हणून ठेव व्याजदर वाढवता येतात. पण त्यासाठी डोळसपणे पॉलिसी तयार केली पाहिजे. वाढीव व्याजदराने जमा होणारी रक्कम कशी वापरणार? त्यावर परतावा किती कालावधीपासून मिळू लागणार हे सर्व तपासणे आवश्यक ठरते.

**❋ ठेवींसाठी लागणारा योग्य कालावधी –**

ठेव संकलित करताना ठेव कालावधीलाही महत्त्व आहे. ठेवी १ वर्ष, ३ वर्षे, ५ वर्षे या मुदतीने सर्वसाधारणपणे उभारल्या जातात. ठेवींवरचे व्याजदर ठरवताना आर्थिक जगताचा अंदाज घेणे महत्त्वाचे ठरते. तसेच ठेवींमधून किती कालमर्यादेचे कर्ज वितरण होणार आहे, याचेही निकष ठरवणे महत्त्वाचे असते. नाहीतर कमी कालावधी असलेल्या ठेवींमधून दीर्घ मुदतीचे कर्ज अधिक प्रमाणात दिले गेले तर ठेव मुदत संपताना त्या ठेवी परत देण्यासाठी परत अतिरिक्त व्याजाने ठेवी जमवण्याचे आव्हान सामोरे येते. त्यामुळे ठेव कालावधी कर्ज परतफेडीचा कालावधी याचा साकल्याने अभ्यास करावा लागतो. ठेवींचे व्याजदर ठरवतांनाही हा मुद्दा विचारात घेणे श्रेयस्कर ठरते.

**❋ सशक्त अर्थकारण व प्रमाणाबद्ध आणि सातत्यपूर्ण वाढ –**

पतसंस्थांनी अर्थकारण सशक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ ठेवींमध्ये वाढ हा सशक्तपणाचा मार्ग नाही. आर्थिक पत्रकांची प्रमाणबद्ध वाढ होणे याला महत्त्व दिले पाहिजे. अर्थकारण यशस्वी आणि सशक्त करायचे असेल तर अर्थचक्रातून योग्य प्रमाणात नफा झाला पाहिजे. नफ्यातून रक्कम स्वनिधी वाढवण्यासाठी वर्ग व्हायला पाहिजे. वेगवेगळे अनिवार्य निधी, तरतुदी करून सुद्धा नफा शिल्लक राहिला पाहिजे. त्यातून बाह्य देयता नसलेले निधी तयार झाले पाहिजेत. नफाखोरी करणे हा उद्देश नाही पण अर्थकारणात ठेवीदारांना न्याय द्यायचा असेल तर पैशाचा सर्वोत्तम सर्वोत्तम विनिमय करून नफा प्राप्त करावाच लागतो. संस्थेच्या अर्थकरणात केवळ ठेवी, केवळ कर्ज वाढवून चालणार नाही, तर प्रमाणबद्ध आणि सातत्यपूर्ण वाढ यासाठी प्रयत्न आवश्यक आहे.

पतसंस्थांची विश्वासार्हता वाढत असताना उत्साहवर्धक स्थितीचा लाभ घेण्यासाठी केवळ संख्यात्मक वाढीपेक्षा प्रमाणबद्ध, सातत्यपूर्ण, विश्वासार्ह प्रतिमा निर्माण करीत असलेल्या संधी साध्य करण्याची दूरदृष्टी वापरून मार्गक्रमण करूया.

**– दीपक पटवर्धन, रत्नागिरी**

❋❋❋❋❋

# पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांच्या कार्याचा नागपूर नागरिक सहकारी बँकेकडून गौरव



**नागपूर** – होमिओपथी क्षेत्रात अनेक वर्ष कार्यरत असणारे नागपुर भूषण आणि केंद्र सरकारने पद्मश्री प्रदान करून डॉ. विलास डांगरे यांच्या कार्याचा गौरव केला. डॉ. विलास डांगरे यांना नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या वतीने नुकतेच सन्मानित करण्यात आले. बँक अध्यक्ष संजय भेंडे, उपाध्यक्ष अशोक अग्रवाल तसेच संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बँकेच्या वतीने मानपत्र, शाल प्रदान करून सन्मान करण्यात आला. अध्यक्ष भेंडे यांनी बँकेच्या आजवरच्या वाटचालीची आणि विविध योजनांची माहिती सांगितली. तसेच डॉ. डांगरे यांच्या कार्याचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना डॉ. डांगरे यांनी सांगितले की वैद्यकीय सेवा सुविधा सर्वसामान्य जनतेला वाजवी दरात उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यत्वे प्रयत्न केले. त्यामुळे या पुरस्काराची प्रेरणा ही रुग्ण आहेत. त्यामुळे त्यांनाच याचे श्रेय देतो आहे.

माझ्या मातेचे संस्कार, रामकृष्ण मिशनमधून मिळालेली ऊर्जा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार यामुळेच वैद्यकीय क्षेत्रात काम करता आले असे ते म्हणाले.

बँकेचे संचालक तसेच अधिकारी, नागरिक, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# राज्यातील सुमारे १७६ सहकारी बँकांवर आरबीआयचे सर्वसमावेशक निर्बंध

**पुणे** – राज्यातील सुमारे १७६ सहकारी बँकांवर आरबीआयने सर्वसमावेशक निर्बंध लावले असून या निर्बंधातून सहकारी बँका बाहेर काढण्यासाठी सहकार आयुक्तालयाने स्वतंत्र असा कृती आराखडा तयार करावा अशी सूचना सहकार आणि पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी दिल्या आहेत.

येथील साखर संकुलात महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या बैठकीत त्यांनी सूचना दिल्या. सहकार आयुक्त दीपक तावरे, अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, मिलिंद आकरे, उपनिबंधक आनंद कटके आदी यावेळी उपस्थित होते.

दराडे म्हणाले, विकास सोसायट्यांचे सबलीकरणासाठी संगणकीकरण महत्वाचे असून ते वेळेत पूर्ण झाले पाहिजे. सहकार आयुक्त तावरे यांनी खात्याच्या वतीने सुरू असणाऱ्या विविध कामकाजाची आणि त्याच्या कार्यवाहीची माहिती सांगितली.


२०२४
७५ अमृत महोत्सव
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com


# कात्रज दूध सहकारी संघाच्या वतीने विस्तारीकरण प्रकल्प राबविणार

**पुणे** – कात्रज दूध सहकारी संघाच्या वतीने दूध संघाच्या मुख्यालयातील जागेवर विस्तारीकरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाच्या वतीने अर्थसहाय्य करण्यात येणार आहे, अशी माहिती तत्कालीन अध्यक्ष भगवान पासलकर यांनी सांगितली.

दूध संघाच्या नफ्यात गतवर्षी अडीच कोटी रुपयांची वाढ झाली असून चालू वर्षात सुमारे तीन कोटी इतका नफा झाला आहे असे नमूद करून ते म्हणले कोंढापुरी येथे पशुखाद्य कारखाना कार्यरत असून पशुखाद्याची गुणवत्तावाढ आणि मार्केटिंगवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. तसेच पशुखाद्य विक्रीमध्ये १५० मेट्रिक टनावरून ५०० मे.टन विक्री वाढली आहे. सन २०२३–२४ मध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध फरक म्हणून प्रती लिटर दोन रूपयांप्रमाणे १२ कोटी ५० लाख रुपये देण्यात आले आहेत.

तसेच शासनाच्या वतीने गायीच्या दुधाला प्रती लिटर ५ रुपये अनुदान योजनेतून दोन कोटीचे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आले आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

**❊ अध्यक्षपदी स्वप्निल ढमढेरे, उपाध्यक्ष मारुती जगताप –**


जिल्हा दूध उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी स्वप्निल ढमढेरे शिरूर आणि उपाध्यक्षपदी मारुती जगताप पुरंदर यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहायक उपनिबंधक सुधीर खंबायत यांनी काम पाहिले.

नूतन पदाधिकाऱ्यांचे संचालक आणि अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ‘असाध्य ते साध्य’ विवेचनात्मक पुस्तक

असाध्य ते साध्य करिता सायास - कथा एका बँकेची हे शैलेश कोतमिरे यांचे पुस्तक वाचनात आले. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक म्हणून त्यांनी प्रभावी काम करून, बँकेचे पुनरुज्जीवन केले. तब्बल सव्वाचार वर्षे प्रशासक म्हणून काम करताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले.

कोणतीही सहकारी बँक चालवताना येणारे बरे-वाईट अनुभव विलक्षण असतात. परंतु ते लिखित स्वरूपात आणण्याचा उत्साह नसतो अथवा त्याचे महत्त्व त्या संस्थेपुरते असल्याचा सर्वसामान्य समज असतो. परंतु कोतमिरे यांनी हे अनुभव शब्दात मांडून या सर्वसाधारण समजुतीला छेद दिला आहे.




**असाध्य ते साध्य**
**लेखक - शैलेश कोतमिरे**

सोलापूर जिल्हा बँक अडचणीत आली असताना त्या बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी केलेल्या उपाययोजना कोतमिरे यांनी मांडल्या असल्या तरी, सर्वसाधारण नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायवृद्धीसाठीही त्या निश्चितच उपयुक्त ठरतील यात कोणतीच शंका नाही. सतत कमी होणाऱ्या ठेवी, कर्जपुरवठा करण्यासाठी निधीची अनुपलब्धता, बँकेविषयी जनमानसात झालेली नकारात्मक प्रतिमा, वाढलेली नक्त अनुत्पादित कर्जांची रक्कम, दरवर्षी वाढणारा संचित तोटा, पगार मिळण्यातील अनियमितता या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांमध्ये मरगळ येणे, ते निरुत्साहित होणे स्वाभाविक. या प्रतिकूल परिस्थितीची जाणीव असूनही सहकारावरील निष्ठा, मातृभूमीवरील-जिल्ह्यावरील प्रेम लक्षात घेऊन या बँकेचे प्रशासक पद त्यांनी मागून घेतले. राज्यस्तरावरील अप्पर निबंधक, सहकारी संस्था या उच्च पदावर कार्यरत असताना देखील, एका जिल्हा बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी धडाडी दाखवणे निश्चितच स्पृहणीय आहे.

अधिकारी, कर्मचारी वर्गामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे, त्यांना प्रोत्साहन देण्याचे विविध मार्ग कोतमिरे यांनी अवलंबिले. नोकरी एके नोकरी आणि नोकरी दुणे पगार या मानसिकतेतून बाहेर काढून कर्मचारी हा नोकर नसून तोच खरा बँकेचा चालक आहे ही भावना रुजवण्यात त्यांना यश आले. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन व्यवसाय आराखडा निश्चित करणे आणि त्याचा पाठपुरावा करून त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी केलेल्या उपाययोजना खरोखरच अनुकरणीय. जिल्हा बँकेच्या ११ तालुक्यांत २०८ शाखा पसरलेल्या. या सर्व शाखांना प्रत्यक्ष भेट देऊन, वस्तुस्थितीची जाणीव करून घेऊन, त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांशी/अधिकाऱ्यांशी संवाद साधून परिस्थितीप्रमाणे व्यवसायवृद्धीसाठी निरनिराळ्या उपाययोजना सुचविणे निश्चितच वाखाणण्याजोगे आहेत.

दैनंदिन कामकाजासाठी, व्यवसाय वृद्धीसाठी, लक्षांक (Target) गाठण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दबाव आणत असतानाच, कर्मचारी कल्याण निधीची स्थापना करण्याची कल्पकता कोतमिरे यांनी वापरली. त्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना पुरस्कार, आजारपणासाठी अर्थसहाय्य, सांस्कृतिक कार्यक्रम इ.च्या आयोजनामुळे अधिकारी /कर्मचाऱ्यांमध्ये बँकेविषयी आत्मीयता निर्माण होण्यास मदत झाली. केवळ अडचणीत आलेल्या सहकारी संस्थांनीच नव्हे तर व्यवसाय वृद्धीसाठी, नफा वाढीसाठी कोणत्या उपाययोजना योजता येतील याची सविस्तर माहिती घेण्यासाठी अन्य सहकारी संस्थांनी, अधिकारी / पदाधिकाऱ्यांनी हे पुस्तक आवर्जून वाचावे व ते अंमलात आणण्याचा अवश्य प्रयत्न करावा.

येथील अनुनाद प्रकाशनाच्या वतीने पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून त्याचे मूल्य रुपये ३५०/- इतके आहे.

**- परीक्षण - उदय पेंडसे**

## पुणे कमर्शियल को ऑप बँकचे पिंपरी - चिंचवड सहकारी बँकेत विलीनीकरण

**पुणे** - सातारा परिसरात कार्यरत असणाऱ्या पुणे कमर्शियल को-ऑप. बँकचे येथील पिंपरी - चिंचवड सहकारी बँकेत नुकतेच विलीनीकरण करण्यात आले आहे. बँकेच्या सर्व शाखा बँकेत विलीन करण्यात आल्या आहेत. यामुळे पिंपरी- चिंचवड सहकारी बँकेच्या शाखांची संख्या ८ इतकी झाली आहे. या शाखा पुणे आणि सातारा जिल्ह्यात कार्यरत आहेत, अशी माहिती बँक अध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी सांगितली.

## श्री समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्थेला कोकण भूषण पुरस्कार प्रदान

**पालघर** - येथील श्री समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्थेला नुकतेच कोकण भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक कोकण विभाग आणि अवी मुंबई नागरी सहकारी संस्था यांच्याकडून सन्मानित करण्यात आले विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येते. संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील आणि संचालक यावेळी उपस्थित होते.

## लेखापरीक्षकांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करणार - सहकारमंत्री पाटील

नाशिक - लेखापरीक्षकांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक विचार करणार असून लवकरच कौन्सिल प्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन करणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. ऑडिटर्स कौन्सिलचे तिसरे वार्षिक अधिवेशन येथे पार पडले. राज्यातील ३२ जिल्ह्यातील लेखापरीक्षकांनी सहभाग नोंदवला.

यंदाचा सहकार साधना हा राज्यस्तरीय पुरस्कार दामोदर पानगांवकर यांना तर राज्यातील प्रथम उत्कृष्ट लेखापरीक्षक पुरस्कार अहिल्यानगर जिल्ह्यातील संतोष तरटे यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्ष रामदास शिर्के, उपाध्यक्ष आबासाहेब देशमुख, सचिव उमेश देवकर, सहसचिव दत्तात्रय पवार, खजिनदार संदिप नगरकर आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

लेखापरीक्षण काळजीपूर्वक करणे व कामकाजात योग्य सुधारणा करणे आवश्यक आहे असे अप्पर निबंधक राजेश जाधवर यांनी सांगितले. लेखापरीक्षकाचे अधिकार व जबाबदारी यावर त्यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारती प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव यांनी सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत सहकार चळवळीचे महत्व यावर विवेचन केले. गृहनिर्माण संस्था लेखापरीक्षणबाबत अमोल गावडे यांनी आणि सूत्रसंचालक रुपाली घोलप यांनी ताणतणाव व्यवस्थापन यावर विवेचन केले.

सहकारी संस्था व आयकर कायद्यातील तरतुदी यावर चार्टर्ड अकौटंट चेतन बंब यांनी तर धर्मादाय संस्था ऑडिटबाबत धर्मादाय सहआयुक्त व्ही. आर. सोनुने यांनी तसेच निवृत्त अप्पर आयुक्त एस. बी. पाटील यांनी सहकार कायद्यातील आवश्यक तरतुदी व बदल याबाबत माहिती सांगितली.

# नागरी सहकारी बँकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक

माजी केंद्रीय मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी स्थापन केलेली न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेवर रिझर्व बँकेने नुकतीच बंधने घातली आहेत. या बँकेबद्दल वृत्तपत्रात आणि समाज माध्यमांवर ज्या बातम्या आलेल्या आहेत, त्यावरून बँकिंगबाबतचे सर्वसामान्य नियम पाळले गेले नाहीत, असे दुर्दैवाने दिसते.


डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

बँकेचे अंतर्गत लेखा परीक्षक, वैधानिक लेखापरीक्षक आणि काही प्रमाणात रिझर्व बँकेचे तपासणी अधिकारी या सर्वांच्या भूमिकांबद्दल वृत्तपत्रे आणि समाज माध्यमातून टीका करण्यात आलेली आहे. बँकेची परिस्थिती वाईट असताना नियामक या नात्याने ही परिस्थिती सुधारण्याऐवजी ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे मिळणे बंद झाले, यावर तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. याचा परिणाम म्हणून नुकतेच रिझर्व बँकेने निर्बंधामध्ये सुधारणा केली असून रुपये २५००० पर्यंतची रक्कम एकदा काढण्याची ठेवीदारांना मुभा दिली आहे.

हा निर्णय आधीही घेता येऊ शकला असता! डी.आय. सी.जी.सी.कडून पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी असणाऱ्यांना ९० दिवसांत पैसे मिळतील असे जाहीर झालेले आहे. डीआयसीजीसीचा याबाबतीतला अलिकडचा अनुभव लक्षात घेता हे पैसे मिळण्यास यापेक्षा अधिक कालावधीही लागू शकतो. या व्यतिरिक्त संस्थात्मक ठेवी, तसेच पाच लाख रुपयांच्यावर ज्यांनी ठेवी ठेवल्या आहेत अशा ठेवीदारांना सध्या तरी कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही. अशाप्रकारे निर्बंध घातलेल्या बँकांचे यापूर्वीचे अनुभव संस्थात्मक ठेवींसाठी आणि नंतर अवसायक नेमल्यानंतरही, ठेवी ठेवणाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत प्रतिकूल स्वरूपाचे आहेत. पाच लाख रुपयांच्यावर ज्यांच्या ठेवी आहेत आणि ज्या संस्थांच्या ठेवी आहेत अशा ठेवीदारांना ज्या दिव्यातून जावे लागते त्याबद्दल फक्त कल्पना करता येते. रिझर्व बँक, डी.आय.सी.जी.सी. आणि अगदी अर्थमंत्रालय देखील याबाबतीत फारशी अनुकूल भूमिका घेताना दिसत नाही.

**✻ नागरी सहकारी बँकांवर परिणाम –**

एखाद्या नागरी सहकारी बँकेवर रिझर्व बँकेने निर्बंध जारी केल्यानंतर त्या परिसरातील सर्व नागरी सहकारी बँकांवर त्याचा दृश्य परिणाम होतो. ठेवी कमी होतात, खातेदारांच्या विश्वासाला तडा जातो. बँकिंगमधील सहकारी बँक या प्रारूपाला धक्का बसतो, सहकाराबाबत उलट सुलट विचार येतात, परिणामी नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होतो.

न्यू इंडिया बँकेबद्दल आलेल्या बातम्यांच्या अनुषंगाने नागरी सहकारी बँकांनी सिस्टिम आणि प्रोसिजर बाबत अत्यंत काटेकोर राहण्याची गरज आहे.

कागदावरील नियम प्रत्यक्ष पाळले जातात की नाही हे बघण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असली पाहिजे. रोख रकमेच्या बाबतीत एवढी मोठी रोख रक्कम बँकेमध्ये का ठेवण्यात आली असेल हा एक साधा प्रश्न पडतो. शिल्लक रोख रक्कम ठराविक अंतराने तपासून ती पुस्तकाप्रमाणे जुळत असल्याबाबत खात्री करण्याची बँकांची पूर्वापार पद्धत आहे. या सोबतच कॉंकरंट ऑडिटर, स्टॅच्यूटरी ऑडिटर्स यांनी रोखरक्कम मोजून प्रत्यक्ष तपासणी करणे अपेक्षित असते. या प्रकारचे सर्व नियम सर्व बँकात असूनही हे नियम कागदावर राहिलेले असावेत, असे दिसते. यातून घ्यावयाचा धडा म्हणजे हे काम प्रत्यक्ष होत असल्याची खात्री करून घेणे गरजेचे आहे.

ऑपरेशनल बँकिंगमध्ये एकाचे काम दुसऱ्याने तपासण्याची नियमित पद्धत आहे.

हे नक्की होत आहे याची खात्री करण्याची गरज निर्माण झाली आहे. गरजेप्रमाणे तपासणी करणारे आलटून पालटून बदलणेही आवश्यक आहे. ठराविक काळानंतर नंतर काउंटर्स बदलणे आवश्यक आहे. या नियमाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे.

थोडक्यात मूलभूत नियमांची अंमलबजावणी व्यवस्थित होत असल्याची खात्री करणे हे आवश्यक आहे. शाखा पातळीवरील होत असलेल्या व्यवहारांमध्ये सर्व नियम व्यवस्थित पाळले जावेत हा धडा या घटनेमधून सर्व बँकांनी घेणे गरजेचे आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

# अर्थव्यवस्था वाढीसाठी बँकेतील ठेवी उपयुक्त - विद्याधर अनास्कर

**पुणे –** अर्थव्यवस्था वाढीसाठी बँकेतील ठेवी उपयुक्त असल्याचे मत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डी. एस. सावकार अध्यासन व विद्यापीठाचा वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'बँकिंग क्षेत्राची सद्यस्थिती व आव्हाने' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते.



विद्यापीठाचे प्रकुलगुरु प्रा. डॉ. पराग काळकर, माजी प्र. कुलगुरु प्रा. डॉ. एन. एस. उमराणी, जीवन साधना गौरव पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. मुकुंद तापकीर डी. एस. सावकार अध्यासन प्रमुख प्रा. डॉ. अशोक कांबळे, प्रा. डॉ. जी. शामला, प्रा. डॉ. अनिल करंजकर, बीएमसीसी उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेश वाघमारे उपस्थित होते.

बँकेकडे ठेवींच्या रूपात समाजाकडून जमा झालेल्या अनुत्पादक पैसा गरजू व्यावसायिक व उद्योजकांना उपलब्ध करून उत्पादकतेकडे वळविला जातो; त्या दृष्टिकोनातून बँकेतील ठेवींची गरज त्यांनी विविध उदाहरणे देऊन विशद केली. देशातील त्रिस्तरीय बँकिंग व्यवस्थेची कार्यपद्धती व त्याला अनुसरून स्थापन झालेल्या नाबार्ड सारख्या संस्थांची भूमिका अनास्कर यांनी स्पष्ट केली. ते म्हणाले, जनधन सारख्या योजनेमुळे ७८% टक्के लोकांची बँकेतील खाती वाढली. परंतु त्यातील ३८% निष्क्रिय असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विद्यार्थ्यांना 'ठेवीदार वित्तीय साक्षरता' सारख्या उपक्रमात सहभागी होण्याचा सल्ला दिला.

बँकिंग विषयक सायबर गुन्ह्यांचा वाढता आलेख लक्षात घेता 'सायबर सुरक्षा जागरूकता अभियान' राबविण्याची आवश्यकता प्र. कुलगुरु प्रा. डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केली. अध्यासन प्रमुख प्रा. डॉ. अशोक कांबळे यांनी व्याख्यान आयोजित करण्याबाबतची भूमिका विशद केली व अध्यासनाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. प्रा. डॉ. मुकुंद तापकीर व पद्मश्री विखे पाटील सहकार अध्यासन प्रमुख प्रा. डॉ. अनिल करंजकर यांची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचलन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी. शामला यांनी केले.

# गृहरचना संस्था
# शंका समाधान
## अपार्टमेंट कायदा - १९७०





ॲड. जयंत कुलकर्णी
९४२२० ०७५१०

**अपार्टमेंट संघाचे उपविधी (बायलॉज)**

**प्रकरण ६**

**※ अपार्टमेंटधारकांची कर्तव्ये–**

**※ नियम क्र. ३९ –** प्रत्येक अपार्टमेंट धारकाच्या घोषणापत्रातील त्याच्या हिश्श्याच्या प्रमाणात अपार्टमेंटचा दैनंदिन खर्च किती होतो, त्याप्रमाणात नक्की करावा लागतो त्यानुसार प्रत्येक अपार्टमेंट धारकाने त्याच्या हिश्श्याची रक्कम संघाला नियमितपणे अदा करावी लागते. त्यामध्ये इमारतीचा विमा उतरवणे व त्याची रक्कम ठरवणे तसेच राखीव निधी ठरविणे, मासिक खर्च ठरविणे, याप्रमाणे विभागणी करून ते प्रत्येक सभासदास वेळोवेळी लेखी/इ. मेलने कळविण्याचे काम व्यवस्थापक समितीला करावे लागते.

**※ नियम क्र. ४० – देखभाल व दुरूस्ती खर्च –**

१) प्रत्येक अपार्टमेंट धारकाने त्याच्या सदनिकेतील दुरुस्तीचा खर्च स्वत:च करावयाचा असतो. त्यानुसार समितीने त्याचा तपशील तयार करून देणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक अपार्टमेंट धारकाने स्वत:च्या सदनिकेतील दुरुस्तीचा खर्च कोणकोणत्या बाबींवर करावा याचा तपशील पुढीलप्रमाणे:–

१. नळ २. वीज, ३. गॅस, ४. टेलिफोन, ५. वातानुकुलीत यंत्र (ए.सी.), ६. स्वच्छतागृह व त्यातील सोयी–सुविधा ७. दरवाजे ८. खिडक्या, ९. दिवे इ.

३) या व्यतिरिक्त सामायिक देखभाल दुरुस्तीचा खर्च, जो अपार्टमेंट संघाने ठरवला असेल तो प्रत्येक अपार्टमेंट धारकाने त्याच्या हिश्श्याच्या प्रमाणात संघाला वेळोवेळी दिला पाहिजे.

**※ नियम क्र. ४१ –**

१) प्रत्येक अपार्टमेंटधारकाने जर सदनिका निवासासाठी घेतली असेल तर त्याचा वापर निवासासाठीच करणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक अपार्टमेंटधारकाने त्याच्या सदनिकेमध्ये अंतर्गत बदल करावयाचा झाल्यास तसे संघाला लेखी कळवून त्यांची पूर्वपरवानगी घ्यावी. जर ३० दिवसांत संघाच्या व्यवस्थापनाकडून काहीच उत्तर आले नाही तर संघाची अंतर्गत दुरुस्तीस हरकत नसल्याचे समजावे.

**टीप :** आराखड्यानुसार (प्लॅननुसार) बांधलेल्या सदनिकेत करावयाचा झाल्यास महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

**※ नियम क्र. ४२ –** सामायिक जागेचा वापर (कॉमन स्पेस) (१) सदनिकेच्या बाहेरील जागेमध्ये किंवा जिन्यामध्ये/जिन्याखाली अथवा अन्यत्र कोणताही अपार्टमेंटधारक त्या जागेत कोणतीही वस्तू किंवा सामान ठेवू शकणार नाही. त्या जागेचा वापर सर्वांनी करावयाचा असतो. त्यात कोणतेही अडथळे निर्माण करता येणार नाहीत.

२) सामानाची ने–आण करण्यासाठी स्वतंत्र जागा किंवा मार्ग करून ठेवला असल्यास त्यामध्ये कोणतेही अडथळे कोणालाही उभे करता येणार नाहीत.

**※ नियम क्र. ४३ –** १) प्रत्येक अपार्टमेंटधारक संघाने नेमलेल्या व्यवस्थापकास आपल्या सदनिकेत प्रासंगिक कारणाने प्रवेश करावयाचा झाल्यास त्याला मज्जाव करता येणार नाही. त्यावेळी सदनिकेचा मालक उपस्थित असो वा नसो. उदा. आग, आतून दार लागणे, अन्य संकटसमयी.

२) एक अपार्टमेंटधारक दुसऱ्या अपार्टमेंटधारकाच्या व्यक्तीस किंवा त्याला स्वत:ला त्याच्या सदनिकेत दुरुस्तीच्या कारणास्तव प्रवेश करून देईल.

उदा. बाथरूम गळती, किचन ओटा गळती इ. कारणास्तव अन्य व्यक्तीच्या गाळ्यात/सदनिकेमध्ये गळती होत असल्यास दुरुस्तीसाठी तसेच तपासणीसाठी मजुराला किंवा काम करणाऱ्या व्यक्तीला गाळ्यात / सदनिकेत प्रवेश देणे आवश्यक आहे. त्यासाठी आपसात चर्चा करून मार्ग काढावा. त्यासाठी व्यवस्थापकाने सहाय्य दोन्ही सभासदांस करावे.

**※ नियम क्र. ४४ –** १) कोणताही अपार्टमेंट धारक इमारतीवर संघाच्या पूर्वपरवानगीशिवाय जाहिरातीचे फलक, पोस्टर्स लावणार नाही.

२) कोणत्याही अपार्टमेंटधारकाला शेजारील सदनिकेतील व्यक्तींना त्रास होईल या आवाजात रेडिओ, टी.व्ही.वर गाणी अथवा कार्यक्रम लावता येणार नाहीत. तसेच पाळीव प्राणी सदनिकेत ठेवावयाचे झाल्यास महानगरपालिकेची पूर्व परवानगी घ्यावी.

३) अपार्टमेंट/सदनिकेच्या बाल्कनीमधून किंवा खिडकीमधून ओले कपडे पिळून वाळत घालण्याचे प्रत्येक अपार्टमेंटधारकाने टाळले पाहिजे.

४) तसेच अपार्टमेंटच्या खिडकीमधून किंवा बाल्कनीमधून खाली केरकचरा, कागद, घाण टाकता कामा नये.

५) अपार्टमेंट संघाने निश्चित केलेल्या जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी केबलचे यंत्र (डिश अँटिना) एसी मशीन, सोलर पॅनेल इ. लावू नये. ज्यायोगे इमारतीच्या बाहेरील भागाला नुकसान पाहोचेल, शक्यतो त्यासाठी सामायिक गच्चीचा वापर (टेरेस) केल्यास इमारतीला धोका पोहचणार नाही.

याप्रमाणे प्रत्येक अपार्टमेंटधारकाने नियमांचे पालन योग्य प्रकारे केल्यास सहकार्याच्या भावनेतून अपार्टमेंटधारक गुण्यागोविंदाने नांदू शकतील असे वाटते व एकमेकातील वाद वेळीच टळतील. त्यासाठी व्यवस्थापकाने सभासदांमध्ये एकोपा ठेवण्याचे कार्य केल्यास अपार्टमेंट म्हणजे एक कुटुंब म्हणून आनंदाने नांदू शकेल.

क्रमश:

**ॲड. जयंत कुलकर्णी**
Email - advjgk@yahoo.co.in

✻✻✻✻✻



दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com
कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर
8.25%* पासुन सुरू
* नियम व अटी लागू
आम्ही जपतो
वारसा विश्वासाचा
डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष
अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष
श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक),
ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# सहकार क्षेत्राला केंद्र सरकारचे मोठे पाठबळ – आयुक्त तावरे



**पुणे** – सहकार विषयासंदर्भात यापूर्वी केंद्र शासनाशी संबंध येत नव्हता. सर्व अडी–अडचणींसंदर्भात राज्य शासनाशी संपर्कात असायचा. मात्र, सन २०१८ पासून केंद्राशी संबंधात असून दररोज चांगले निर्णय होत आहेत. सहकार क्षेत्राला केंद्र शासनाचे मोठे पाठबळ आहे. नवनवीन ठिकाणी नागरी सहकारी बँकांची स्थापना व्हावी, याकरिता केंद्र शासन प्रयत्नशील असून सहकार्य देखील करीत असल्याचे मत राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे यांनी व्यक्त केले. पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त 'सहकारी बँकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता– एक गेम चेंजर' या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. राज्य हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, संचालक निलेश ढमढेरे, रमेश वाणी, बाळकृष्ण उंदरे, मंगला भोजने, डॉ. प्रिया महिंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके आदी उपस्थित होते.

परिषदेचे उद्घाटन सहकार व तंत्रज्ञानरूपी रोपाला पाणी घालून करण्यात आले. सहकार क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले नवनियुक्त आमदार हेमंत रासने, पुणे बार असोसिएशनचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. हेमंत झंझाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील विविध भागातील ३५० बँकांच्या प्रतिनिधींचा सहभाग या परिषदेमध्ये होता.

आयुक्त तावरे म्हणाले, सहकारी बँकांची क्षमता केवळ आकड्यांमध्ये न मोजता त्यांचे सोशल ऑडिट होणे गरजेचे आहे. सर्व प्रकारचे धोके पत्करून गरजूंना या बँका मदत करतात. यातून मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य उभे रहात आहे. सहकारी बँकांची ही चांगली बाजू लोकांसमोर यायला हवी. आपण डिजिटल क्षेत्रात गेलो आहोत. सेवा आणि नोंदी या डिजिटल स्वरूपात द्यायला हव्या. एआयच्या माध्यमातून परदेशात अनेक ठिकाणी व्यवहार सुरु आहेत. त्याप्रमाणे आपणदेखील यातून पुढचे पाऊल टाकायला हवे.

सुहास पटवर्धन म्हणाले, आपल्याकडे मूळ बुद्धिमता आहे. एआयमुळे नोकऱ्या जातील, असे अनेकांना वाटत आहे. त्यामुळे एआयसारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास कोणाच्याही नोकऱ्या जाणार नाहीत. अध्यक्ष मोहिते म्हणाले, सहकारात सहकार हा मंत्र जपण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. बँकिंगमध्ये सर्वत्र डिजिटायझेशन सुरू आहे. यामध्ये आता एआयचे नवे पर्व सुरू होत आहे. त्यात आपण मागे राहता कामा नये. पूर्वी बँकेत येऊन प्रत्यक्ष काम चालत होते. आता ग्राहकांचे बँकेत येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. बँकेत न जाता बँकिंग करण्याची सवय आहे. शाखा बँकिंग राहील की नाही, हा प्रश्न आहे. नागरी सहकारी बँकांचे अस्तित्व टिकवणे, हा अशा परिषदांचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसाद भारदे यांनी सूत्रसंचालन तर निलेश ढमढेरे यांनी आभार मानले.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** – (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**

**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे : रिजनल हेड (विदर्भ) 9420116337**

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई–अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई–विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई–जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई–दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई–बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445 9421164777 |
| मुंबई–सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991 8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/– |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/– |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/– |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून–
**वार्षिक रु. ७००/– त्रैवार्षिक रु. १८००/–**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

24 CARAT SECURITY FOR YOUR VALUABLES

Godrej

# UNMATCHED SECURITY
## UNCOMPROMISED STRENGTH



• Defender Aurum Pro Safe • Anti Intrusion Fogging Device
• Strong Room Door • Defender Prime Safe • Gold Testing Machine

SCAN TO KNOW MORE

For more information contact:

**Sibashis Paul** 9854026321

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor


**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**


भरभराटीचे लक्षण म्हणजे उद्योगाची वास्तू,
जनसेवेचे कर्ज म्हणेल तथास्तु !
Office
Industrial Shed
BRANDING
Shops
जनसेवा उद्योग वास्तू
कर्ज योजना
त्वरीत मंजूरी
आकर्षक व्याजदर
अत्यल्प प्रोसेसिंग फी
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३
व्हॉट्सअप नंबर : 89565 47595 www.janasevabankpune.net

'आपली बँक, आपली माणसं'

# दि अण्णासाहेब सावंत
## को-ऑप. अर्बन बँक महाड लि., महाड

ISO 9001: 2015 मान्यताप्राप्त बँक

**आमच्या अत्याधुनिक बँकिंग सेवा**

- रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी नागरी सहकारी बँक
- 24 शाखा व 5 ए.टी.एम.द्वारे विनम्र अर्थसेवा
- LOCKER सेवा SMS सेवा
- QR CODE सेवा
- मोबाईल बँकिंग सेवा
- UPI सेवा
- वैशिष्ट्यपुर्ण ग्राहक सेवा

" We Connect" 8483900708 / 8446150709

**श्री. यशवंत चिं. ओजाळे**
मॅनेजिंग डायरेक्टर

**श्रीमती शोभा सुधाकर सावंत**
चेअरपर्सन

**ॲड. मानसी आशीर्वाद मराठे**
व्हाईस चेअरपर्सन

mahadbank@gmail.com
www.asbankmahad.com

सहकारातील विश्वासाई नांव
ISO 9001 : 2015 मान्यताप्राप्त

✻ सर्व संचालक, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी वृंद ✻

# कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

६२६ अे/७वी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारुती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल
संपर्क क्रमांक - ८०८२५ ५५४०८. E-mail ID - kamalmahilayahoo.in

✻ रायगड जिल्ह्यातील महिलांची अग्रेसर पतसंस्था ✻

## ✻ संचालक मंडळ ✻



**सौ. मालती चंद्रकांत आंग्रे**
अध्यक्षा



**सौ. पूर्वा प्रशांत खेडेकर**
उपाध्यक्षा



**श्री. शशिकांत बांदोडकर**
संस्थापक तथा तज्ञ संचालक


सौ. पूनम सचिन बांदोडकर
श्रीमती चित्रा रमेश मानकामे
सौ. उर्मिला अर्जुन वंजारी
सौ. मनिषा दिलीप विसपुते
सौ. सुपमा सुरेश जांभळे

सौ. अर्चना अनिलकुमार कुळकर्णी
सौ. निर्मला दत्तात्रेय म्हात्रे
सौ. अर्चना प्रसाद गायकवाड
श्री. सुभाष मारुती ठोंबरे
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

**संस्थापक तथा तज्ञ संचालक : श्री. शशिकांत बांदोडकर**

**या वर्षी संस्थेस प्राप्त झालेले पुरस्कार**
✻ कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार २०२४-२५
✻ बँको पतसंस्था ब्ल्यू रिबन २०२४

| ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत आर्थिक स्थिती | |
|---|---|
| ठेवी | ५० कोटी २६ लाख |
| कर्जे | २१ कोटी ०३ लाख |
| तरलता गुंतवणुक | ३२ कोटी २५ लाख |
| स्वनिधी | ०९ कोटी ८५ लाख |
| मिश्र व्यवसाय | ७१ कोटी २९ लाख |
| भाग भांडवल | २ कोटी ५३ लाख |
| नफा १ कोटी | १ कोटी ३१ लाख |
| सभासद संख्या | ५९१४ |



# कर्मवीर भाऊराव पाटील
## नागरी सहकारी पतसंस्था मर्या; सांगली.

KBP

Symbol of Trust

प्रधान कार्यालय : कोल्हापूर रोड, सांगली. 0233- 2323926



आपल्या प्रगतीमध्ये आम्हाला आनंद आहे....

सभासदांना आधुनिक बँकींग व तत्पर सेवा देणारी, सभासदांच्या विश्वासाची, गतिमान अर्थसंस्था..

**कर्मवीर पतसंस्था..**

कर्मवीर पतसंस्थेच्या मदतीने चला आपले जग बदलूया..

### संस्थेची खास वैशिष्ट्ये:

- व्यवसाय २५०० कोटींकडे वाटचाल
- ठेवी १५०० कोटींकडे वाटचाल
- ३७ वर्षाची अविरत यशस्वी सेवा
- ६७ शाखांतून आधुनिक सेवा
- ISO मानांकन प्राप्त संस्था
- ऑनलाईन कोअर बँकींग सेवा
- मोबाईलवर बँकींग सुविधा
- संस्थेचा IFSC code -ICIC0000104
- SMS BANKING / NEFT / RTGS / D.D.सुविधा
- QR Code पेमेंट ची सुविधा
- प्रत्येक व्यवहाराची माहिती एसएमएसद्वारे मिळण्याची सुविधा.
- लॉकर सुविधा उपलब्ध
- सतत ऑडिट वर्ग-अ
- सर्व शाखा CCTV व अलार्म सुरक्षेने सज्ज

### सांपत्तिक स्थिती :


| | |
|---|---|
| भागभांडवल | 42 कोटी 05 लाख |
| स्वनिधी | 119 कोटी 93 लाख |
| ठेवी | 1242 कोटी 45 लाख |
| कर्जे | 925 कोटी 35 लाख |
| गुंतवणूक | 402 कोटी 40 लाख |
| खेळते भांडवल | 1435 कोटी 80 लाख |
| नफा | 26 कोटी 01 लाख |
| शाखा | 67 |
| सभासद | 68000 |

### ठेवीचे आकर्षक व्याजदर :

| | |
|---|---|
| ७ दिवस ते १ वर्ष | ५ % |
| ३० दिवस ते १ वर्ष | ६ % |
| ४६ दिवस ते १ वर्ष | ७ % |
| १८१ दिवस ते १ वर्षापर्यंत | ८ % |
| ३६६ दिवस ते १०९५ दि. | ९ % |

जेष्ठ नागरिकांसाठी
४५६ ते १०९५ दि. ९.२५%

IMPS सुविधा (मोबाईलद्वारे 24x7) 365 दिवस पैसे ट्रान्सफर करण्याची जलद सुविधा



कोअर बँकींग आरटीजीएस ॲण्ड एनईएफटी




एसएमएस बँकींग मोबाईल बँकींग IMPS सुविधा

व्यवसायवाढ,वाहन खरेदी,हक्काचे घर अथवा प्रॉपर्टी खरेदीचे स्वप्नं... साकार होईल कर्मवीर पतसंस्थेच्या मदतीने...!

- सामान्य कर्ज मर्यादा :- ३ लाखांपर्यंत
- वैयक्तिक कर्ज मर्यादा :- २ कोटी पर्यंत

- कॅश-क्रेडिट कर्ज मर्यादा :- १ कोटी पर्यंत
- एकत्रित कर्ज मर्यादा :- २ कोटी ५० लाखांपर्यंत

अधिक माहितीसाठी आजच आमच्या संस्थेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क करा...

आपल्या हक्काचे घर खरेदीसाठी कर्मवीर पत संस्था सदैव आपल्या सोबत...



फक्त ५ मिनिटात सोने तारण कर्ज उपलब्ध...



आपल्या स्वप्नांतली गाडी खरेदीसाठी आपल्या संस्थेची मदत...






आपल्या उद्योगासाठी आम्ही नेहमी आपल्या सोबत...



आपल्या उद्योगाच्या खेळते भांडवलासाठी कॅश-क्रेडिट योजना...

**श्री.अनिल श्रीपाल मगदूम**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री.डॉ.अशोक आण्णा सकळे**
व्हा.चेअरमन

**श्री.रावसाहेब जिनगोंडा पाटील**
चेअरमन

### संचालक मंडळ

श्री.ॲड.एस्.पी.मगदूम
श्री.डॉ.एस.बी.पाटील(मोटके)
श्री.आप्पासो दादू गवळी
श्री.डॉ.रमेश वसंतराव ढबू
श्री.डॉ.चेतन आप्पासाहेब पाटील
श्री.बजरंग भाऊसो माळी
श्री.डॉ.नरेंद्र आनंदा खाडे
श्री.अे.के. चौगुले (नाना)
श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे
श्री.अमोल विनायक रोकडे
श्री.लालासो भाऊसो थोटे
श्री.वसंतराव धुळाप्पाण्णा नवले
सौ.चंदन नरेंद्र केटकाळे

Reg.No.SAN/WVA/RSR/(CR)/2416 Dt.13-01-2014

# माऊली महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,इस्लामपूर

मुक्ताई बिल्डींग,राजन पॉवर लॉड्री शेजारी,संभाजी चौक,इस्लामपूर. ता.वाळवा, जि.सांगली.
फोन नं.: 02342-295355 Email Id : mauli2416@gmail.com

## ✻ संस्थेची वैशिष्ट्ये ✻

- संपूर्ण संगणकीकृत कामकाज
- अभ्यासू व तज्ञ संचालक, सल्लागार मंडळ
- आकर्षक ठेव योजना
- ठराविक ठेव योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती व विधवा महिला यांना अर्धा टक्का जादा व्याज
- कमीत कमी कर्ज व्याजदर
- विविध कर्ज योजना
- ज्येष्ठ ग्राहकांना फोनवरून सुविधा
- ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा ५५ वर्षे
- पॅन कार्ड काढण्याची सुविधा
- एनईएफटी/आरटीजीएस सुविधा

सौ. अश्विनी जयंत आठवले - संस्थापिका
सौ. सुनिता संजय जाधव - अध्यक्षा
कु. सुवर्णा शिवाजीराव कारंजकर - उपाध्यक्षा

## ✻ संचालक मंडळ ✻

सौ. जयश्री शशिकांत ढबू
सौ. सरिता सुनिल माने
श्रीमती आशा विठ्ठल सबनीस
सौ. कल्पना जयवंत निगडकर
श्रीमती शालिनी प्रभाकर कांबळे
कु. सुनिता जगन्नाथ देसाई
श्रीमती सुनंदा उत्तम पेठकर

## ✻ व्यवस्थापक ✻

अक्षय दिपक पिसे

## ✻ कर्मचारी वर्ग ✻

उत्कर्ष UTKARSH

जागतिक महिलादिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

ठेवी । कर्ज

# सोनेतारण कर्ज

व्याजदर

12.00%

सोन्यावर सर्वाधिक रक्कम देणारी संस्था



आता तुम्ही देखील लखपती होऊ शकता!
*condition apply

# आवर्त ठेव R.D.

| हप्ता रक्कम | कालावधी | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| 600/- | 37 महिने | 25,000/- |
| 1,200/- | 37 महिने | 50,000/- |
| 1,300/- | 62 महिने | 1,00,000/- |
| 2,400/- | 37 महिने | 1,00,000/- |
| 8,000/- | 12 महिने | 1,00,000/- |



8687 100 100
utkarshlimited.com

# उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वाई

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी आजच संपर्क साधा

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

# अॅसेट बॅक्ड क्रेडिट

## तुमच्या व्यवसायवृध्दीसाठी सदैव तत्पर

**@9.25%*** द.सा.पासून

- कर्जाची रक्कम ₹ 1 कोटी* पर्यंत
- वैयक्तिक / सर्व व्यावसायिक घटकांसाठी कर्ज
- परतफेडीचा कालावधी कमाल 120 महिने *



*नियम व अटी लागू

www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 223 466

**Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099**
**Magazine Post Reg. No. : MSD/057/2025**
**(Publication Date - 05/03/2025) Posting on 07/03/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001**




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**